
भारती विद्यापीठ

गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन

# विचार भारती

वर्ष : ४८ । अंक : ६
फेब्रुवारी – मार्च – २०१९



प्रथम स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

# साहेब



साहेब, तुमच्या स्पर्शानं
इथल्या माणसाचं जगणं
अमृतासारखं मधाळलेलं
तुम्ही तुमचं आयुष्य आमच्यासाठी
गुलालासारखं उधळलेलं

साहेब, शब्द तुमचा पाठीवर थाप
अंगावर शहारे उठायचे
अमावस्येच्या अंधाराला
पौर्णिमेचे लख्ख चांदणे फुटायचे

चेहऱ्यावर हास्यरेषा जगण्यात धडाडी
मनात तुमच्या जिद्द भरलेली
कोसळणारी वीजसुद्धा
तुम्ही मुठीमध्ये धरलेली

पुंडलिकासम तुमची मातृभक्ती
ज्ञानाचि रचिली वीट
उजळूनि गेल्या दश दिशा
उभे राहिले संस्काराचे भारती विद्यापीठ

साहेब, तुमचं कर्तृत्व
समुद्रातल्या लाटेसारखं गाज देणारं
अडखळणाऱ्या पावलांनाही
बोट धरून पुढे नेणारं

आम्ही नाही पाहिलं सोनं नाणं
आम्ही माणसं पाहिली साहेब
तुमच्यासारखी घडलेली
मातीमध्ये राहूनसुद्धा
आभाळाला भिडलेली

साहेब, रितं रितं वाटतं जगणं
जसा मूर्तीविना गाभारा
आठवण येते क्षणोक्षणी
डोळ्यांतून पाझरतात अश्रुधारा

आवरता येत नाही दुःख तुम्ही नसल्याचं
तरीही सावरावं लागतं
नियतीपुढं माणूस दुबळाच ठरलेला
साहेब, तुमच्या नावाचा सूर्य
आम्ही आमच्या काळजावर कोरलेला

**– प्रा. संतोष काळे**
पलूस


**प्रा.मिलिंद जोशी**
संपादक

# संपादकीय

## साहेबांच्या 'माणूसपणा'चा आम्हा विसर न व्हावा!

**का**ही दुःखंच अशी असतात की, काळ पुढे सरकला तरी त्याची तीव्रता थोडीही कमी होत नाही. आयुष्याला आलेलं रितेपण अशा वेळी प्रकर्षानं जाणवत राहतं. साहेब गेले त्याला एक वर्ष पूर्ण होतंय. त्यांच्या जाण्यानं झालेली हानी कधीही भरून येणारी नाही. अजूनही त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाला साहेब गेले हेच खरं वाटत नाही. साहेब आहेत. कोणत्याही क्षणी ते येतील. पाठीवर थाप टाकतील. त्यांच्या खास शैलीत बोलत राहतील. वातावरण चैतन्यानं भरून जाईल, असंच सर्वांना वाटतं; पण सत्य स्वीकारावंच लागतं. एखाद्या वटवृक्षासारखी सावली देणारा माणूस जातो तेव्हा काय वाटतं? मनाची काय अवस्था होते? ते शब्दांत नाही सांगता येत.

साहेब, वर्षभरातला एकही क्षण तुमच्या आठवणींशिवाय गेला नाही. विद्यापीठातले आणि विश्वविद्यालयातले सर्व कार्यक्रम जड अंतःकरणाने अत्यंत साधेपणाने पार पडले. 'तुमच्याशिवाय व्यासपीठ' ही कल्पनाच करवत नव्हती. अशा वेळी डोळे भरून यायचे. तुमच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य माणसांचा जीव थाऱ्यावर नव्हता. तुमच्या लाडक्या पलूस-कडेगाव मतदारसंघात लोकांनी गुढीपाडव्याला गुढ्या उभारल्या नाहीत. दिवाळीलाही पणत्या लावल्या नाहीत. सर्वांना प्रकाश देणारा दीपच तुमच्या जाण्यानं शांत झाला. तुमच्या कुटुंबातली सारी मंडळी आणि तुमचा जीव की प्राण असलेल्या भारती विद्यापीठाच्या परिवारातील सर्वांनी एका डोळ्यात आसू आणि एका डोळ्यात हसू घेऊन, सगळं बळ एकवटून तुम्ही दाखविलेल्या मार्गावर पावलं टाकली ती तुमची अपूर्ण राहिलेली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी!



साहेब, तुमच्या निधनानंतर गावोगावी ज्या शोकसभा झाल्या, त्यात तुमच्याविषयी भरभरून बोलून दिग्गजांनी आणि सामान्य माणसांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. ज्येष्ठ नेते, माजी मंत्री, भारती विद्यापीठाचे संस्थापक-कुलपती, राजकारण आणि समाजकारणातील एक कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्व म्हणून तुमचं मोठेपण विशद करताना सर्वांनी ठळकपणानं अधोरेखित केलं ते तुमचं 'माणूसपण.' या माणूसपणानंच तुमच्या कार्याला आणि व्यक्तिमत्त्वाला वेगळं परिमाण दिलं. तुम्हाला आदरपूर्वक आदरांजली वाहताना त्या परमेश्वराकडे एकच मागणं आहे,

हेचि दान देगा देवा।

साहेबांच्या 'माणूसपणा'चा आम्हा विसर न व्हावा!

●





# विचार भारती


■ संस्थापक
**डॉ. पतंगराव कदम**
एम.ए., एल.एल बी., पीएच.डी.

■ विचारभारती समिती :
**प्रा. डॉ. शिवाजीराव कदम** (अध्यक्ष)
**डॉ. विश्वजित कदम** (सदस्य)
**श्री. व. भा. म्हेत्रे** (सदस्य)
**डॉ. म. शि. सगरे** (सदस्य)
**डॉ. के. डी. जाधव** (सदस्य)
**डॉ. उत्तम भोईटे** (सदस्य)

■ संपादक
**प्रा. मिलिंद जोशी**

■ संपादन सहकार्य
**रवींद्र बेडकिहाळ**

■ मुखपृष्ठ-मांडणी
**प्रदीप खेतमर**, आर्ट ॲडव्हर्टायझिंग, पुणे

■ **पत्रव्यवहार**
संपादक,
विचारभारती कार्यालय,
एरंडवणे, पुणे - ४११०३८
स्थिरभाष : ०२०-२५४५१६७६
ई-मेल : vicharbharati38@gmail.com

■ मुद्रणस्थळ
**भारती प्रिंटिंग प्रेस**, एरंडवणे,
पुणे-४११०३८.

■ **वार्षिक वर्गणी रु. १००/-**



या मासिकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक व
■ संस्थेचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.



■ **विचारभारती । फेब्रुवारी - मार्च २०१९**
■ **वर्ष : ४८ । अंक : ६**



- **संपादकीय**
  साहेबांच्या 'माणूसपणा'चा आम्हा विसर न व्हावा!
  **प्रा.मिलिंद जोशी**
- स्वयंप्रकाशी हिरा । **मा. प्रतिभाताई पाटील** । ४
- विचारधारेशी एकनिष्ठ राहणारा नेता । **शरद पवार** । ८
- थक्क करणारे कर्तृत्व । **सुशीलकुमार शिंदे** । १२
- निर्मल व्यक्तित्व । **राजीव शुक्ला** । १४
- बहोत बडा चिराग बुझ गया! । **गुलाम नबी आझाद** । १५
- जिंदादिल मित्र । **प्रकाश जावडेकर** । १७
- उत्तुंग नेत्यांच्या मांदियाळीतला नेता । **देवेंद्र फडणवीस** । १९
- चमत्कार वाटावा असा मानदंड । **डॉ. श्रीपाल सबनीस** । २२
- आधुनिकतेची ओढ असणारे पतंगराव
  **डॉ. शां. ब. मुजुमदार** । २५
- जिव्हाळा जपणारा माणूस । **डॉ. बाबा आढाव** । २७
- गरुड उडून गेला, आठवणींची पिसं ठेवून!
  **सिंधुताई सपकाळ** । २९
- लोकसेवेचं व्रत । **डॉ. के.एच. संचेती** । ३१
- नावीन्याचा ध्यास । **संजय किर्लोस्कर** । ३३
- स्नेह जपणारे पतंगराव । **महादेव जानकर** । ३४
- पुण्याचे नाव जगाच्या नकाशावर नेणारा माणूस
  **ॲड. एस.के.जैन** । ३५
- समाजप्रिय व्यक्तिमत्त्व । **डॉ. वालचंद संचेती** । ३६
- मोकळा ढाकळा, निरागस आणि निष्कपट नेता
  **राजीव खांडेकर** । ३८
- किमयागार । **डॉ. उदय निरगुडकर** । ४०

# अ नु क्र म णि का


- मेरुमणी । **डॉ. पी.ए. इनामदार** । ४१
- शिक्षणक्षेत्रातील रत्न । **डॉ. विश्वनाथ कराड** । ४३
- खळाळणारा झरा । **दिवाकर रावते** । ४४
- सहृदयी आणि सकारात्मक । **गिरीष बापट** । ४७
- अजातशत्रू । **पृथ्वीराज चव्हाण** । ४८
- तत्काळ निर्णय घेणारा नेता । **अशोक चव्हाण** । ५१
- मैत्रीचं पावित्र्य जपणारा मित्र । **नारायण राणे** । ५४
- धडाकेबाज व्यक्तिमत्त्व । **अजित पवार** । ५६
- वडीलधारा मार्गदर्शक । **राधाकृष्ण विखे-पाटील** । ५९
- पारदर्शक व्यक्तिमत्त्व । **बाळासाहेब थोरात** । ६१
- प्रशासन यशस्वीपणे हाताळणारा नेता
  **माणिकराव ठाकरे** । ६३
- दिलदार माणूस । **उल्हासदादा पवार** । ६५
- चालतं-बोलतं विद्यापीठ । **हर्षवर्धन पाटील** । ६८
- दीपस्तंभ । **राजीव सातव** । ७०
- माणुसकी जपणारं, प्रेम देणारं व्यक्तिमत्त्व
  **राजेश टोपे** । ७२
- हसरं-बोलतं खेळकर राजकीय नेतृत्व
  **सुनील तटकरे** । ७५
- स्नेह जपणारे पतंगराव । **सुधीर गाडगीळ** । ७६
- डॉ. पतंगराव कदम म्हणजे चालती-बोलती संस्था!
  **जोगेंद्र कवाडे** । ७७
- राखेतून झेपावणारा फिनिक्स । **आशिष शेलार** । ७९
- मोठ्या भावासारखं प्रेम करणारे साहेब
  **डॉ. गजानन एकबोटे** । ८०
- संवेदनशील नेता । **मुक्ता टिळक** । ८३
- गुरुबंधू । **डॉ. इंद्रजीत यशवंतराव मोहिते** । ८४
- रयतचे 'भीष्माचार्य' । **डॉ. अनिल पाटील** । ८८
- उदार अंतःकरणाचा नेता । **रमेश बागवे** । ९१
- सुख-दुःखात सामील होणारा नेता
  **अंकुश काकडे** । ९२
- साहेबांमुळेच घडलो । **प्रवीण तरडे** । ९४






# स्वयंप्रकाशी हिरा



**मा. प्रतिभाताई पाटील**
माजी राष्ट्रपती

**काही महिन्यांपूर्वी शिवाजीरावांच्या मुलाचं लग्न होतं. तेव्हा आम्ही गेलो होतो– मी आणि शेखावत साहेब. आम्ही मंचावर जाऊन वधूवरांना शुभेच्छा दिल्या. मग खाली उतरत असताना थोडा उतार होता. त्यावरून चालताना माझा तोल जायला लागला. तेव्हा माझ्याबरोबरच पतंगराव चालत होते. ते पटकन पुढे झाले आणि म्हणाले, 'ताई, मी तुम्हाला पडू देणार नाही. मी तुमचा हात धरतो.' त्यांनी माझा हात धरला आणि मला गाडीपर्यंत नेऊन पोहोचवलं. मी त्यांना म्हटलं की, 'पतंगराव, तुम्ही आता नुसता हात धरून चालणार नाही, तुम्ही आता माझ्या म्हातारपणाची काठी झालेला आहात.' ते म्हणाले, 'नाही नाही ताई. तुम्ही चिंता करू नका. मी आहे ना.' कुठं आहात पतंगराव तुम्ही... मला दिलेला शब्द पाळलेला नाही. मला याचं अतिशय दुःख आहे. माझ्या म्हातारपणाची काठी गेल्याचं मला दुःख आहे.**

एका अनपेक्षित अशा दुःखद प्रसंगी आपण सगळे जमलेलो आहोत. पतंगरावजींना श्रद्धांजली वाहण्याचा प्रसंग कधी माझ्यावर येईल, असं मला वाटलं नव्हतं. पण दुर्दैवाने ते घडतंय. मी जड अंतःकरणाने त्यांना माझी श्रद्धांजली अर्पण करते. पतंगरावजी हे सदैव आनंदी, उत्साही, एक कर्तृत्वसंपन्न असं व्यक्तिमत्त्व. मग ते राजकारण असो, समाजकारण असो, शैक्षणिक क्षेत्र असो, उद्योग असो, सहकार असो, अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी काम केलं आणि स्वतःची अशी वेगळी छाप निर्माण केली. एका लहान शेतकरी कुटुंबामध्ये त्यांचा जन्म झाला. कुंडल या गावी वसतिगृहामध्ये त्यांचं मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालं. ते गावामधले पहिलेच मॅट्रिक होणारे विद्यार्थी होते. त्या वेळेची वसतिगृह, ही आपण आता चित्रफित बघितली की ते गाव कसं होतं. तेव्हा वसतिगृहाच्या आतासारख्या सिमेंट काँक्रिटच्या इमारती नव्हत्या. मातीच्या भिंती, शेणाने सारवलेली जमीन, मिणमिणते दिवे, वसतिगृहात जे मिळेल ते खाणं, असं करत करत त्यांनी एका बाजूला कष्ट आणि दुसऱ्या बाजूला शिक्षण अशी दुहेरी कसरत केली. रयतच्याच एका हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून अर्धवेळ नोकरी केली. पुढे पुणे विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली आणि पुढे डॉक्टरेटसुद्धा मिळवली.

अतिशय कठीण अशा प्रसंगांना तोंड देत देत, जीवनामधले चांगले आणि वाईट अनुभव घेत मोठ्या हिमतीने आणि उमेदीने, मोठ्या हुरूपाने त्यांनी जीवनाचे यशोमंदिर उभारले, यशोशिखर गाठले. पण त्यांच्यामध्ये दंभ किंवा अहंकार याचा कधी लवलेशही कोणाला दिसला नाही. उलट आपण जी दगदग सोसली, जे कष्ट सहन केले, ज्या अतिशय कठीण समस्या आणि त्याचे कटू अनुभव घेऊन आपण जीवनामध्ये काम केलं, असे कटू आणि कठीण प्रसंग कोणावरही येऊ नये अशा विचारांनी, मग ते विद्यार्थी असो, त्यांच्याकडे येणारे पालक असो, राजकारणातले कार्यकर्ते असो, किंवा अर्ज आणि विनंत्या घेऊन येणारे लोक असोत, त्या सगळ्यांचे प्रश्न सोडवताना त्यांच्या मनामध्ये एकच गोष्ट होती आणि ती होती सहानुभूती. तेव्हा अतिशय सहानुभूतीने लोकांच्या समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला, कारण





त्या परिस्थितीमधून ते गेलेले होते. त्या दुःखामधून ते गेलेले होते आणि म्हणून प्रत्येकाला मदत करण्याची त्यांची वृत्ती होती.

ते चार वेळेला विधानसभेत निवडून आले. ते राजकारणात होते, पण राजकारणी नव्हते. राजकारणात असणारी भांडणं, अंतर्गत वाद याच्यात ते फारसे कधी पडले नाहीत. तसं तर राजकारणी लोकांना दोन आघाड्यांवर लढावं लागतं. एक अंतर्गत आघाडी आणि दुसरी बाहेरची आघाडी. बाहेरचं म्हणजे विरोधी पक्षांशी लढणं. त्यांची वेगवेगळी धोरणं असतात, त्यांचे कार्यक्रम असतात. प्रत्येक पक्षाचे आपापले कार्यक्रम असतात. पण लोकशाहीमधला तो एक भाग आहे. पण दुसरी जी आघाडी आहे ती अंतर्गत आहे. तिथे गट-तट असतात, पण पतंगरावांना त्यामध्ये कधी पडल्याचं फारसं कोणी बघितलेलं नाही. आधी आमदार, नंतर मंत्री झाल्यानंतर आणि मग खूप ज्येष्ठ मंत्री झाल्यानंतर स्वाभाविक होतं की, त्यांना देखील मुख्यमंत्री होण्याची इच्छा होती. ती त्यांची रास्त अपेक्षाही होती. पण वैशिष्ट्य असं की, त्यांची वृत्ती सकारात्मक होती. स्वतःला जरी मंत्रिपद मिळालं नाही, तरी ज्याला ते मिळालं त्याला सहकार्य करणं हे आपलं कर्तव्य समजून नेहमी त्यांनी साथ दिली. या गोष्टीचं त्यांना कधीही वैषम्य वाटलं नाही. त्याचे कारण त्यांची खिलाडूवृत्ती. प्रत्येक गोष्टीकडे खिलाडूवृत्तीने बघणं, सकारात्मकतेने बघणं हा त्यांचा विशेष होता. म्हणून त्यांना कधी कोणाबद्दल नाराजी, कोणाबद्दल रुसवा-फुगवा करताना आपण पाहिलं नाही. पतंगरावजींचं एक आगळं असं व्यक्तिमत्त्व होतं.

एक अतिशय दिलदार असणारा, दिलखुलास हसणारा, मनमोकळं वागणारा, कुठलाही रोष न बाळगणारा, सगळ्यांबद्दल सद्भावना ठेवणारा, आनंदाने हसत-खेळत जगणारा, सगळ्यांना आनंदी ठेवणारा एक जिताजागता स्वयंप्रकाशी हिरा, हे पतंगरावांचं वैशिष्ट्य होतं. आज ते पडद्याआड गेले आहेत आणि याचं आपल्या सगळ्यांना दुःख आहे. ते फार लवकर गेले याचा आपल्या सगळ्यांना धक्काही बसला आहे. सुंदर फुलांनी फुलविलेल्या बागेमध्ये, आनंदाने पंख फडफडवीत स्वच्छंदाने किलबील करणारे पक्षी एकदम उडून जावेत आणि बागेमधली कोमल फुलं एकदम कोमेजून जावीत, सूर्य काळ्या ढगांनी झाकोळून जावा आणि नैराश्याची शांतता पसरावी असं अगदी सुनंसुनं आणि भकास सगळ्यांना वाटायला लागलं आहे. भारती विद्यापीठासारख्या एवढ्या मोठ्या संस्थेची आणि आपल्या कार्याची बाग त्यांनी फुलवली. ही बाग फुलविणारा माळी एकाएकी लुप्त झाला. यामुळे उदासी पसरलेली आहे. आज पतंगरावजी आपल्यामध्ये नाहीत यावर अजूनसुद्धा आपला विश्वास बसत नाही.


१९७२ मध्ये निवडणुका झाल्या. त्या वेळी मी मंत्रिमंडळामध्ये डेप्युटी मिनिस्टर होते. सांगलीची संपर्कमंत्री म्हणून माझी नियुक्ती केली होती वसंतदादांनी. तेही सांगलीचेच. ७२ मधल्या निवडणुका आल्या, तेव्हा दादांनी मलाच ऑब्झर्व्हर म्हणून पाठवलं. सांगली जिल्ह्यामध्ये मला वाटतं, त्या वेळी नऊ मतदारसंघ होते. मी तिथे गेल्यानंतर मला असं वाटलं की, एका हॉलमध्ये सगळेजण जमतील आणि एकेक मतदारसंघातल्या उमेदवाराशी आपल्याला बोलता येईल. पण तसं नाही. तर मी बघितलं की, एकेका उमेदवारासाठी त्यांचे चारशे-चारशे, पाचशे-पाचशे सपोर्टर्स आलेले होते. मला ते वेगळंच वाटलं, कारण आमच्याकडे पाचपन्नास शंभरपेक्षा जास्त लोक डेलिगेटस् मध्ये येत नाहीत. इथे एकेका उमेदवाराबरोबर पाचशे-पाचशे लोक आल्यामुळे एका हॉलमध्ये ते मावणं शक्यच नव्हतं. बाहेरून त्या उमेदवाराचं, त्यांच्या डेलिगेटस्चं म्हणणं ऐकून घ्यावं लागलं. नंतर या नऊ मतदारसंघांपैकी कोणाला उमेदवारी द्यावी, याच्या माझ्या शिफारशी मी श्रेष्ठींकडे दिल्या. निवडणुका झाल्या आणि नऊपैकी सात उमेदवार निवडून आले. दोन लोक आले नाहीत. तेव्हा हे दोन मतदारसंघ कुठले, तर एक होता भिलवडी वांगी आणि दुसरं मला वाटतं शिरोळ. मी भिलवडी वांगीमधून पतंगरावांना तिकीट द्यावं, अशी शिफारस केलेली होती आणि शिरोळमधून देशमुखांना. पण दुर्दैवाने या दोघांनाही तिकिटं मिळाली नाहीत. ते दोघंही स्वतंत्र उभे राहिले आणि दोघेही निवडून आले. तेव्हा नऊपैकी सात काँग्रेसचे आले आणि दोन अपक्ष आले आणि ते नंतर काँग्रेसमध्ये आले. इतकी लोकप्रियता त्यांची त्या वेळेलासुद्धा होती. आणि ती सतत वाढत गेली. मला यशवंतरावजी मोहिते यांचीसुद्धा आठवण आल्याखेरीज राहत नाही. मी सुरुवातीला जळगाव जिल्ह्यातून निवडणुकीसाठी उभी होते. त्या वेळी सगळ्यात तरुण उमेदवार म्हणून उभी होते. यशवंतरावजी माझ्या प्रचारासाठी आले होते. तेव्हा एका गावात प्रचाराची सभा घेताना ते म्हणाले की, मी कधी भावनात्मक आवाहन करीत नाही. पण प्रतिभाबद्दल करतो. ती माझ्या बहिणीसारखी आहे. ती तुमचं खूप काम करेल, तुम्ही हिला निवडून द्या. तेव्हापासून यशवंतरावजी हे माझे मोठे भाऊ झाले. यशवंतरावांच्या अतिशय जवळ असणारे पतंगराव कदम. त्यामुळे पतंगरावांशी देखील माझे अतिशय चांगले, जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. ते नंतर कायम राहिले.



काही महिन्यांपूर्वी शिवाजी-रावांच्या मुलाचं लग्न होतं. तेव्हा आम्ही गेलो होतो- मी आणि शेखावत साहेब. आम्ही मंचावर जाऊन वधूवरांना शुभेच्छा दिल्या. मग खाली उतरत असताना थोडा उतार होता. त्यावरून चालताना माझा तोल जायला लागला. तेव्हा माझ्याबरोबरच पतंगराव चालत होते. ते पटकन पुढे झाले आणि म्हणाले, 'ताई, मी तुम्हाला पडू देणार नाही. मी तुमचा हात धरतो.' त्यांनी माझा हात धरला आणि मला गाडीपर्यंत नेऊन पोहोचवलं. मी त्यांना म्हटलं की, 'पतंगराव, तुम्ही आता नुसता हात धरून चालणार नाही, तुम्ही आता माझ्या म्हातारपणाची काठी झालेला आहात.' ते म्हणाले, 'नाही नाही ताई. तुम्ही चिंता करू नका. मी आहे ना.' कुठं आहात पतंगराव तुम्ही... मला दिलेला शब्द पाळलेला नाही. मला याचं अतिशय दुःख आहे. माझ्या म्हातारपणाची काठी गेल्याचं मला दुःख आहे.

मी २०१२ ला रिटायर्ड झाले. त्या नंतर पुण्याला राहायला आले. सगळ्यात आधी पतंगराव मला भेटायला आले. पतंगराव म्हणजे आनंदाचा झरा. मला म्हणाले, 'ताई, तुम्ही आता पुण्यात आल्या आहात. तुम्ही पुणेकर झाल्या आहात. काहीही लागलं तरी मला सांगायचं. कशाचीही काळजी करायची नाही.' तेव्हापासून पतंगराव सतत केव्हाही माझ्याकडे येऊन माझी चौकशी करत असत. आज हा आनंदाचा झरा अचानक गेला, याचं मला अतिशय मनस्वी दुःख आहे. मी पतंगरावांच्या कुटुंबीयांच्या दुःखामध्ये सहभागी आहे. ते गेले पण त्यांनी निर्माण केलेले विश्व आणि विश्वजित हे मागे ठेवून गेलेले आहेत. तेव्हा वहिनींना आणि विश्वजित यांना मी हे सांगणार आहे की, कधीही हार न मानण्याचा त्यांचा हा वसा लक्षात ठेवा आणि हिमतीने पुढे जा. परमेश्वर तुम्हाला ती शक्ती देवो. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

●



भान ठेवून योजना आखा,
बेभान होऊन त्या राबवा!

**डॉ. पतंगराव कदम साहेब**
संस्थापक – भारती विद्यापीठ
कुलपती – भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय



# विचारधारेशी एकनिष्ठ राहणारा नेता



**खासदार शरद पवार**
अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

**आपल्याला महाराष्ट्रामध्ये त्यांचं काम माहीत आहे. पण दिल्लीमध्येसुद्धा भारती विद्यापीठाच्या उत्तम शाखा आहेत. दर्जेदार प्रशिक्षण देणारी अशा प्रकारची संस्था आहे. ती त्यांनी त्या ठिकाणी उभी केली. आणि आनंदाची गोष्ट अशी की, शैक्षणिक संस्था उभ्या राहतात, पण तुम्ही पतंगरावांच्या कुठल्याही शैक्षणिक संस्थेच्या प्रांगणामध्ये जा, तुम्हाला नीटनेटकेपणा दिसेल, वृक्षवल्ली त्या ठिकाणी दिसतील, बारकाईने लक्ष ठेवून बांधलेल्या इमारतींमध्ये चांगला आर्किटेक्चर नमुना बघायला मिळेल. तो सगळा कॅम्पस वेगळ्या पद्धतीने उभा राहिलेला आपल्याला बघायला मिळेल. कोणत्यातरी कन्व्होकेशनसाठी त्यांनी मला बोलवलं. मी त्यांना सांगितलं की, मला तुमचा कॅम्पस फार आवडतो.**

पतंगरावांच्या शोकसभेसाठी जाण्याचा प्रसंग येईल, हे कधी वाटलं नव्हतं गेल्या काही वर्षांमध्ये. पुणे शहर हे शिक्षणाचं माहेरघर म्हणून ओळखलं जातं आणि महाराष्ट्राच्या शैक्षणिक यशामध्ये पुण्याचे प्रचंड योगदान आहे, याच्याबद्दल काही शंका नाही. पण त्याच्यामध्ये काही विशिष्ट कालखंड होऊन गेलेला होता की, त्या कालखंडामध्ये शिक्षणासंबंधीचा विस्तार या पुण्यामध्ये झाला. १९६०च्या पूर्वी, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या पूर्वी आणि त्याहीआधी स्वातंत्र्याच्या पूर्व काळामध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटी असो की, ज्याला लोकमान्यांचा आधार होता, सर परशुरामभाऊ कॉलेज शिक्षण प्रसारक मंडळीचं, ती पुढची संस्था होती. वाडिया कॉलेज आणि मॉडर्न एज्युकेशन सोसायटीसारखी महत्त्वाची संस्था या ठिकाणी होती. या सगळ्यांच्या माध्यमातून शिक्षणासाठी महाराष्ट्राच्या आणि महाराष्ट्राच्या बाहेरीलसुद्धा लोक फार मोठ्या प्रमाणावर अगत्याने या पुणे शहरामध्ये येत असत. पण नंतरच्या काळामध्ये ज्याचा उल्लेख आधीच्या वक्त्यांनी केला की, या शिक्षणामध्ये गुणवत्तेच्या बरोबर समाजातील नवीन पिढीला स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी जी ताकद आणि दृष्टी आली पाहिजे, त्यावर आधारित व्यवसायविषयक आणि अन्य विषयांच्या संबंधीची भूमिका घेणारे शिक्षण देण्याच्या बद्दलची काळजी घेण्याची आवश्यकता होती.

मला सांगायला काही हरकत नाही की, या संबंधीचा, हा जो पुण्याच्या शैक्षणिक कालखंडात जो बदल झाला, त्या बदलामध्ये त्या दोन लोकांचं योगदान फार मोठं आहे. एक भारती विद्यापीठाची स्थापना करून पतंगरावांनी ते काम केलं. आणि दुसरं डॉ. मुजुमदार आज या ठिकाणी आहेत– त्यांनीसुद्धा त्या प्रकारची दृष्टी ठेवून या शिक्षणाला वेगळी दिशा दाखवण्याचं काम केलं. ही दोन्ही माणसं कुठूनतरी बाहेरून आलेली आहेत. ती मूळ पुणेकर नाहीत. एक कोल्हापुरातून आले गडहिंग्लजमधून, तर पतंगराव सोनसळमधून, सांगली जिल्ह्यातून आले. मला आठवतंय की, त्यांनी ज्या वेळी सुरुवात केली भारती विद्यापीठ या नावानं, ६४–६५ साल असेल बहुतेक. आणि मी महाराष्ट्राचं नेतृत्व करायचो, पुण्यामध्ये असायचो. तेव्हा पुण्यामध्ये कुजबूज होती. कुजबूज काय होती, कळलं का ते त्या कदमांनी विद्यापीठ काढायचं






ठरवलंय. 'घरात नाही पीठ अन् काढतो विद्यापीठ', असं कोणीतरी सहज सांगितलं. पतंगराव भेटले. नुकतंच त्यांनी गणित आणि शास्त्र या विषयांसंबंधीच्या परीक्षा घेण्याचा उपक्रम सुरू केला होता. मला आठवतंय की, त्या वेळेला त्यांचे काही सहकारी अधूनमधून काँग्रेस पक्षाचे काम करणारे होते, भाऊ होते, असे काही तीनचार लोक. भारती विद्यापीठाचा कार्यक्रम अधिक प्रमाणामध्ये वाढवावा, अशी कल्पना त्यांच्या मनामध्ये होती. त्यांच्याही कानावर गेलं की, पुण्यात अशी चर्चा आहे. त्यांनी मला सांगितलं की, अशी अशी चर्चा आहे, पण ठरवलं म्हणाले आता की, विद्यापीठच काढूया, उत्तम दर्जाचंच होईल याची खबरदारी घेऊया. नुसतं महाराष्ट्राच्या नाही तर देशाच्या कानाकोपऱ्यातली मुलंमुली या ठिकाणी अगत्याने येतील आणि प्रवेश हवा असेल तर तो भारती विद्यापीठात हवा आहे, अशा प्रकारची त्यांची इच्छा असेल. अशी स्थिती निर्माण केल्याशिवाय आता स्वस्थ बसायचं नाही. आणि तेव्हापासून त्यांनी ज्या कष्टांना सुरुवात केली, तो त्यांचा अखेरचा श्वास चालू असेपर्यंत ते कष्ट कधीही त्यांनी थांबविले नाहीत.

रयतच्या संबंधीचा उल्लेख अनेकांनी केला. अनिल पाटलांनी केला. ते आणि मी गेली अनेक वर्षं रयतमध्ये एकत्र काम करतोय. ३०-४० वर्षे तरी असतील. मी अध्यक्ष असेन, पण धोरणात्मक निर्णय घेण्याच्या बैठकीमध्ये रयतलासुद्धा एक दिशा दाखविण्यासंबंधीचं काम हे पतंगराव नेहमी करत असत. एखादा नवीन उपक्रम हातामध्ये घेतल्यानंतर आम्ही त्याची चर्चा करायचो आणि बैठकीच्या शेवटी मी सांगायचो की, पतंगराव, ही जबाबदारी तुम्हाला घ्यावी लागेल आणि पतंगरावांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर आम्हाला कोणाला कधी काही चिंता वाटायची नाही. ते काम फत्ते झाल्याशिवाय राहणार नाही, अशी खात्री वाटायची. जरी ते भारती विद्यापीठाचे संस्थापक असतील, पण त्यांचा जिव्हाळा आणि त्यांचं मन हे रयतमध्ये गुंतलेले होतं. कधीतरी त्यांना मी एक सहज म्हणालो की, 'अहो, रयतमध्ये तीन-साडेतीन लाख विद्यार्थी आहेत. तुमच्याकडे चार-साडेचार लाख झाले.' 'नाही नाही म्हणाले, ही चर्चा करायची नाही. मोठ्या घराशी, मोठ्या भावाशी लहानांनी कधी तुलना चर्चा करायची असते का? रयत ही रयत आहे. दहा-बारा मुलं कमी असतील पण रयत ही रयत आहे.' त्यांना म्हटलं की, आपली संस्था ही त्याहीपेक्षा मोठी झाली याचा आनंद आम्हा सगळ्यांना जरूर वाटतो. पण तो आनंद त्यांनी कधी उघडपणे दाखवला नाही. त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटलांनी महात्मा जोतिबा फुलेंच्या विचारांनी शैक्षणिक क्षेत्रात जे योगदान दिलं, त्यासंबंधीचं एक आदराचं स्थान आपण सतत जपलं पाहिजे, त्याच्यात तडजोड होऊ शकत नाही, असं सूत्र पतंगरावांनी आयुष्यभर सांभाळलेलं

होतं.

नवीन नवीन कॉलेजेस ते काढत होते. मला आठवतंय की, पुन्हा एकदा मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झालो, दुसऱ्या वेळेला. शपथ घ्यायची होती मला. पण त्याच्याआधीच पक्षामध्ये निवड झाल्यामुळे लोक स्वागताला आले आणि पतंगरावसुद्धा हार घेऊन आले. त्यांना मी सांगितलं त्या ठिकाणी की, पतंगराव एखादा कागद आहे का? कोणालातरी सांगितलं कागद आणायला. त्यांना म्हटलं याच्यावर लिहा की, सगळी कॉलेजेस तुम्ही काढली पण मेडिकल कॉलेज काढलं नाही. मेडिकल कॉलेजसाठी परवानगी मागा आणि तारीख आजची घालू नका, उद्याची घाला. कारण दुसऱ्या दिवशी माझा शपथविधी होता. त्यांनी त्याच ठिकाणी तो अर्ज लिहून दिला. त्याच्यावर मी दुसऱ्या दिवसाची तारीख घालून त्याला मान्यता देण्याचा निर्णय घेतल्याचं मला आठवतं आहे. त्याच्यानंतरच्या काळामध्ये कधीतरी एखाद्या – मी सहसा सांगत नसायचो पण – कधीतरी एखाद्या विद्यार्थ्याच्या संबंधी मला फारच आग्रह झाल्यानंतर पतंगरावांना विचारलं काही करता येईल का, काय बोलता करता येईल का, सांगायचं. किती मुलं घ्यायची सांगा, कशी घ्यायची सांगा. त्याची चर्चा करायची नाही. पुन्हा असं बोलायचं नाही, असं सांगून टाकलं त्यांनी मला. एखादी गोष्ट त्यांच्यासाठी, त्यांच्या विचारांसाठी किंवा त्यांच्या संस्थेसाठी केल्यानंतर ती व्यक्ती लहान आहे की, मोठी आहे, याचा विचार त्यांनी कधी केला नाही. जो आपल्या शैक्षणिक आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये आपल्या बरोबर राहिला, त्याच्या सेवेतच आपण राहायचं, हे सूत्र त्यांनी कधी सोडलं नाही आणि ते शेवटपर्यंत निभावलं. म्हणून ही पहिलीच दुखवट्याची सभा असेल, मला अशा अनेक सभांना दुर्दैवाने जावं लागतं. ही सभा पाच वाचता सुरू झाली आणि टाचणी पडली तरी आवाज येईल, अशा प्रकारची शांतता इथं आहे. याच्यावरूनच पतंगरावांच्या संबंधी जनमानसामध्ये किती आस्था आहे, याचं दर्शन याठिकाणी होऊ शकतं. मंत्रिमंडळामध्ये त्यांनी काम केलं. पृथ्वीराज मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांना पतंगरावांच्या कामाचा जवळून अनुभव आला. त्यांना मदत करण्याची जबाबदारी यांच्याकडे होती आणि महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. लागोपाठ २–३ वर्षे. त्या वेळेला केंद्र सरकारने या कामाला मदत करण्यासाठी मंत्रिमंडळाची जी समिती नेमली, त्याचा अध्यक्ष मी होतो. मी, अर्थमंत्री आणि इतर काही ज्येष्ठ मंत्री अशी ती कमिटी असायची. मी महाराष्ट्राच्या दुष्काळी भागात जाऊन आल्यानंतर तिथे पाहिलं आणि पतंगरावांना संध्याकाळी फोन केला आणि सांगितलं की, पतंगराव या या भागामध्ये मी गेलो होतो. मला मोसंबीचं नुकसान झालेलं दिसतंय. शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. मला वाटतं की, काहीतरी मदत केली पाहिजे. सांगायचे की माझा प्रस्ताव तयार आहे. मी सांगायचो की, उद्या माझी अकरा वाजता मिटिंग आहे. ते म्हणायचे की, उद्या नऊ वाजता तुमच्या हातामध्ये माझा प्रस्ताव पडेल. आणि सकाळी नऊ वाजता तो प्रस्ताव माझ्या हातामध्ये यायचा. तो बैठकीमध्ये आम्ही घ्यायचो आणि कळवायचो की, इतके शेकडा कोटी रुपये आम्ही तुम्हाला मंजूर केले आहेत. पतंगरावांसमोर अशा संकटग्रस्त लोकांना संकटातून बाहेर काढण्याच्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याच्या मंजुरीची चर्चा केली तर क्षणाचाही विलंब न लावता त्यासंबंधीची मदत कशा पद्धतीने करता येईल, त्याचे निर्णय कसे करून घेता येतील, याबद्दलची खबरदारी ते घ्यायचे आणि याचं महत्त्वाचं कारण की, सामान्य माणसाशी बांधिलकी, हे त्यांच्या जीवनाचं एक वैशिष्ट्य होतं. अनेकांनी सांगितलं, सोनसळ त्यांचं गाव, दुष्काळी परिसर, पिण्याच्या पाण्यापासून सगळ्या समस्या आणि या सगळ्यावर मात करून ते पुढं आले. रयतच्या हडपसरच्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून लागले. त्याचा सार्थ अभिमान त्यांना होता. त्यांना एक दिवस मी विचारलं की, तुम्ही कुलपती झालात आता विद्यापीठाचे. ते म्हणाले की, कुलपती झालो असेल, पण हडपसरच्या शाळेमधला शिक्षक असताना जे मला आनंद आणि समाधान वाटलं, ते कुलपतीपेक्षा मोठं होतं. कारण रयतच्या संस्थेमध्ये काम करण्याची ती मला संधी होती आणि माझ्या जीवनातलं पहिलं स्थिरता लाभलेलं अशा प्रकारचं ते काम होतं. अशा सगळ्या गोष्टींबद्दल एक प्रकारची आस्था ठेवणारे, लोकांशी संबंध ठेवणारे होते.

आपल्याला महाराष्ट्रामध्ये त्यांचं काम माहीत आहे. पण दिल्लीमध्येसुद्धा भारती विद्यापीठाच्या उत्तम शाखा आहेत. दर्जेदार प्रशिक्षण देणारी अशा प्रकारची संस्था आहे. ती त्यांनी त्या ठिकाणी उभी केली. आणि आनंदाची गोष्ट अशी की, शैक्षणिक संस्था उभ्या राहतात, पण तुम्ही पतंगरावांच्या कुठल्याही शैक्षणिक संस्थेच्या प्रांगणामध्ये जा, तुम्हाला नीटनेटकेपणा दिसेल, वृक्षवल्ली त्या ठिकाणी दिसतील, बारकाईने लक्ष ठेवून बांधलेल्या इमारतींमध्ये चांगला आर्किटेक्चर नमुना बघायला मिळेल. तो सगळा कॅम्पस वेगळ्या पद्धतीने उभा राहिलेला आपल्याला बघायला मिळेल. कधीतरी कोणत्यातरी कन्व्होकेशनसाठी त्यांनी मला बोलवलं. मी त्यांना सांगितलं की, मला तुमचा कॅम्पस फार आवडतो. ते म्हणाले की, तुम्हीच एकदा सांगितलं होतं की, केम्ब्रिजला तुम्ही जा किंवा ऑक्स्फर्डमध्ये जा, तिथे जो कॅम्पस आहे त्या विद्यापीठाचा तिथे राहिल्यानंतर संस्कारक्षम वयामध्ये मुलांवर चांगले संस्कार होतात. चांगलं बघण्याची दृष्टी येते, चांगलं करण्याची दृष्टी येते. म्हणून माझाही तो प्रयत्न नेहमीच राहील. कुठेही संस्था उभी केली तरी त्याचा कॅम्पस हा नीटनेटकाच

असला पाहिजे. कारण प्रश्न हा इमारतीचा नाही, वास्तूचा नाही, वृक्षवल्लींचा नाही, तिथे येणाऱ्या लहान समाजातल्या, खेड्यापाड्यातल्या मुलामुलींच्या दृष्टीत बदल करण्यासंबंधीचा आहे. त्यामुळे ते काम नेटकंच झालं पाहिजे, हा माझा दृष्टिकोन आहे. असा सगळा दृष्टिकोन हा पतंगरावांचा होता. दृष्टी असलेला, कर्तृत्वसंपन्न, संधी मिळाली, नाही मिळाली तरी नाउमेद न होणारा माणूस होता. सुरुवातीला त्यांची महाराष्ट्राच्या विधिमंडळातील एंट्री ही काही सरळ सहज झालेली नव्हती. त्यांना अपक्ष म्हणून यावं लागलेलं होतं. पण आपली जी विचारधारा होती, तिच्यापासून ते जन्मभर बाजूला गेले नाही. ती विचारधारा त्यांनी कायम सांभाळली. हे सगळं करत असताना हे सगळं उभं केलं, ते उभं करताना ज्यांचे हात पाठीशी होते, त्यांचं विस्मरण त्यांनी कधी होऊ दिलं नाही.

मघाशी आपण इंद्रजीतचं भाषण ऐकलं. याठिकाणी आम्हाला आठवतंय, यशवंतरावजी मोहिते, ताई, आम्ही सगळे एका मंत्रिमंडळामध्ये होतो. यशवंतरावजी मोहितेंनी पतंगरावांना उत्तम साथ केली. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये अतिशय कर्तृत्ववान आणि बुद्धिमान व्यक्ती म्हणून ज्यांची ओळख ही देशाच्या संसदेमध्ये होती, त्या शंकरराव मोरेंचं अखंड स्मरण राहील अशा प्रकारचं काम हे पतंगरावांनी केलं, ते इतर पुणेकरांनीसुद्धा केलेलं नव्हतं. यशवंतरावांचं सातत्याने त्यांना होणारं मार्गदर्शन यामुळे यशवंतरावांविषयीची आणि मार्गदर्शन करणाऱ्या इतरांविषयीची आस्था ही पतंगरावांनी कायमची ठेवली होती, हे पतंगरावांचं वैशिष्ट्य आहे. चव्हाण साहेब असतील, अनेक लोक असतील, त्या सगळ्यांना आपल्या जीवनामधले एक मार्गदर्शक म्हणून सातत्याने बघण्याची भूमिका त्यांनी घेतलेली होती. त्यांच्यासमोर नतमस्तक होण्याची संधी त्यांनी कधीही सोडली नाही. बोलायला मोकळा-ढाकळा, म्हटलं तर रांगडा, योग्य असेल तर योग्य म्हणणारा आणि अयोग्य असेल तर फटकन सांगणारा माणूस होता.

रयत शिक्षण संस्थेच्या बैठकीमध्ये कधीतरी एखाद्या कोणी मला प्रश्न विचारले तर फटकन म्हणायचे, कसा प्रश्न विचारतोय. सांगितलं ना त्यांनी. चला मग पुढे. चर्चा नाही. अशा प्रकारे बैठकांमध्ये त्यांची आम्हाला खऱ्या अर्थाने सातत्याने मदत होत गेली. आज ते नाहीयेत. पण त्यांनी हिमालयासारखं काम करून ठेवलेलं आहे. ते काम शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये, सहकाराच्या क्षेत्रामध्ये आहे. साखर कारखाना उत्तम चालवला. राष्ट्रीय पातळीवरची पारितोषिके त्यांना देण्याची संधी आम्हा लोकांना मिळाली ती केवळ त्यांच्या सहकार क्षेत्रातील कर्तृत्वामुळे. सहकारी क्षेत्रातील त्यांची बँक ही एक आदर्श अशा प्रकारची बँक आहे. वस्तू भांडार आणि त्यांनी इथे घेतलेला उपक्रम हा उत्तम प्रकारचा उपक्रम आहे. आज आपण अलका टॉकीजच्या



शेजारी बघितल्यानंतर दिसते ती, ती मोठीच्या मोठी इमारत भारती विद्यापीठाच्या संबंधित विविध संस्थांचं काम तिथे चालतं. पुण्यामध्ये महत्त्वाचं योगदान देण्याची कामगिरी पतंगरावांनी त्या माध्यमातून केली. एक संपन्न दृष्टी असलेला, कर्तृत्वाने मोठा झालेला असूनही आपण कुठून आलो, याचे अखंड स्मरण संवेदनशीलपणे ठेवण्याची भूमिका घेणारा असा महाराष्ट्रातला एक कर्तृत्वसंपन्न नेता आज आपल्या सगळ्यांच्यामध्ये नाही. आमचा जीवाभावाचा सहकारी, मित्र आमच्यामध्ये नाही. त्याबद्दलची अस्वस्थता आणि दुःख जरूर आहे. ज्या वेळी मला कळलं की, ते आजारी आहेत, तेव्हा मी पुण्यात-सातारला याच भागात कुठेतरी होतो. तेव्हा मी माहिती घेतली. ताबडतोब सांगितलं माझ्या ड्रायव्हरला की, गाडी वळवायची आणि सरळ लीलावती हॉस्पीटलला जायचं. मला वाटतं की, रात्री मी तिथे पोहोचलो. त्यांना पाहिल्यानंतर लक्षात आलं की, बहुतेक ही आपली आणि पतंगरावांची शेवटचीच भेट आहे. डॉक्टरांचा प्रयत्न होता. पण मला कधी कधी आश्चर्य वाटलं की, या माणसाने हजारो डॉक्टर उभे केले, यांनी उत्तम प्रकारची मेडिकल कॉलेजेस उभी केली, जगाच्या आरोग्यासंबंधीची खबरदारी घेणारा वर्ग तयार केला. पण स्वतःच्या आरोग्याकडे इतकं दुर्लक्ष करावं? पण त्यांनी स्वतःच्या आरोग्याचा कधी विचार केला नाही. समाजाच्या आरोग्याचा विचार अखंडपणे केला. हाच त्याचा निष्कर्ष आहे. म्हणून त्यांचं स्मरण हे तुमच्या-आमच्या अंतःकरणामध्ये कायम राहील. त्यांच्याबद्दलची कृतज्ञता जी आपल्या सगळ्यांच्या अंतःकरणात आहे, तीच मी याठिकाणी व्यक्त करतो आणि आपली रजा घेतो.

●





# थक्क करणारे कर्तृत्व


**सुशीलकुमार शिंदे**
माजी केंद्रीय मंत्री, भारत सरकार आणि माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मी दिल्लीत बरीच वर्षे काढली. महाराष्ट्रातल्या लोकांना दिल्लीचे दरवाजे एवढे मोकळे नसतात. पण पतंगराव आले की, एका दिवसात मंत्र्यांना भेटायचे, पंतप्रधानांना भेटायचे, व्हाईस प्रेसिडेंटला भेटायचे, प्रेसिडेंटला भेटायचे आणि संध्याकाळी निघून जायचे. असा हा महाराष्ट्रातला एकच नेता होता की, ज्याच्याकरिता सगळ्यांची दारं उघडी असायची.**

आज बघता बघता पतंगरावांना जाऊन तेरा दिवस झाले. आज तेरावा दिवस. वाटतसुद्धा नाही की, पतंगराव आमच्यातून निघून गेले. सोनसळ, जिथे त्यांचा जन्म झाला, त्या सोनहिऱ्याचा सगळा भाग आणि त्या सोनहिऱ्याच्यामधला एक असा न घडवलेला हिरा ज्याने स्वतःला पैलू पाडत पाडतच आपलं आयुष्य उभं केलं आणि एवढं मोठं साम्राज्य निर्माण केलं की, त्याला दृष्ट लागावी, अशा प्रकारचं साम्राज्य निर्माण केलं. पतंगराव आमच्यामधून गेले. पण त्यांनी, बहुजन समाजामधल्या एका कार्यकर्त्याने शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये एवढं मोठं मार्गदर्शन केलं की, ज्याच्यामध्ये आगरकर, फुले, टिळक, या सगळ्यांनी जे योगदान दिलेलं होतं. विसाव्या शतकामध्ये एक लहान वयातला कार्यकर्ता एवढं मोठं कार्य करून जातो. पुढचा इतिहास जे लिहितील, त्यांना तोंडात बोट घालायला लावेल, अशा प्रकारचं कर्तृत्व त्यांनी करून दाखवलं.

एकदा धीरूभाई अंबानी, मी आणि काही लोक बसलेलो होतो. तेव्हा पतंगराव आले, त्यावेळी धीरूभाई लगेच म्हणाले की, 'ये देखो आया हमारे झिरो क्लब का मेंबर.' म्हणजे धीरूभाई हे झिरो क्लबमधून पुढे आलेले होते. पतंगराव देखील झिरो क्लबमधून पुढे आलेले होते. काहीही नसताना एवढं प्रचंड साम्राज्य निर्माण केलं. म्हणून देशातला एवढा मोठा उद्योगपती त्यांना आपल्या क्लबमध्ये घेतो, ही देखील एक अतिशय महत्त्वाची गोष्ट होती.

मी दिल्लीत बरीच वर्षे काढली. महाराष्ट्रातल्या लोकांना दिल्लीचे दरवाजे एवढे मोकळे नसतात. पण पतंगराव आले की, एका दिवसात मंत्र्यांना भेटायचे, पंतप्रधानांना भेटायचे, व्हाईस प्रेसिडेंटला भेटायचे, प्रेसिडेंटला भेटायचे आणि संध्याकाळी निघून जायचे. असा हा महाराष्ट्रातला एकच नेता होता की, ज्याच्याकरिता सगळ्यांची दारं उघडी असायची. मघाशी ज्याचा आमच्या माणिकरावांनी उल्लेख केला की, दर मंगळवारी दुष्काळाविषयी ते मिटिंग घ्यायचे. मीच ती प्रथा पाडलेली होती मुख्यमंत्री असताना. पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळाची परिस्थिती होती आणि त्या वेळेला सोनियाजी गांधी आलेल्या होत्या. त्या वेळेस






पतंगराव म्हणाले की, मी ह्या सगळ्या मिटिंग घेऊ का? मी त्यांना घ्या म्हटलं आणि त्याचे पूर्ण अधिकार त्यांना दिले. इतकंच नाही तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष असताना अडचणीच्या ठिकाणी मी पतंगरावांना पाठवत असे. आणि ते सगळे प्रश्न, अडचणी सोडवून येत असत. दुष्काळामध्येही त्यांनी प्रचंड काम केलं. त्यांनी माझ्याकडे आणलेली कुठलीही फाईल अतिशय परिपूर्ण असायची. त्यामध्ये परत काही तपासायला लागण्याची वेळ कधी आमच्यावर आली नाही. अशा प्रकारचा ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये पक्का असणारा एक माणूस.

पन्नास वर्षांच्या त्या फिल्ममध्ये आपण बघितलं असेल की, मी प्रणव मुखर्जी साहेबांच्या समोर म्हटलेलं होतं की, माझा एक सहकारी की ज्याने या क्षेत्रामध्ये एवढं मोठं काम उभं केलेलं आहे. तो मुख्यमंत्रिपदाच्या पात्रतेचा माणूस पण त्याला संधी मिळत नाही. कदाचित पतंगरावांचा स्वभाव. कधी कधी ते इतके फटकन् बोलायचे, काही लोकांना ते लागायचं. पण त्यांचं अंतःकरण एवढं मऊ होतं. एक असा हृदयस्पर्शी माणूस जो राजकारणात असून साहित्यावर ज्यांनी प्रेम केलं, ज्यांनी नाटकावर प्रेम केलं, ज्यांनी लोककलेवर प्रेम केलं, असा आमच्यामधला एक थोर नेता आयुष्यभर आम्हाला लक्षात राहील. पण त्यांनी दाखवलेलं कर्तृत्व उद्या येणाऱ्या पिढ्यांच्याही समोर कायम राहील. मला माहीत आहे की, शिवाजीराव हे अशाच प्रकारचे कर्तृत्ववान, विद्वान असे त्यांचे भाऊ आहेत. दुसरे भाऊ मोहनराव राजकारणामध्ये आहेत. पण ते बाजूला राहिले. हे अतिशय कौतुकास्पद आहे की, आपला भाऊ पतंगराव कदम मोठे नेतृत्व करतो आहे, तर त्याच्या पाठीमागे राहिलं पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या भावांना देखील मी त्याबद्दल धन्यवाद देतो. असं क्वचित घडतं की, आपला एक भाऊ एवढा मोठा होतो आहे आणि विद्वत्ता असली तरी आपण पाठीमागे, त्यांच्या सावलीमध्ये राहतो आहे. ही एक कठीण गोष्ट आहे. भविष्यातही या सगळ्यांची एकजूट अशीच कायम राहावी. पतंगरावांच्या जाण्यानं आमच्या काँग्रेस पक्षाचं मोठं नुकसान झालेलं आहे. त्यांचं बारीक-सारीक लक्ष असायचं. विशेषतः दुष्काळी भागामधल्या माणसांकडे आणि कार्यकर्त्यांकडे बारीक लक्ष असायचं. दुष्काळी भागातला एक सहृदयी नेता आज निघून गेलेला आहे, त्याला मी मनापासून श्रद्धांजली अर्पण करतो.

●



# निर्मल व्यक्तित्व



**राजीव शुक्ला**
नेते, काँग्रेस

**पतंगरावजी जो बात मन में है, वो कह देते थे, उन्हे समझते रहते थे। उनका चेहरा, उनका व्यक्तित्व आज भी हमारी यादों में सामने आ जाता है। उनकी लोकप्रियता कितनी थी इसका अंदाजा आप इसपर से लगा सकते है, कि सारे दलों के लोग आज उन्हे विनम्र श्रद्धांजली दे रहे है और ऐसी बाते बता रहे है, जो निश्चित रूपसे हर राजनीतिज्ञ को प्रेरणा देती है।**



पतंगरावजीसे मेरा कुल परिचय पंधरा वर्ष का था। और मैने उनके अंदर एक सबसे बडी विशेषता देखी कि भोलापन। सहजता और भोलापन, इनोसन्स जिसको बोलते है वो उनमें थी। जो बात मन में है बो सामने कहे जाते। कहेना चाहिए या नहीं कहेना चाहीए, इसके बारे में राजनीति के लोग दिमाग लगाते है, वो उस मामले में किसी जटिलता में नहीं पडते थे। जो बात मन में है, वो कह देते थे, उन्हे समझते रहते थे। उनका चेहरा, उनका व्यक्तित्व आज भी हमारी यादों में सामने आ जाता है। उनकी लोकप्रियता कितनी थी इसका अंदाजा आप इसपर से लगा सकते है, कि सारे दलों के लोग आज उन्हे विनम्र श्रद्धांजली दे रहे है और ऐसी बाते बता रहे है, जो निश्चित रूपसे हर राजनीतिज्ञ को प्रेरणा देती है। उनके विचारोंसे प्रेरित होकर काम करना चाहिए। राजनीति के अलावा शिक्षा क्षेत्र में भी उनका योगदान सबको पता है। मैं तो ये समझता हूँ के यह केवल हमारे काँग्रेस पार्टी की बहोत बडी हानी हुई, बल्की ये महाराष्ट्र के राजनीति की और देशके राजनीति की बहोत बडी हानी हुई है। मैं ईश्वर से यही प्रार्थना करुंगा के, उनके पुत्र विश्वजित को इतनी शक्ति दे की वो इस दुःख को सहे सके। हम लोग उनकी स्मृति को संजोये रखने के लिए हमेशा कार्यरत, प्रयासत रहे। बहोत बहोत धन्यवाद। हमारी उन्हे विनम्र श्रद्धांजली।



# बहोत बडा चिराग बुझ गया!




**गुलाम नबी आझाद**
ज्येष्ठ नेते, काँग्रेस, माजी केंद्रीय मंत्री

तुम्हारे बाद अंधेरा रहेगा महेफील में,
बहोत चराग जलाओगे रोशनी के लिए

तो आज एक ऐसा चिराग बुझ गया है और उस चिराग से जितनी रोशनी आती थी, उतनी रोशनी पैदा करने के लिए बहोत सारे चिराग जलाने पडेंगे। तो शायद तब भी उतनी रोशनी नहीं आएगी। पतंगराव कदमजी ही एक ऐसे बडे चिराग थे जिसकी रोशनी न बल्की सिर्फ उनके जिले में, न सिर्फ उनके डिव्हीजन में, न सिर्फ महाराष्ट्र में, पुरी भारत में और भारत की सीमाओं को पार करके भी है। जो विश्व के कई देशोंसे आज भारती विद्यापीठ में बच्चे शिक्षा प्राप्त करने के लिए आते है, भारतसे और पुरी दुनिया से, वहातक उनकी रोशनी गयी है। आप अगर याद करेंगे, दुनिया में बहोत सारे ऐसे लोग आए है, जिनकी बडी हम्बल बिगीनिंग हुई है, बडे पुंजीपती नहीं थे, बडे वीर नहीं थे, बडे विद्वान नहीं थे, ऑक्स्फर्ड में शिक्षा नहीं प्राप्त की थी, विदेश में शिक्षा

**पतंगराव कदमजी ही एक ऐसे बडे चिराग थे जिसकी रोशनी न बल्की सिर्फ उनके जिले में, न सिर्फ उनके डिव्हीजन में, न सिर्फ महाराष्ट्र में, पुरी भारत में और भारत की सीमाओं को पार करके भी है। जो विश्व के कई देशोंसे आज भारती विद्यापीठ में बच्चे शिक्षा प्राप्त करने के लिए आते है, भारतसे और पुरी दुनिया से, वहातक उनकी रोशनी गयी है।**



नहीं प्राप्त की थी, लेकिन वो बहोत बडे बडे लोग बन गये। और उनसे जो इन्स्पिरेशन मिली, उस इन्स्पिरेशन से कई लोग आगे बढे।

आज पतंगराव कदमजी एक व्यक्ती नहीं है, साधारण व्यक्ती नहीं है, बल्की भारत के लाखो-करोडो लोगों के लिए एक इन्स्पिरेशन है। किस तरह से टिचर होकर काम करते है, उनकी उमर के लोग जो देशभरमें टिचर होंगे हजारों की, लाखोंकी तैदाद में, रिटायर हुए होंगे, जिनके सपने नहीं थे, जिन्होने सपना नहीं देखा, जिनमें ख्वाब नहीं था, जिनके पास इतना व्हिजन नहीं था, वो रिटायर्ड होके बैठ गये, रिटायर्ड के पेन्शन पे चव रहे है। लेकिन इनके पास हिम्मत थी, व्हिजन थी, और आज एक इतना बडा इन्स्टिट्यूट बनाया। मैं पिछले ३०-३५ सालोंसे उनको जानता हूँ और विशेष रूपसे जब ९० में जब नरसिंह राव जी प्राईम मिनीस्टर थे और मैं सिव्हील एव्हीएशन मिनीस्टर था, तब कई दफा हमने चर्चा की दिल्ली में, डिम्ड युनिव्हर्सिटी बनेगी। एखाद दफा हम दोनों ने मिल के नरसिंह राव जी से बात भी की। बहोत शौक था उनको, इस फिल्ड को आगे बढाने का। टेक्निकल एज्युकेशन उसने प्राप्त हो, मेडिकल कॉलेजेस हो, रिसर्च हो, और जब ये डिम्ड युनिव्हर्सिटी बनी, तो इतने खूश हुए।

२०१२ दिसंबर मैं जब हेल्थ मिनीस्टर था, उस वक्त कन्व्होकेशन के लिए उन्होने मुझे चिफ गेस्ट बुलाया था, तो उन्होंने कहा की देखो, एक दफा हम सपना देखते थे, तो वो सपना अब पुरा हो गया और कितना विशाल बन गया। दिसंबर २०१२ में उनके जो एज्युकेशन इन्स्टिट्यूशन्स की संख्या १६७ थी, और मुझे बताया गया के वो संख्या २१५ के करीब हो गयी है। कितना ये विस्तार है, सिर्फ ५-६ साल ही तो हुए है तबसे। इसमें भी ४०-५० स्कूल्स और इन्स्टिट्यूशन्स बढ गये, दो लाख से जादा स्टूडंटस्, देश के और विदेशी साडे नौ हजार के करीब फॅकल्टी. टिचिंग अॅन्ड नॉन टिचिंग फॅकल्टी, बहोत सारे स्टेटस् में जितनी फॅकल्टी ना हो, या स्टुडंटस् ना हो, पुरे युनिव्हर्सिटी में हो। तो आप अंदाजा लगा सकते है। की व्हिजन कितना उस व्यक्ती का और व्हिजन के साथ साथ हिंमत कितनी थी। मैं आज यही कहूंगा की वो एक एज्युकेशनिस्टस् थे। खुद भी पढे और दुनिया को भी पढाया। फिलांथ्रॉफीस्टस् थे और गरीब परिवार से थे। बहोत सारे लोग हमारे देश में भी गरीबसे अमिर बन गये लेकिन फिर उनको कोई ये कहे की वो गरीब थे, तो उनको बुरा लगता था। गाली लगती थी। बट ही वुड फिल प्राऊड की जब उनको कोई कहता था की, ये गरीब परिवार से आकर बडे बने। उन्होने दिमाग से उसे भुलाया नहीं। और जो शिक्षा प्राप्त करने आए, उनकी फिस माफ की। सेकडो लोग आए। कश्मीर से बहोत बच्चे आए, जम्मू के बच्चे आए। मैने दर्जनो बच्चों की फीस माफ करायी। कभी जब इन्होने दिल्ली में ब्रांच खोली थी, इन्स्टिटयूट की, तो ये फार्म लेके आते थे जम्मू-कश्मीर के बच्चो के लिए। की अगले महिनेसे कोर्स शुरू हो रहा है, तो फार्म भरवा दिजीए उनसे और में कलेक्ट करवा लूंगा। किसमें आज इतनी रुची है, किसमें दिलचस्पी है, इतना काम वो करते थे।

बहोत सारे लोग ये कहते है के ये दोस्तों के दोस्त है। बहोत सारे लोगों के बारे में ये कहा जाता है। ये दोस्तोके दोस्त के साथ से दुश्मनो के भी दोस्त थे। मैं नहीं समझता की इनका कोई दुश्मन है। अब यहाँ आप देखते है, पॉलिटिकल पार्टी, सब राजनैतिक दल है। किसीको नहीं लगता की वो दुसरी दल का था, तो उनके बारे में कम कहा जाए। जीनको अब मै सुन रहा था- मुख्यमंत्रीजी ने उनके बारे में अच्छा बोला, एनसीपी वालोंने अच्छा बोला, काँग्रेस वालोने उससे बढकर बोला। अगर वो अच्छे व्यक्ती नहीं थे तो, दुसरे दल के लोग इतना अच्छा उस व्यक्ती के बारे में नहीं बोल सकते। स्ट्रेट फॉर्वर्ड थे, खाने के बडे शौकीन थे । तो आज मैं यही कहूंगा की एक बहोत बडा नुकसान महाराष्ट्र का हुवा है, देश का हुवा है और एज्युकेशन सिस्टम का भी हुवा है। एक बहोत बडा चिराग बुझ गया है। उस चिराग को, जो देश का चिराग था, वो विश्वजित के पिता थे, वो एक लडकी के बाप और एक पत्नी के पती भी थे। लेकिन इसके साथ मेरे ख्याल में देश के भी एक बहोत नॅशनलिस्ट, एज्युकेशनिस्ट और भारत के सुपुत्र थे, जो भारत ने खो दिया है। मैं आज उनको अपनी तरफ से श्रद्धांजली तो अर्पित करता ही हूँ, लेकिन इसके साथ यूपीए चेअरपर्सन सोनियाजी गांधी की तरफसे और काँग्रेस अध्यक्ष श्री. राहुल गांधीजी की तरफसे भी श्रद्धांजली अर्पित करता हूँ। असल में, काँग्रेस अध्यक्ष श्री. राहुल गांधीजी को यहाँ आना था, कल उन्होने मुझे फोन किया की मुझे इस शोक सभा में जाना था, लेकीन मुझे पता नहीं था के कर्नाटक कें दो दिनो के प्रोग्रॅम लगे है और चिफ मिनीस्टरने मुझे याद दिलाया। तो उन्होने कहा की मेरी तरफ से वहा जाओ और उस शोक समारोह में हिस्सा लो। तो मै उनकी तरफ से, अपनी पार्टी की तरफ से, सोनिया गांधीजी की तरफ से इस शोक समारोह में यह श्रद्धांजली अर्पित करता हूँ। भगवान से, अल्ला से दुवा करता हूँ की विश्वजित को, उनकी माता को, उनकी बहेन को भगवान ताकद दे, शक्ती दे, यह बहोत बडा सदमा बर्दाश करने की। मैने जैसे कहा की वो हम सब की सांझी संपत्ती थी, जिसको हम सबने खो दिया है। भगवान उनकी आत्मा को शांती दे।

●





# जिंदादिल मित्र

**प्रकाश जावडेकर**
केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री

**मी गेली पंधरा वर्षे दिल्लीकर आहे. प्रवक्ता म्हणून असतानाही ते माझ्याकडे यायचे. आता मी मंत्री झाल्यानंतर दोन-चार महिन्यांनी तर ते यायचेच. प्रकाश.. अशी जोरदार हाक मारून यायचे. त्यांना खूप खुशी असायची त्यामध्ये. आम्ही घेतलेल्या चांगल्या निर्णयाचे ते मुक्त कंठाने कौतुक करायचे. एका अर्थाने कामाला वाहून घेतलेले, सदा हसतमुख असणारे आणि सगळ्या प्रकारचे अनुभव घेत घेत आपल्या संस्थेला देशपातळीवर नाव मिळवून देणारे असे एक व्यक्तिमत्त्व त्यांचे होते.**

आज बालगंधर्व रंगमंदिरामध्ये जमलेले पतंगरावांचे सर्व स्नेही. पतंगरावांच्या अचानक झालेल्या निधनामुळे आपल्या सगळ्यांनाच दुःख वाटतंय, म्हणून श्रद्धांजलीसाठी आपण एकत्र आलो आहे. पतंगराव हे खऱ्या अर्थाने जिंदादिल असं व्यक्तिमत्त्व होते. एक शिक्षक यशवंतराव मोहित्यांच्या विश्वासाला पात्र ठरून एसटी महामंडळाचे सदस्य होतात. मग भारती विद्यापीठ स्थापन करतात. म्हणजे एक शाळा किंवा कॉलेज काढायचं आणि त्याला विद्यापीठ म्हणायचं याला मोठं धाडस लागतं. मग विद्यापीठासारखा त्याचा मोठा विस्तार करून दाखवणं याला तर खूप मोठं धाडस लागतं. त्यांचा माझा ४२ वर्षांचा परिचय होता. कारण १९७५ साली मे महिन्यामध्ये पुणे विद्यापीठाच्या सिनेटच्या निवडणुका झाल्या. पदवीधर मतदारसंघातून मी आणि ते दोघेही निवडून आलो. मुजुमदार हे प्राध्यापक वर्गातून निवडून आले. त्यानंतर आम्ही सातत्याने भेटत राहिलो. त्यांच्या संस्थेचा विस्तार होत गेला. मला






**“आपल्या एका स्नेह्याचा मृत्यू होतो, तेव्हा तो थोडा आपलासुद्धा मृत्यू असतो, कारण त्याच्याविषयीचा एक कोपरा रिकामा होतो. असं एक चतुरस्र व्यक्तिमत्त्व आज आपल्यातून गेलं, याचं सगळ्यांना दुःख आहे. मी माझ्यातर्फे, माझ्या पक्षातर्फे आणि सरकारतर्फे त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.”**

आठवतंय, पूर्वी एसपी कॉलेज, फर्गसन कॉलेज, वाडिया कॉलेज अशा प्रमुख प्रस्थापित कॉलेजमध्येच मुलांना प्रवेश हवा असायचा. त्यामुळे विद्यापीठामध्ये दरवेळी मागणी असायची की, ह्यांना जागा वाढवून द्या. त्या वेळेला पतंगरावांनी एक भांडण केलं आणि त्यात तत्त्व होते की, ज्या वेळेला आमचे वर्ग तयार आहेत, आमच्या कॉलेजला मान्यता आहे, तर काही कॉलेजेसना कोरडं ठेवून आणि काही कॉलेजेसना जागा वाढवून देणं हा अन्याय नाही का? मग त्यांचं हे म्हणणं मान्य झालं आणि त्यातून सगळ्या कॉलेजेसना विद्यार्थी मिळायला लागले. त्यातील काही कॉलेजेसची गुणवत्ता खूप चांगली वाढली. हिकमतीने त्यांनी त्याचा इतका मोठा विस्तार केला की, त्या विस्ताराची एक वेगळी कहाणीच आहे. पण यामध्ये त्यांची सातत्याने काही ना काही करण्याची भूमिका असायची.

आतासुद्धा मी गेली पंधरा वर्षे दिल्लीकर आहे. प्रवक्ता म्हणून असतानाही ते माझ्याकडे यायचे. आता मी मंत्री झाल्यानंतर दोन-चार महिन्यांनी तर ते यायचेच. प्रकाश.. अशी जोरदार हाक मारून यायचे. त्यांना खूप खुशी असायची त्यामध्ये. आम्ही घेतलेल्या चांगल्या निर्णयाचे ते मुक्त कंठाने कौतुक करायचे. एका अर्थाने कामाला वाहून घेतलेले, सदा हसतमुख असणारे आणि सगळ्या प्रकारचे अनुभव घेत घेत आपल्या संस्थेला देशपातळीवर नाव मिळवून देणारे असे एक व्यक्तिमत्त्व त्यांचे होते. त्याला माणुसकीची किनारही होती. त्यांचं निधन हे एका अर्थाने अचानक झाले. कारण ५-६ महिन्यांपूर्वीच ते माझ्याकडे आले होते. त्या वेळेला आमची भेट झाली, बऱ्याच गप्पा झाल्या. त्या वेळी कधीच वाटले नाही की, त्यांना काही आजार झाला आहे आणि ते आपल्यात राहणार नाहीत. त्यांच्या आत्म्याला निश्चित शांती मिळेल. शेवटी माणसाच्या आठवणी उरतात, त्याप्रमाणे त्यांच्या अनेक आठवणी आपल्या बरोबर राहतील. आपल्या एका स्नेह्याचा मृत्यू होतो, तेव्हा तो थोडा आपलासुद्धा मृत्यू असतो, कारण त्याच्याविषयीचा एक कोपरा रिकामा होतो. असं एक चतुरस्र व्यक्तिमत्त्व आज आपल्यातून गेलं, याचं सगळ्यांना दुःख आहे. मी माझ्यातर्फे, माझ्या पक्षातर्फे आणि सरकारतर्फे त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो. ●



# उत्तुंग नेत्यांच्या मांदियाळीतला नेता



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**पतंगराव एक अत्यंत उत्तम अशा प्रकारचे व्यक्ती होते. गरिबातल्या गरीब, श्रीमंतातल्या श्रीमंत, छोट्या-मोठ्या प्रत्येकाला आपलंसं वाटावं असं एक चुंबक त्यांच्याकडे होतं. त्यांच्या संपर्कात आलेली व्यक्ती ही त्यांची व्हायची. आणि मग अनेकांनी ज्याचा उल्लेख केला अशा प्रकारचे पारस्पारिक संबंध ते तयार करायचे, की त्या व्यक्तीवर त्यांचा अधिकार असायचा. सभागृहामध्ये अनेक वेळा आम्ही बघितलं की, ते मंत्री असताना एखादं उत्तर द्यायचे आणि उत्तरावर आमचं समाधान झालं नाही आणि आम्ही त्याच्यावर प्रतिप्रश्न विचारायला लागलो, तर पतंगरावांमध्ये ती क्षमता होती की, आमच्यासारख्या कोणालाही 'बस आता, आता याच्यापुढे काही बोलू नको' असं ते म्हणायचे आणि त्याच्यावर कोणीही त्यांना उलट बोललं नाही की, 'तुम्ही असं कसं म्हणता?' हा अधिकार त्यांनी मिळवला होता.**

शोकाकुल जनहो,

डॉ. पतंगरावजी कदम यांना श्रद्धांजली वाहण्याकरिता आज आपण सर्व उपस्थित आहोत. आणि प्रत्येकालाच असं वाटतंय की ही वेळ इतक्या लवकर कशी आली? डॉ. पतंगराव कदमांनी आपल्या जीवनामध्ये एक अत्यंत उत्तुंग अशा प्रकारचा प्रवास केला. अत्यंत सामान्य कुटुंबामध्ये जन्माला आल्यानंतर अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये त्यांनी संपूर्ण शिक्षण पूर्ण केलं. अनेक वेळा हे सांगितलं जातं की, भारती विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अलीकडच्या काळामध्ये कोणीही त्यांच्याकडे गेलं की, त्याची पूर्ण फी माफ करा, त्याची फी अर्धी करा, अशा प्रकारचा निर्णय ते घ्यायचे. पण त्याच्यापाठीमागे कारण असं होतं, की ज्या वेळी ते शिकत होते आणि शिकताना त्यांच्याजवळ फी भरायला पैसे नव्हते, त्या वेळी दीड रुपयाची सवलत मिळविण्याकरिता ३२ वेळा त्यांना चकरा माराव्या लागल्या आणि



त्यानंतर त्यांना दीड रुपयाची सवलत मिळाली. ते त्यांच्या मनामध्ये नेहमीच राहिलं की, ज्या हालाखीच्या परिस्थितीमध्ये मी शिकलो, तशात एखाद्या गरिबाच्या मुलाला शिकायचं असेल तर त्याला कोणीतरी मदत केली पाहिजे आणि त्या भावनेतूनच त्यांनी सातत्याने मदत केली. पंधरा रुपये खिशात घालून साताऱ्याला बस पकडली, पुण्याला आले आणि अत्यंत संघर्षातून एक मोठं विश्व डॉ. पतंगराव कदमांनी उभं केलं. भारती विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षणक्षेत्रातलं अजोड काम त्यांनी उभं केलं आहे, एक सामान्य माणूस, सामान्य घरचा माणूस इतकं मोठं कार्य उभं करू शकतो, हे पाहून खरोखर आपणदेखील थक्क होतो. अशा प्रकारचं ते काम आहे. ज्या ज्या क्षेत्रामध्ये काम करायचं, तिथे उत्तमच काम करायचं, मग ते राजकीय क्षेत्र असो, शिक्षण क्षेत्र असो, सहकार क्षेत्र असो. साखर कारखाना चालवायचा तर तो उत्तमच असला पाहिजे. देशामध्ये त्याचा क्रमांक आला पाहिजे. कुठलीही इन्स्टिट्यूट चालवायची तर ती उत्तमच असली पाहिजे, असा त्यांचा सातत्याने आग्रह राहिला.

पण या सगळ्याच्या पलीकडे पतंगराव एक अत्यंत उत्तम अशा प्रकारचे व्यक्ती होते. गरिबातल्या गरीब, श्रीमंतातल्या श्रीमंत, छोट्या-मोठ्या प्रत्येकाला आपलंसं वाटावं असं एक चुंबक त्यांच्याकडे होतं. त्यांच्या संपर्कात आलेली व्यक्ती ही त्यांची व्हायची. आणि मग अनेकांनी ज्याचा उल्लेख केला अशा प्रकारचे पारस्पारिक संबंध ते तयार करायचे, की त्या व्यक्तीवर त्यांचा अधिकार असायचा. सभागृहामध्ये अनेक वेळा आम्ही बघितलं की, ते मंत्री असताना एखादं उत्तर द्यायचे आणि उत्तरावर आमचं समाधान झालं नाही आणि आम्ही त्याच्यावर प्रतिप्रश्न विचारायला लागलो, तर पतंगरावांमध्ये ती क्षमता होती की, आमच्यासारख्या कोणालाही 'बस आता, आता याच्यापुढे काही बोलू नको' असं ते म्हणायचे आणि त्याच्यावर कोणीही त्यांना उलट बोललं नाही की, 'तुम्ही असं कसं म्हणता?' हा अधिकार त्यांनी मिळवला होता. किंबहुना मला असं वाटतं की, विविध लोकांशी त्यांचे जे संबंध होते, ते एकेरी नावाने बोलवायचे, त्यांचे ते मोठेपण होतं. पण अगदी खरं आहे की, मघाशी कोणीतरी सांगितलं की, एकेरी नावाने बोलवलं नाही, तर ते पतंगराव वाटायचेच नाहीत. कारण त्यांच्या त्या वागण्यामधलं जे प्रेम होतं आणि माझ्यावर तर त्यांचं प्रचंड प्रेम होतं. माझ्या वडिलांशी त्यांचा जवळचा संबंध आला होता. त्यामुळे मी जेव्हा सभागृहात आलो, त्या वेळी त्यांनी मला



सांगितलं की, कधीही काही असलं की माझ्याकडे जरूर ये, कधीही काहीही मदत लागली तरी ये. आणि मीदेखील अनेक वेळा हक्काने त्यांच्याकडे जायचो. आणि हे संबंध त्यांनी नेहमीच जपले. अशा प्रकारचं व्यक्तिमत्त्व जे खऱ्या अर्थाने प्रत्येकाला आपलंसं वाटावं.

एखाद्या विषयावर बोलताना पतंगरावजी कधीही चिंता करायचे नाहीत. आश्वासन देतानाही चिंता करायचे नाहीत. एखादी मागणी केली, की ती आपल्याला पूर्ण करता येईल की नाही? अनेक वेळा मंत्री असताना किंवा मुख्यमंत्री असताना आम्ही विचार करतो की, आपल्या अधिकाऱ्याला एकदा विचारून घ्यावं, आश्वासन द्यायचं आहे, ते आपल्याला पूर्ण करता येईल की नाही ते. त्यांनी कधी अधिकाऱ्यांचा विचार वगैरे केला नाही. एकदा मनाला पटलं की ते आश्वासन देऊन मोकळे व्हायचे. आणि अनेक वेळा त्या आश्वासनाचा पाठपुरावा करताना त्या अधिकाऱ्यांना बोलवून 'मी आता सांगितलं आहे, ते तुम्हाला करावं लागेल. मी आश्वासन दिलं आहे, त्यामुळे त्याची पूर्तता झाली पाहिजे,' अशा अधिकारवाणीनं ते सांगायचे. जसा त्यांचा संबंध सामान्य कार्यकर्त्यांशी होता, राजकीय नेत्यांशी होता, आमदारांशी होता, तसाच त्यांचा अतिशय घरगुती अशा प्रकारचा संबंध अधिकाऱ्यांशी देखील होता. तेवढ्याच अधिकारवाणीनं ते त्यांना सांगायचे आणि त्यांचं ऐकलं देखील जायचं. खरं म्हणजे पतंगरावांच्या अनेक आठवणी आपल्याला सांगता येतील, आपल्यापैकी अनेकांजवळ त्यांच्या अनेक प्रकारच्या आठवणी असतील. ते आजारी असताना त्यांना भेटायला हॉस्पीटलला गेलो, त्या वेळी पहिल्यांदा मी असे पतंगराव पाहिले की जे झोपलेले होते. अन्यथा अत्यंत हसरे, बोलणारे, हास्यविनोद करणारे, जोरात आवाज देणारे असेच पतंगराव मला नेहमी पाहायला मिळाले. आणि त्या दिवशी विश्वजितने जी खंत बोलून दाखवली, ती आपल्या सर्वांना आहे. विश्वजित असं म्हणाला की, खरं म्हणजे यांना आम्हाला जगाच्या पाठीवर कुठेही नेता आलं असतं, पण पतंगरावांनी आम्हाला ती संधीच दिली नाही. इतक्या कमी कालावधीत त्यांची तब्येत खालावली. आणि त्यातून पतंगरावजी अचानक आपल्यातून निघून गेले. आपल्यापैकी कोणालाही असं वाटलंही नाही की, एवढ्या वेगानं पतंगरावजी आपल्यातून निघून जातील.

मला असं वाटतं, की एक अत्यंत उत्तुंग अशा प्रकारचा नेता, अनेकांचा मार्गदर्शक, अनेकांच्या कुटुंबाचा सदस्य असलेली व्यक्ती अशा प्रकारचे पतंगराव. एक शिक्षणमहर्षी म्हणून आपण त्यांच्याकडे पाहतो. सहकारात काम केलेले पतंगराव. अशा प्रकारचं व्यक्तिमत्त्व जेव्हा आपल्यातून निघून जातं, त्या वेळी खरोखरच समाजाकरिता ही एक मोठी हानी असते. आज केवळ विश्वजित, मोहनराव किंवा त्यांच्या परिवाराची ही हानी नाहीये, तर मला असं वाटतं की, महाराष्ट्रातल्या अनेक उत्तुंग नेत्यांच्या मांदियाळीतला एक नेता पुन्हा आपण हरवला आहे. मी ईश्वराकडे प्रार्थना करतो की, ईश्वराने हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबाला द्यावी. जे कार्य भारती विद्यापीठाच्या माध्यमातून आणि इतर संस्थांच्या माध्यमातून पतंगरावजींनी सुरू केलं आहे, ते तसंच अव्याहतपणे पुढे जात राहावं. त्यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वाच्या माध्यमातून नवनवीन कार्यकर्ते घडत राहावे. ज्या लीलया त्यांनी राजकारणामध्ये आणि समाजसेवेमध्ये आपलं कार्य केलं, त्याच सहजतेने सर्वांना कार्य करण्याची प्रेरणा मिळावी, हीच याप्रसंगी मी प्रार्थना करतो. महाराष्ट्राच्या संपूर्ण जनतेच्या वतीनं पतंगरावजींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

●

**“ एखाद्या विषयावर बोलताना पतंगरावजी कधीही चिंता करायचे नाहीत. आश्वासन देतानाही चिंता करायचे नाहीत. एखादी मागणी केली, की ती आपल्याला पूर्ण करता येईल की नाही? अनेक वेळा मंत्री असताना किंवा मुख्यमंत्री असताना आम्ही विचार करतो की, आपल्या अधिकाऱ्याला एकदा विचारून घ्यावं, आश्वासन द्यायचं आहे, ते आपल्याला पूर्ण करता येईल की नाही ते. त्यांनी कधी अधिकाऱ्यांचा विचार वगैरे केला नाही. एकदा मनाला पटलं की ते आश्वासन देऊन मोकळे व्हायचे. आणि अनेक वेळा त्या आश्वासनाचा पाठपुरावा करताना त्या अधिकाऱ्यांना बोलवून 'मी आता सांगितलं आहे, ते तुम्हाला करावं लागेल. मी आश्वासन दिलं आहे, त्यामुळे त्याची पूर्तता झाली पाहिजे,' अशा अधिकारवाणीनं ते सांगायचे. ”**



# चमत्कार वाटावा असा मानदंड



**डॉ. श्रीपाल सबनीस**
ज्येष्ठ समीक्षक, माजी अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

**आज महाराष्ट्राचा आणि भारताचा भूगोल ओलांडून जगभर या विद्यापीठाचा लौकिक पसरला आहे. दुबईपर्यंत या विद्यापीठाच्या शाखा पोहोचल्या. १८० शाखांचा कारभार, पाच लाख विद्यार्थ्यांचा पसारा, दहा हजार कर्मचाऱ्यांचे संसार हे एका शून्य जगणाऱ्या माणसाने उभे केलेले आहेत.**

दुःखात बुडालेले आपण सर्व मित्र जनहो, मृत्यूची अपरिहार्यता आणि अटळता तुम्हाआम्हा सर्वांच्या अनुभवाची, जीवनातील एक अविभाज्य भाग. डॉ. पतंगराव कदम यांचं जीवन हे केवळ एका कुटुंबापुरतं, केवळ एका संस्थेपुरतं, एका राज्यापुरतं, एका क्षेत्रापुरतं मर्यादित नव्हतं. म्हणूनच वेगवेगळ्या क्षेत्रांतील, विविध वयोगटांतील, वेगवेगळ्या प्रवाहांतील, वेगवेगळ्या जातिधर्मांतील लोकांचा गोतावळा या शोकसभेला खऱ्या आत्मीयतेनं आणि खरीखुरी श्रद्धांजली अर्पण करण्याकरता उपस्थित आहे. आपल्यापैकी बहुसंख्य लोकांवरती डॉक्टर कदम यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ऋण आहेत. आपली त्यांच्याशी कधीतरी भेट झाली असली पाहिजे. मी पुण्यात नवीन असल्यामुळे माझी भेट, संपर्क, भावनात्मक नातं असं कुठलंही नाही. तरीही या माणसाच्या सार्वजनिक जीवनाचा जो अभ्यास तटस्थपणे करता आला, अनुभवता आला, तो अत्यंत आश्चर्यकारक अशा प्रकारचा आहे.

सगळ्यांना मृत्यू अटळ असला तरी मृत्यूच्या श्रद्धांजली सभेतून, शोकसभेतून नव्या पिढीला, जिवंत असणाऱ्यांना प्रेरणा मिळू शकते का, तर होय. डॉ. पतंगराव कदम यांच्या या शोकसभेतूनसुद्धा शून्यातून जीवन कसं उभं करावं, शून्याचं मूल्य संस्कृतीच्या प्रवाहात शिक्षणाच्या माध्यमातून, समाजसेवेच्या माध्यमातून, राजकारण, समाजकारण यांच्या माध्यमातून कसं विकसित करावं, समाज आणि संस्कृती कशी जपावी, नाती कशी काळजामध्ये शिल्लक ठेवावीत, राष्ट्रीयत्व कसं जोपासावं, मानवतेचा धर्म जाति-धर्मापलीकडे जाऊन कसा निभावावा, सेवेचा आणि सत्तेचा काय संबंध आहे, या सर्व कुटिल अशा प्रश्नांची उत्तरं डॉ. पतंगराव कदमांच्या कृतिशील जीवनातून मला सापडलेली आहेत. सोनहिऱ्याचा हा हिरा, सोनसळ गावाच्या मातीचा गंध प्राशन करून पुण्यासारख्या शहरामध्ये झेपावतो तेव्हा खिशामध्ये फक्त काही रुपये आणि हातात पत्र्याची एक पेटी असते. दहा बाय दहाच्या छोट्या चार भिंतींच्या खोलीत एक मॅट्रिक्युलेट मुलगा विद्यापीठ काढतो. आपण त्या चित्रफितीमध्ये लक्षपूर्वक पाहिलं असेल की, फक्त एक ते दीड फुटाची त्या विद्यापीठाची पाटी आहे. आज महाराष्ट्राचा आणि भारताचा भूगोल ओलांडून






जगभर या विद्यापीठाचा लौकिक पसरला आहे. दुबईपर्यंत या विद्यापीठाच्या शाखा पोहोचल्या. १८० शाखांचा कारभार, पाच लाख विद्यार्थ्यांचा पसारा, दहा हजार कर्मचाऱ्यांचे संसार एका शून्य जगणाऱ्या माणसाने उभे केलेले आहेत. म्हणूनच पतंगरावांच्या जीवनाचं मूल्य हे पाच मिनिटांच्या शोकसभेच्या भाषणामध्ये संपणार नाही. संपू शकत नाही. यशवंतराव चव्हाण, पी.व्ही. नरसिंहराव, प्रणव मुखर्जी, अब्दुल कलाम यांसारख्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त राजकीय नेतृत्वांच्या गोतावळ्यातील लोकांचा आशीर्वाद आणि कृपा लाभलेले पतंगराव, समकालीन शरद पवारांसह सर्वच राजकीय वर्तुळामध्ये आकर्षणाचं, आत्मीयतेचं केंद्र राहिले. त्यांच्या संस्थेमध्ये जात-धर्माच्या पलीकडील मुस्लीम, हिंदू धर्मातील अठरा पगड जातीचे नोकरदार याठिकाणी आले. म्हणूनच या माणसातील देवत्व केवळ भारती विद्यापीठाच्या चौकटीत बंदिस्त करता येणार नाही.

आपल्या विद्यापीठाचे नाव भारती विद्यापीठ ठेवताना १८-१९ वर्षांच्या त्या मुलामध्ये राष्ट्रीय भावना किती जागरूक असली पाहिजे, याचा मी अंदाज बांधतो. तसेच आपल्या मुलाचे नाव विश्वजित असे ठेवताना विश्वाला जिंकणारा आपला मुलगा असावा, हा ध्येयवाद डोळस दूरदृष्टीच्या बापामध्ये किती मोठ्या प्रमाणात रुजला होता, हे लक्षात येतं. राष्ट्रीयत्वाचं आणि विश्वाचं नातं आपल्या संस्थेच्या शैक्षणिक वारशामध्ये आणि कुटुंबाच्या वारशामध्ये एकात्म करणारा डोळस असा ग्रामीण भागातला, फाटक्या घरात प्रतिकूलतेमध्ये जगणारा हा शेतकऱ्याचा मुलगा आहे. आपले राज्य आणि देश शेतकरीप्रधान आहे. या शेतकऱ्यांच्या आयुष्यातील दुःखाला बाजूला ठेवून, प्रतिकूलतेवर मात करून एक माणूस २० वर्षे मंत्री होतो, वेगवेगळी खाती यशस्वीपणे सांभाळतो, सहा वेळा आमदार म्हणून जिंकून येतो, त्याचबरोबर समाजसेवेचे अनेक प्रकल्प उभे करतो, सहकारातल्या सूतगिरण्या असोत, साखर कारखाना असो. हे उद्योग गरीब कुटुंबांच्या भरणपोषणासाठी निर्माण झाले. शिवाय दुष्काळातल्या जनावरांच्या चाऱ्यासाठी छावण्या आणि मरणाऱ्या माणसाला दिलासा देण्यासाठीसुद्धा त्यांची सबंध ही सहकारी चळवळ आणि प्रकल्प उपयोगी पडले.

असा हा माणूस साहित्यामध्ये, संस्कृतीमध्ये रमला. ग.दि. माडगुळकर असोत, पु.ल. देशपांडे असोत, विजय तेंडुलकर असोत, रावसाहेब कसबे असोत, नरेंद्र जाधव असोत, अनेक जाति-धर्माच्या प्रवाहातील सांस्कृतिक मानदंड त्यांनी पचवले, त्यांनी पेलले, त्यांच्या सहवासाला अर्थपूर्णता आणि सांस्कृतिक अर्थ प्राप्त झाला, करुणेचं मूल्य जाणणारं, माणुसकीचं मूल्य



**❝ झोपडीतल्या माणसाची बांधिलकी मानणारा, वैभवी आणि सबंध सांस्कृतिक श्रीमंती जगणारा, सांस्कृतिक मूल्यात्मकतेचे डोंगर उभे करणारा डॉ. पतंगरावांसारखा माणूस महाराष्ट्राला नेहमीच वंदनीय राहील. प्रेरक राहील, मार्गदर्शक राहील. ❞**

सिद्ध करणारं आणि समता आणि लोकशाहीचा विचार आपल्या शिक्षण आणि कृतिशीलतेतून आपल्या धार्मिक आणि लोकशाही असणाऱ्या देशात समंजसपणे रुजवणारं व्यक्तित्व आणि नेतृत्व महाराष्ट्रामध्ये विरळ आहे. एक माणूस एका क्षेत्रामध्ये निश्चित उत्तुंग होऊ शकतो. झालेली माणसं आहेत. पण एकच डॉ. पतंगराव, शिक्षणामध्येही आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त, राजकारणामध्येही आकर्षक असणारं आणि मानदंड म्हणून शोभणारं व्यक्तित्व, सहकारामध्ये, संस्कृतीच्या क्षेत्रामध्ये उत्तुंग अशी झेप घेणारी परिमाणं, हा चमत्काराचा भाग आहे. मला पूर्ण खात्री आहे की, पुढच्या काही पिढ्यांमध्ये पतंगरावांची ही चित्रफीत आणि त्यांच्यावरचं लेखन जर आपण पाहिलं तर २० व्या आणि २१ व्या शतकातील हा चमत्कार वाटावा, एवढा सर्व पातळीवरचा, सर्व प्रवाहातला एक जबरदस्त यशस्वी मानदंड म्हणून आहे.

विश्वजितच्या खांद्यावर आलेली ही जबाबदारी पार पाडत असताना, वारसा कसा जोपासला, हे सांगून मी एक मिनिटामध्ये माझं बोलणं संपवणार आहे. एका झोपडीतला एक माणूस सिनिअर प्राध्यापकाची नेमणूक होत असताना त्या माणसाच्या शैक्षणिक पात्रता तर पूर्ण झाल्याच पण त्या माणसाचं जीवन झोपडीमधलं आहे आणि त्या झोपडीतल्या माणसाची नेमणूक केली पाहिजे, ही निवडप्रक्रियेमधील माणुसकीचं दर्शन घडविणारी घटना विश्वजित कदमच्या निर्णयप्रक्रियेमध्ये मला ऐकायला मिळाली. त्याचं उदाहरण म्हणजे सदाशिव पाटील नावाचा ग्रामीण भागातला झोपडीत राहणारा एक साधा माणूस. त्याला न्याय देण्याची भूमिका विश्वजितच्या वारशामध्ये आली, त्याचं मुख्य श्रेय पतंगराव कदमांचं आहे. झोपडीतल्या माणसाची बांधिलकी मानणारा, वैभवी आणि सबंध सांस्कृतिक श्रीमंती जगणारा, सांस्कृतिक मूल्यात्मकतेचे डोंगर उभे करणारा डॉ. पतंगरावांसारखा माणूस महाराष्ट्राला नेहमीच वंदनीय राहील. प्रेरक राहील, मार्गदर्शक राहील. मी त्यांच्या आत्म्याप्रति आदर व्यक्त करतो आणि आदरांजली अर्पण करतो. धन्यवाद.

●




# आधुनिकतेची ओढ असणारे पतंगराव



**डॉ. शां. ब. मुजुमदार**
कुलपती, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ

पतंगराव आणि माझ्या मैत्रीला या वर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. १९७४ साली पुणे विद्यापीठाचा नवीन कायदा निर्माण झाला. त्या वेळी सिनेटमधून कार्यकारिणीवर निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीमध्ये पतंगराव, नाशिकचे विठ्ठलराव हांडे, धुळ्याचे पी.ए. दलाल, पुण्यातले डॉ. संगमनेरकर, गरवारे कॉलेजचे दादासाहेब जंबगिरी आणि मी अशा आम्ही सगळ्यांनी स्वतंत्र असा एक गट तयार केला. आम्ही सगळेजण तिथे निवडून आलो. एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये किंवा कार्यकारिणीमध्ये असताना अनेक सदस्य एकमेकांवर कुरघोडी करीत होते, चर्चा करीत होते, भांडत होते. त्या वेळी पतंगरावांनी कार्यकारिणीमध्ये असलेल्या सदस्यत्वाचा फार चतुराईने उपयोग करून घेतला. त्यांनी पारंपरिक शैक्षणिक संस्था न सुरू करता फार्मसी, व्यवस्थापन, कॉम्प्युटर, टेलिकम्युनिकेशन अशा आधुनिक पद्धतीच्या संस्था विद्यापीठातर्फे मिळवून

**त्या वेळेची पुण्यातील परिस्थिती फार मजेशीर होती. त्या वेळी अनेक जुन्या संस्था होत्या, त्या पारंपरिक अभ्यासक्रम देत होत्या. पण त्यांच्यामध्ये एक प्रकारची शिथिलता आली होती. पूर्वी मिळवलेल्या वैभवावर त्यांचं समाधान झालं होतं. जुनं त्यांना सोडायचं नव्हतं आणि नवं काही घेण्याची त्यांची मानसिकता नव्हती. अशा परिस्थितीमध्ये पुण्याबाहेरून पतंगरावांसारखी एक व्यक्ती इथे येते आणि आधुनिक पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी संस्था निर्माण करते, ही मोठी बाब आहे.**





**पतंगराव त्यानंतर राजकारणात गेले, मी शिक्षणक्षेत्रातच राहिलो. पण पतंगरावांच्या बाबतीत एक फार आग्रहपूर्वक सांगावंसं वाटतं की, पतंगरावांनी शिक्षण आणि राजकारण या दोन माध्यमांतून समाजकारण केलं. त्यांनी शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांचा एक छानसा त्रिकोण निर्माण केला. या त्रिकोणाच्या प्रत्येक कोनाला त्यांनी समान वागणूक दिली. हे माझ्या मते पतंगरावांचे मोठेपण आहे.**

घेतल्या. त्या वेळेची पुण्यातील परिस्थिति फार मजेशीर होती. त्या वेळी अनेक जुन्या संस्था होत्या, त्या पारंपरिक अभ्यासक्रम देत होत्या. पण त्यांच्यामध्ये एक प्रकारची शिथिलता आली होती. पूर्वी मिळवलेल्या वैभवावर त्यांचं समाधान झालं होतं. जुनं त्यांना सोडायचं नव्हतं आणि नवं काही घेण्याची त्यांची मानसिकता नव्हती. अशा परिस्थितीमध्ये पुण्याबाहेरून पतंगरावांसारखी एक व्यक्ती इथे येते आणि आधुनिक पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी संस्था निर्माण करते, ही मोठी बाब आहे.

पुण्यात आधुनिक शिक्षण देण्याची पहिली सुरुवात कोणी केली असेल, तर माझ्या मते ती पतंगराव कदमांनी केलेली आहे. त्या वेळी पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीमध्ये पुणे शहरातल्या लोकांचे वर्चस्व असायचं. पण १९७४ च्या निवडणुकीनंतर हे चित्र बदललं आणि ग्रामीण भागातील जे काही संस्थापक होते, संचालक होते, त्यांना योग्य नेतृत्व मिळालं आणि त्यामुळे पुण्यातल्या एका शैक्षणिक संस्थेच्या मार्गदर्शनाखाली अनेक ठिकाणी निरनिराळ्या व्यावसायिक संस्था सुरू झाल्या. माझ्या मते त्याचं श्रेय थोड्याफार प्रमाणात पतंगराव कदमांना जातं. १९८३च्या दरम्यान वसंतदादा पाटलांनी व्यावसायिक शिक्षणाचं खासगीकरण केलं. पतंगरावांनी दोन्ही हातांनी ती संधी पकडली आणि त्यातून त्यांनी इंजिनिअरिंग आणि मेडिकल कॉलेजेसची सुरुवात केली. पतंगराव कदमांनी हा जो काही पायंडा पाडला, तोच पायंडा त्यानंतर अनेक वेळा, अनेक ठिकाणी, अनेक संस्थाचालकांनी चालू ठेवला. पतंगराव कदम ज्या ज्या वेळी कार्यकारिणीमध्ये असत, त्या वेळी ते चर्चेमध्ये हिरिरीने भाग घेत असत. त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण होते. ते जिथे जातील तिथे स्वतः आपण पहिल्या नंबरचे असावे, अशी एक ऊर्मी त्यांच्यामध्ये असायची.

पतंगराव त्यानंतर राजकारणात गेले, मी शिक्षणक्षेत्रातच राहिलो. पण पतंगरावांच्या बाबतीत एक फार आग्रहपूर्वक सांगावंसं वाटतं की, पतंगरावांनी शिक्षण आणि राजकारण या दोन माध्यमांतून समाजकारण केलं. त्यांनी शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांचा एक छानसा त्रिकोण निर्माण केला. या त्रिकोणाच्या प्रत्येक कोनाला त्यांनी समान वागणूक दिली. हे माझ्या मते पतंगरावांचे मोठेपण आहे. मी माझ्यातर्फे, माझ्या सिंबायोसिस संस्थेतर्फे त्यांना आदरांजली वाहतो. माझी अशी खात्री आहे की, त्यांच्यानंतर विश्वजित कदम त्यांचीच परंपरा पुढे चालू ठेवतील. विश्वजितला मला एकच सांगायचं आहे की, संस्थापक होणं अवघड असतं, संस्थापकाचा वारस होणं हे त्याहून अवघड असतं. त्याच्यासाठी त्यांना तुमच्या-आमच्या शुभेच्छा, आशीर्वाद आहेत, त्याचबरोबर त्यांना सहकार्यही मिळेल, अशी मला खात्री आहे. माझ्यावतीने त्यांना पुन्हा एकदा श्रद्धांजली वाहतो आणि माझे दोन शब्द थांबवतो. धन्यवाद.

●



# जिव्हाळा जपणारा माणूस



**डॉ. बाबा आढाव**
ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते

**त्या माणसाचं माणूसपण फार मोठं होतं. म्हणजे आमच्याबरोबर असलेले, माझ्या दवाखान्यात आलेले पतंगराव आणि पुढे शिवनेरीवर एका कामानिमित्त त्यांना भेटायला गेल्यानंतर खाली रस्त्यावर येऊन निरोप देणारे पतंगराव. किंवा अगदी सहा महिन्यांपूर्वी सांगलीला एक समारंभ झाला. माझ्या एका मित्राला कार द्यायची होती आणि पतंगराव तिथे आलेले होते. त्या वेळेचे पतंगराव. विलक्षण होतं हे. त्यांचं मानव्य हे वेगळंच होतं. त्यांच्या मानव्याचा, त्यांच्या भरारीचा, पतंगाच्या भरारीचा खूप गौरव आपण करतो आहोत. तो मायाळू माणूस होता. कोणाशी औपचारिक संबंध ठेवत नसत. त्यांचा जिव्हाळा वेगळा होता कारण जिव्हाळा निर्माण करण्याची मोठी देणगी त्यांना लाभली होती.**

पतंगरावांचे नाव पतंग कसे ठेवले असेल, याचा मी विचार करतो. पतंगराव स्वयंभू होते. ते स्वयंभू तर होतेच पण पतंगाची भरारी काय आहे, हे आपण सगळेजण ऐकतो आहोत. परंतु, मला सुरुवातीला सांगितलं पाहिजे की, पतंगराव रयत शिक्षण संस्थेत होते. तिथे शिकले होते, अर्धवेळ शिक्षक होते आणि हडपसरला ते शिक्षक असताना मीही हडपसरला होतो. पतंगरावांनी पुढे ही भरारी घेतली, भारती विद्यापीठ, अभिमत विद्यापीठाची. आमचं महाराष्ट्र आरोग्य मंडळसुद्धा त्याच काळात तयार झालं. हा माणूस बहुजन होता. 'कमवा आणि शिका' किंवा त्याच्या आधीच्या पिढीने जे सांगितलं की, 'शिका, संघटित व्हा,' त्यातून त्यांनी शिक्षणाचा हा ध्यास घेतला.

पतंगराव बहुजन होते, शिक्षणक्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व उत्तुंग होते. पुण्यासारख्या शहरात अकरा मजली इमारतीचा पहिला मान त्यांच्याकडे जातो. प्रश्न असा येतो की, बहुजनांना केवळ आधुनिक शिक्षण घ्यायचं होतं, की जुन्या सनातनी, पारतंत्र्याच्या





विचारांच्या विळख्यातून बाहेर पडायचं होतं. पतंगराव स्वभावाने मुक्त होते. पण समाजाचं काय झालं? आज शिक्षण अफाट वाढलं आहे. आज एवढे विद्यार्थी, १८० संस्था. रयतचे शरदरावजी अध्यक्ष आहेत. रयत शिक्षण संस्थेनंतर शिक्षणक्षेत्रातील हा वेगळा, जो सगळा पसारा आहे, मला दिसतं ते असं की, रयतच्या उभारणीमध्ये असलेली सबंध ऐतिहासिक मांडणी आणि भारती विद्यापीठाची उभारणी आणि पतंगरावांचं काम. त्यातून सबंध जे बदल घडले आहेत, त्या बदलांच्याबरोबर स्वतः पतंगराव हेदेखील जुळवत गेलेले आहेत.

त्या माणसाचं माणूसपण फार मोठं होतं. म्हणजे आमच्याबरोबर असलेले, माझ्या दवाखान्यात आलेले पतंगराव आणि पुढे शिवनेरीवर एका कामानिमित्त त्यांना भेटायला गेल्यानंतर खाली रस्त्यावर येऊन निरोप देणारे पतंगराव. किंवा अगदी सहा महिन्यांपूर्वी सांगलीला एक समारंभ झाला. माझ्या एका मित्राला कार द्यायची होती आणि पतंगराव तिथे आलेले होते. त्या वेळेचे पतंगराव. विलक्षण होतं हे. त्यांचं मानव्य हे वेगळंच होतं. त्यांच्या मानव्याचा, त्यांच्या भरारीचा, पतंगाच्या भरारीचा खूप गौरव आपण करतो आहोत. तो मायाळू माणूस होता. कोणाशी औपचारिक संबंध ठेवत नसत. त्यांचा जिव्हाळा वेगळा होता कारण जिव्हाळा निर्माण करण्याची मोठी देणगी त्यांना लाभली होती.

महाराष्ट्रामध्ये आपण जी परंपरा मानतो, फुले, शाहू, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज या परंपरेमागच्या विचारांचा धागा शिक्षणामार्फत आपल्याला किती पुढे नेता आला? माझे त्याबद्दलचे मत एवढेच आहे की, बहुजनांना शैक्षणिक परिवर्तनाचा अजेंडा ठरवता आला नाही. विज्ञानाच्या झपाट्यात ते आपोआप होईल, या एका कल्पनेत राहिलो. आता तरी त्याचा आपण विचार करू शकू का? मला वाटतं की, अशा तऱ्हेचा विचार सुरू झाला तर ती पतंगरावांना फार मोठी श्रद्धांजली ठरेल. आर्थिक विषमता भयानक वाढली आहे. जातीपातींचे काय चालले आहे, ते आपण पाहतो आहोत. पुण्यात शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणसम्राट खूप आहेत. मित्रांनो, तुम्हाला माझी एवढीच कळकळीची विनंती की, त्यांच्या विद्यापीठाला त्यांनी भारती विद्यापीठ नाव दिलं. त्यांना 'भारती' हे नाव कसं सुचलं, हासुद्धा माझ्यापुढे एक पेच आहे. यातील भारती आणि संविधानाच्या माध्यमातून, सहकाराच्या माध्यमातून, राजकारणाच्या माध्यमातून हा नवा भारत घडविण्याचं जे स्वप्न आहे, ते साकार करायचं असेल तर विचारांची मांडणी जरा वेळोवेळी तपासावी लागते. पतंगरावांनी ते काम केले.

माझा अतिशय सहृदय मित्र होता तो. त्यांचे मित्रत्व अतिशय वेगळे होते, माझ्यापेक्षा वयाने ते लहान होते. हडपसरला भेटलेला हा माणूस आज कुठल्या कुठे गेला. परत मला असं वाटतं की, तो जो जुना धागा आहे रयतच्याबरोबर आणि रयतचा धागा महाराष्ट्रातील बहुजनांच्या चळवळीबरोबर, त्या चळवळीचा धागा सत्यशोधक चळवळीबरोबर आणि त्याच्या पाठीमागे आहेत शिवाजी महाराज. मी त्यांना आदरांजली अर्पण करतो.

●





# गरुड उडून गेला, आठवणींची पिसं ठेवून!

**सिंधुताई सपकाळ**
ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या

पतंगरावांचा जिथे जिथे कार्यक्रम असेल तिथे तिथे ते मला बोलवायचे आणि मी हमेशा लेट जायचे. पण मी लेट गेल्यानंतर जिथे असतील तिथून पतंगरावांनी जोरात आवाज द्यायचा, 'अरे, थांबा रे. तिला बोलू द्या. तिला बोलू द्या.' आणि आज पतंगरावांनी आवाज दिला नाही. कुठेतरी काळजात गलबललं. माझ्या चित्रपटाला पुरस्कार मिळाला लंडनला, त्याचं सगळं श्रेय पतंगरावांना जातं. माझी स्वतःची मुलगी ज्यांनी सांभाळून, डबल ग्रॅज्युएट करून माझ्या पदरात टाकली, म्हणून मला अनाथांची माय होता आलं. माहिती तपासा बीएएमएस, एमबीबीएस, वकील असं काय काय शिकले आहेत. नर्सेस झाल्या आहेत माझ्या मुली या विद्यापीठातून. मी अनाथांची माय झाले पण माझ्या लेकरांना सांभाळण्याचं काम पतंगरावांनी केलं. आज हा गरुड उडून गेला आहे आणि आठवणींची चार पिसं उरली आहेत खाली.

**फार मोठे योगदान आहे भारती विद्यापीठाचे. कुठली लेकरं मी कचऱ्यातून उचललेली, पदरात घेतलेली, सांभाळलेली. पतंगरावांनी त्यांच्यात ऊर्जा भरली. शिवाजीरावांनी तर जिवाचं रान केलं. विशेष म्हणजे बापाच्या पावलावर पाऊल टाकून आमचा विश्वजितसुद्धा आज हे पुढे चालवतोय. गलबलला आहे, आतून हालला आहे थोडासा. बेटा, बाप गेलाय रे. पण तो तुझा एकट्याचा बाप नव्हता बेटा. दीनदुबळ्यांचा बाप होता. ज्यांना कोणी नाही, त्यांचा बाप होता रे बाळ.**





> **खूप संस्था आहेत पुण्यामध्ये. एकच संस्था अशी आहे की, जिने सिंधुताई सपकाळांच्या लेकरांवर पांघरूण घातलं, त्यांना शिकवलं, कुठलीही फी घेतलेली नाही. पतंगरावांचं आणि भारती विद्यापीठाचं ऋण मला आयुष्यभर फेडता येणार नाही.**

फार मोठे योगदान आहे भारती विद्यापीठाचे. कुठली लेकरं मी कचऱ्यातून उचललेली, पदरात घेतलेली, सांभाळलेली. पतंगरावांनी त्यांच्यात ऊर्जा भरली. शिवाजीरावांनी तर जिवाचं रान केलं. विशेष म्हणजे बापाच्या पावलावर पाऊल टाकून आमचा विश्वजितसुद्धा आज हे पुढे चालवतोय. गलबलला आहे, आतून हालला आहे थोडासा. बेटा, बाप गेलाय रे. पण तो तुझा एकट्याचा बाप नव्हता बेटा. दीनदुबळ्यांचा बाप होता. ज्यांना कोणी नाही, त्याचा बाप होता रे बाळ. माझी पोरं परदेशात आहेत. पण कोणी केलं हे? त्या भारती विद्यापीठाचं योगदान मला आयुष्यभर विसरता येणार नाही. भारती विद्यापीठाचं मोठं आभाळ आज बाजूला गेलेलं आहे, ऊन तापायला लागलंय परिस्थितीचं. म्हणून आपण एकच करूया, एक गरुड उडून गेला, आठवणींची पिसं मागे आहेत. भारती विद्यापीठ मागे आहे. माझी मुलं भारती विद्यापीठातच आहेत. कितीतरी मुली माझ्या नर्सिंग करतायेत. शिवाजीरावांनी कधीही माझ्याकडून फी घेतली नाही. विश्वजितने कधीही मला नाकारलं नाही आणि पतंगरावांकडे तर माझा हट्टच असायचा.

आज कुठेतरी काळजात खड्डा पडला आहे. खरं म्हणजे अशी देवमाणसं, देव लवकरच का नेतो, काय माहिती? तुम्हाला एक सांगते की, महाराष्ट्रात मरायचं असेल तर मोठं व्हावं लागतं. मोठं झाल्यानंतर माणसं जिथे मरतात, त्याचं नाव महाराष्ट्र आहे. सगळी जुगलबंदी जगण्याची. आज पतंगराव निघून गेले. माझी लेकरं अस्वस्थ झालीत. बेचैन झाली आहेत. नर्सिंगला असलेल्या माझ्या मुली दररोज फोन करतात, 'माई, काहीतरी हरवल्यासारखं वाटतंय माय.' मी म्हणते, 'हे हरवलेपण आता कायम राहणार आहे. त्याला आपण सांभाळलं पाहिजे, काही इलाजच नाहीये.' तरी पण बेटा विश्वजित, खूप मोठी जबाबदारी तुझ्या खांद्यावर येऊन पडली आहे. आणि हळव्या मनाचे शिवाजीराव. आज त्यांच्या काळजातली पोकळी सांगता येणार नाही.

मी हमेशा सांगायचे पतंगरावांना की, पतंगराव तुम्ही भारती विद्यापीठाचे मेरुमणी आहात. १०८ मणी म्हणजे हे विद्यापीठ सांभाळणारे इतर सगळे आहेत. पण अंडर ग्राउंड जो दोरा आहे माळेचा, तर तो शिवाजीराव आहेत. आज मेरुमणी निघून गेला. मणी जरा इकडे-तिकडे घरंगळायला लागले. शिवाजीराव, काळीज जरा मोठं करा. बेटा विश्वजित, चालू असलेली परंपरा खंडित करू नको. ती तशीच चालू राहू दे रे. अनंत उपकार तुझ्या बापाचे माझ्यावर आहेत बाळा. कोणामुळे अनाथांची माय म्हणून घ्यायचे मी. खूप संस्था आहेत पुण्यामध्ये. एकच संस्था अशी आहे की, जिने सिंधुताई सपकाळांच्या लेकरांवर पांघरूण घातलं, त्यांना शिकवलं, कुठलीही फी घेतलेली नाही. पतंगरावांचं आणि भारती विद्यापीठाचं ऋण मला आयुष्यभर फेडता येणार नाही. देव त्यांच्या आत्म्याला शांती देवो, बाबा. माझी स्वतःची पोरगी त्यांनी काळजाजवळ लावली, संगोपन केलं. असंख्य लेकरं घडवली माझी. मी निमित्तमात्र आहे बाळा. माझी सगळी लेकरं मोठं करण्याचं काम पतंगरावांनी केलं आहे. असे उठून गेले, कळलंच नाही. अशीच जातात ही मोठी माणसं.

आपण मात्र तो वसा पुढे चालवायचा आहे. गरुड निघून गेला आहे, पिस खाली पडलं आहे, त्याला आपण उचलायचं आहे. बेटा, बापाने चालवलेला वसा असाच पुढे चालव. दुःखीतांचं, गरिबांचं, अनाथांचं, टाकलेल्यांचं, रडणाऱ्यांचं भलं कर. रडत जाणाऱ्या माणसाला त्यांनी नेहमी हसत परत पाठवलं. ही परंपरा शिवाजीराव, मोहनराव आणि विश्वजित तुम्ही चालवा बेटा. खूप लोकांना तुमची गरज आहे रे. त्यांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत. आम्हीपण तुमच्यासोबत आहोत.

●



# लोकसेवेचं व्रत



**डॉ. के.एच. संचेती**
ज्येष्ठ अस्थिरोग तज्ज्ञ

**आम्ही हॉस्पीटल मोठं करत असताना सांगायचे की, मला घरातून स्टेशनला जाताना चारआणेसुद्धा खर्च करायला नव्हते. त्यामुळे मी पायी जायचो. तर 'मेहनत करायला तू मागे-पुढे बघू नकोस आणि अनाठायी खर्च होऊ देऊ नकोस,' हा दुसरा कानमंत्र त्यांनी मला दिला की, ज्याचा आजपर्यंतच्या माझ्या आयुष्यात मला उपयोग होत आहे.**

मी १९६५ साली प्रॅक्टिस सुरू केली आणि एक-दोन वर्षातच डॉ. पतंगराव कदम पेशंट म्हणून माझ्याकडे आले. गप्पा मारल्या, बोलणं-चालणं झालं आणि त्यांचं व्यक्तित्व पाहिल्यानंतर मी त्यांच्याकडे आकर्षित झालो. त्यानंतर आमच्या ओळखीचं रूपांतर मैत्रीत झालं. त्यानंतर गावाकडची कोणी माणसं असतील, नातेवाईक असतील, आई असतील तर त्यांना घेऊन यायचे ते आणि मग आमच्या गप्पा सुरू व्हायच्या. या गप्पांमध्ये काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी बोलायचो, एकमेकांना सांगायचो. माझं छोटंसं दहा बेडचं हॉस्पीटल होतं. त्यांनी पाहिलं आणि म्हणाले, 'डॉक्टर, इतकं छोटं हॉस्पीटल नाही पाहिजे, आपल्याला मोठं हॉस्पीटल करायचं आहे. खूप मोठं करायचं आहे, लोकांची सेवा जास्त करायची आहे.' असा कानमंत्र सारखा ते माझ्या कानात द्यायचे. त्यानंतर मी हॉस्पीटल विस्ताराचा अभ्यास सुरू केला आणि मोठं हॉस्पीटल करण्याची जी जिज्ञासा त्यांनी माझ्यात निर्माण केली होती ती जोपासली. पुढे मोठं हॉस्पीटल झालं.





बारंवार भेटी होत असल्याने त्यांचा आणि माझा संपर्क असा वाढत गेला की, ते गावाकडून जेव्हा माणसं घेऊन यायचे, तेव्हा ते मला सांगायला लागले की, 'बघ डॉक्टर. आपल्या गावाच्या माणसाला कधी विसरायचं नाही. छोट्यात-छोटा माणूस असला तरी, त्याची इतकी सेवा करायची की तो आणि मी आपण दोघेही देवाची लेकरं आहोत.'

आम्ही हॉस्पीटल मोठं करत असताना सांगायचे की, मला घरातून स्टेशनला जाताना चारआणेसुद्धा खर्च करायला नव्हते. त्यामुळे मी पायी जायचो. तर 'मेहनत करायला तू मागे-पुढे बघू नकोस आणि अनाठायी खर्च होऊ देऊ नकोस,' हा दुसरा कानमंत्र त्यांनी मला दिला की, ज्याचा आजपर्यंतच्या माझ्या आयुष्यात मला उपयोग होत आहे. पुढे भारती विद्यापीठाचं मेडिकल कॉलेज सुरू झालं आणि तिथे हॉस्पीटल बांधण्याचं प्रयोजन आलं. त्यांनी मला बोलवून ते हॉस्पीटल बांधण्याची कन्सल्टन्सी मला दिली आणि सांगितलं की, डॉक्टर, हे सगळं हॉस्पीटल तू बांधायचंस. नंतर मी त्याचा अभ्यास केला. त्यांच्याकडे मी जायचो, बोलायचो. माझ्याबरोबर बऱ्याच ठिकाणी ते हॉस्पीटल बघायला पण यायचे आणि त्याच्यातील छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये रस घेऊन त्यातील ज्ञान ते मिळवायचे. मार्गदर्शन करायचे. दर महिन्याच्या मिटिंगला ते स्वतः यायचे आणि दर आठवड्याच्या मिटिंगला लक्ष्मणासारखे असलेले त्यांचे भाऊ शिवाजीराव यायचे, पुढचा सगळा कार्यभार चालवायचे. अगदी राम-लक्ष्मणासारखी या भावांची जोडी होती. घरातला मोठा भाऊ एवढे मोठे काम करतो आहे आणि धाकटा ते सगळं सांभाळतो आहे, हे आपल्याला कदम परिवारात पाहायला मिळतं.

हे सगळं पाहताना आपण त्यांची वाटचाल अनेक लोकांकडून ऐकलेली आहे. पण एक दुसरी गोष्ट मला आपल्याला खास सांगाविशी वाटते आहे. पतंगरावांच्या पत्नी, विजयमाला नाव त्यांचं. त्यांचा उल्लेख मला का करावासा वाटतो तर, पतंगराव ऐनवेळी २५-५० माणसांना घरी आणायचे. त्यांना भेटायला आलेला गावाकडचा माणूस उपाशी गेलेला त्यांना कधीही चालायचे नाही. या सगळ्या लोकांचे जेवणखाण करणे, देखभाल करणे त्यांच्या सौभाग्यवती विजयमालाताई बघायच्या. आता अशा माणसाला अशी एक साथ मिळाल्यानंतर पुढे प्रगती होत गेली. त्यांचं घरामध्ये तसं फार लक्ष नसायचं. सगळे काही विजयमालाताई बघायच्या. एकदा त्यांचा एक मित्र विश्वजित लहान असताना म्हणाला की, 'कारे पतंगराव, कितवीत आहे विश्वजित.' त्यावर 'सांग गं, हा कितवीत आहे ते,' असं पतंगरावांनी विचारलं. तर हे पण त्यांच्या लक्षात नसायचं. इतकं घरातलं सगळं विजयमालाताई बघायच्या. अशा तऱ्हेचे ऋणानुबंध निर्माण झालेला विश्वजित त्यांच्या रूपाने आपल्यामध्ये आहे. आज दोन गोष्टी मला कराव्याशा वाटतात. डॉक्टर पतंगराव कदमांना श्रद्धांजली अर्पण करावीशीच वाटते, आणि त्याचबरोबर पतंगराव आणि विजयमालाताई या दोघांच्या कार्याचे बाळकडू घेतलेल्या विश्वजितला शुभेच्छा द्याव्याशा वाटतात. जी परंपरा पतंगरावांनी निर्माण केली आहे, ती तू चांगली वाढवावी आणि ती चांगली चालवावी, अशी सदिच्छा देऊन माझे दोन शब्द संपवतो.

●





# नावीन्याचा ध्यास

**संजय किर्लोस्कर**
प्रसिद्ध उद्योगपती

मी खरं राजकारणातला माणूस नाही. मी पहिल्यांदा पतंगरावांना १९८३ साली भेटलो. किर्लोस्करवाडीला पहिल्यांदाच मी गेलो होतो. त्यांनी मला त्या वेळेलाच बजावून सांगितलं होतं की, 'संजय, मी तुझा आमदार आहे. विसरू नकोस कधी.' एक छोटंसं फंक्शन होतं. तांबटकाका अनाथालय मला वाटतं, अन् तिथं त्यांनी स्वयंपाकाची बरीच भांडी दान केली होती. मी त्यांना खरं त्या वेळेला पहिल्यांदा भेटलो. त्यानंतर बरेच वेळा त्यांना भेटण्याची मला संधी मिळाली. कधीही मला असं वाटलं नाही की, ते मला निराश करतील. कोणताही प्रॉब्लेम असला तरी ते सतत माझ्या बाजूनं उभे राहिले. माझे वडील लवकर गेले, त्याच्यानंतर माझे आजोबा गेले. दोन्ही वेळेला त्यांनी मला सांगितलं की, संजय, मी आहे तुझ्याबरोबर, हे कधीही विसरू नकोस. तसं बघितलं तर कारखान्यात बऱ्याच वेळेला यायचे. नवीन काय आहे मला दाखव, असं म्हणायचे. नवीन टेक्नॉलॉजी

**माझे वडील लवकर गेले, त्याच्यानंतर माझे आजोबा गेले. दोन्ही वेळेला त्यांनी मला सांगितलं की, संजय, मी आहे तुझ्याबरोबर, हे कधीही विसरू नकोस. तसं बघितलं तर कारखान्यात बऱ्याच वेळेला यायचे. नवीन काय आहे मला दाखव, असं म्हणायचे. नवीन टेक्नॉलॉजी कोणती आली आहे, नवीन काय केलं आहेस? इतका इंटरेस्ट मी राजकारणातल्या दुसऱ्या कोणत्याही माणसामध्ये बघितला नाही. दरवेळेला भेटलो की, हाच प्रश्न की काय तू नवीन केलयंस आणि माझ्यासाठी ते प्रोत्साहन देणारं होतं, कारण त्यामुळे मलाही वाटायचं की नवीन काहीतरी करत राहिलं पाहिजे.**



कोणती आली आहे, नवीन काय केलं आहेस? इतका इंटरेस्ट मी राजकारणातल्या दुसऱ्या कोणत्याही माणसामध्ये बघितला नाही. दरवेळेला भेटलो की, हाच प्रश्न की काय तू नवीन केलयंस आणि माझ्यासाठी ते प्रोत्साहन देणारं होतं, कारण त्यामुळे मलाही वाटायचं की नवीन काहीतरी करत राहिलं पाहिजे. २००० साली किर्लोस्करवाडीची ९० वर्षे पूर्ण झाली. त्या वेळी १५-२० हजार लोकांच्या उपस्थितीत एक कार्यक्रम झाला, त्या वेळेला पतंगराव होते, जयंतराव होते. आर.आर. पाटील असे त्या भागातलेच मंत्री होते. त्या वेळी पतंगरावांनी न घाबरता उपस्थित कामगार कर्मचाऱ्यांना सांगितलं की, मॅन्युफॅक्चरिंग ही जी इंडस्ट्री आहे त्यामध्ये आता इथं जास्त जॉब्ज निर्माण होणार नाहीत. तुम्ही नवीन काहीतरी शिकायला पाहिजे. त्या वेळी मला वाटलं की, खरंच हा माणूस वेगळा आहे जरा.

त्या वेळेची त्यांची इतकी दूरदृष्टी की, नवीन टेक्नॉलॉजी येते आहे, ती आपल्या भागातही उद्या येणार आहे आणि त्यासाठी आपण सगळे तयार असायला पाहिजे. २०११ साली पुन्हा एक कार्यक्रम होता. या कार्यक्रमाचे जे प्रमुख पाहुणे होते त्यांनी शेवटच्या क्षणी मी येणार नाही, असं मला सांगितलं. मी पतंगरावांना फोन केला. ते म्हणाले, 'संजय, हेलिकॉप्टर पाठवतोस का? मी जे काही आहे ते सगळं सोडून येतो.' हे जे प्रेम होतं त्यांचं माझ्यावर आणि कंपनीवर, ते मी कधीही विसरू शकणार नाही. माझ्या वतीने आणि माझ्या कुटुंबाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो.

●



# स्नेह जपणारे पतंगराव




**महादेव जानकर**
पशू, दुग्ध आणि मत्स्य विभाग मंत्री, महाराष्ट्र राज्य





आदरणीय कदम साहेबांना श्रद्धांजली वाहताना मी एवढंच सांगू इच्छितो की, उपेक्षित लोकांना अपेक्षित ठिकाणी घेऊन जाणारा, स्वप्नं पाहणारा महाराष्ट्राचा नेता होता. कदम साहेबांच्याबद्दल मी एवढंच सांगेन की, मी ज्या वेळेस मिनीस्टर झालो, त्या वेळेस मला भेटीला बोलवून वडिलांप्रमाणे मायेची थाप देणारं आणि खऱ्या अर्थाने कशा प्रकारे प्रशासन चालवलं पाहिजे त्याचं ज्ञान देणारं ते पितृतुल्य नेतृत्व आज गेलं. त्यांना मी माझ्या पक्षाच्या वतीनं आदरांजली वाहतो.

●



# पुण्याचे नाव जगाच्या नकाशावर नेणारा माणूस




**अॅड. एस.के.जैन**
ज्येष्ठ विधिज्ञ

**जागतिक नकाशावर भारती विद्यापीठाच्या मार्फत पतंगराव कदमांनी पुणे शहराचं नाव लिहिलं, असं म्हटलं तर त्यात कोणतीही अतिशयोक्ती होणार नाही. राजकारणामध्ये ते फार मोठे होते पण त्याबद्दल बोलण्याचा मला अधिकार नाही. समाजकारणामध्ये निश्चितपणे त्यांच्या विचारांचं अनुकरण इतरांनी करावं, असे होते.**

नऊ मार्चच्या दोन दिवस आधी डॉ. पतंगरावांची तब्येत सिरीअस आहे, असं समजल्याबरोबर विश्वास बसेना. म्हणून मी माझ्या मुलाला हितेशला निरोप दिला. त्याने लीलावती हॉस्पीटलला विश्वजितची भेट घेतल्यानंतर मला फोन करून सांगितलं की, 'पप्पा, बात सही है।'

माझा संबंध, जेव्हा त्यांच्या पहिल्या फार्मसी कॉलेजची सुरुवात झाली त्या वेळी मी पहिल्यांदा त्यांना भेटायला गेलो होतो. त्याच्यानंतर वर्ष दोन वर्षातून त्यांच्या एकदोन तरी भेटी काही ना काही कारणाने होत होत्या. माणूस किती मोठा होऊ शकतो, व्हीजन किती मोठी असू शकते, याचं ते एक उत्तम उदाहरण होते. एकाच वाक्यात सांगतो की, जागतिक नकाशावर भारती विद्यापीठाच्या मार्फत पतंगराव कदमांनी पुणे शहराचं नाव लिहिलं, असं म्हटलं तर त्यात कोणतीही अतिशयोक्ती होणार नाही. राजकारणामध्ये ते फार मोठे होते पण त्याबद्दल बोलण्याचा मला अधिकार नाही. समाजकारणामध्ये निश्चितपणे त्यांच्या विचारांचं अनुकरण इतरांनी करावं, असे होते. शेवटी नियतीला मान्य होतं, त्यानुसार नऊ मार्च रोजी डॉ. पतंगराव कदम आपल्यातून गेले. विश्वास बसत नाही, पण त्यांच्या कामाने आपल्या मनात, आपल्या विचारात ते नेहमीच राहतील. तसेच कोणत्या ना कोणत्या मार्गाने ते आपल्याला मार्गदर्शन करत राहतील ही इच्छा, अपेक्षा आणि श्रद्धा बाळगून मी माझे श्रद्धांजलीचे दोन शब्द संपवतो. इतकंच म्हणेल की, पतंगराव साहेब तुम्ही जिथे असाल, तिथून शिक्षणसंस्था लहान असो किंवा मोठी असो, तुमचा आशीर्वाद आम्हा सर्वांच्याबरोबर राहणारच आहे. इतकं बोलून माझे दोन शब्द संपवतो.





# समाजप्रिय व्यक्तिमत्त्व



**डॉ. वालचंद संचेती**
प्रसिद्ध उद्योगपती

**साहेबांची जीवनशैली व राहणीमान अत्यंत साधे होते. माणसे जोडण्याचा त्यांना छंद होता. त्यांनी जीवनात अनेक व्यक्तींना आपलेसे केले. त्यामुळेच ते समाजप्रिय व्यक्तिमत्त्व होते. नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती त्यांनी अंगीकारली होती. मुत्सद्दी व स्पष्टपणे मनातील गोष्टी बोलून दाखविणे हा त्यांचा स्वभावविशेष होता. त्यांच्या जाण्याने आज आम्ही उत्तम मित्राला मुकलो आहोत. त्यांच्या निधनाने शिक्षणक्षेत्रात कधीही न भरून निघणारी मोठी पोकळी निर्माण झाली आहे.**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व भारती विद्यापीठाचे संस्थापक, कुलपती डॉ. पतंगराव कदम यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आज आपण सर्वजण याठिकाणी जमलेले आहोत. डॉ. पतंगराव कदम साहेब यांचे दिनांक ९ मार्च २०१८ रोजी दुःखद निधन झाले, हे समजले. विश्वासही न बसावा अशा या वृत्ताने आम्हास मोठा धक्का बसला. राज्याच्या राजकारणातील एक हजरजबाबी, मोकळ्या मनाचे आणि दिलखुलास व्यक्तिमत्त्व अशी त्यांची ओळख होती. महाराष्ट्रातील राजकारणाचा एक व्यापक पट पाहिलेला व त्या पटावर अनेक खेळी खेळलेला एक मुरब्बी राजकारणी आज आपल्यातून हरपलेला आहे, याचं अतिशय दुःख होतंय.

एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या साहेबांनी राज्यातच नव्हे तर देशात विविध ठिकाणी शिक्षणाचे अक्षरशः साम्राज्य निर्माण केले आहे. इथेच न थांबता








त्यांनी आपला शिक्षणरूपी वटवृक्ष सातासमुद्रापलीकडे नेऊन महाराष्ट्राचे व देशाचे नाव उंचावलेले आहे. कोणताही आधार नसताना साहेबांनी राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अनेक वर्षं आपले पाय घट्ट रोवले आहेत. आपल्या स्वभावाने त्यांनी राजकीय क्षेत्रासह सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या मनात घर केलेले आहे. साहेबांनी महसूल, वन, उद्योग, सहकार आदी महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी अत्यंत यशस्वीरीत्या सांभाळलेली आहे. उद्योग आणि सहकार मंत्री असताना त्यांनी महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांचे अनेक प्रश्न सोडवलेले आहेत. महाराष्ट्रातील व्यापारी हे कधीही विसरू शकणार नाहीत. सन १९९२ मध्ये साहेबांनी शिक्षणमंत्री असताना संस्थेच्या प्रेरणा विद्यालयाचे उद्‌घाटन निगडी येथे केले होते. तसेच २००३ साली एका पुतळ्याचे अनावरण साहेबांच्या हस्ते झाले होते. साहेबांचे आणि कॅम्प एज्युकेशन सोसायटी संस्थेचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी शिक्षण व राजकीय क्षेत्रात नेत्रदीपक यश संपादन केले.

आदरणीय स्वर्गवासी पतंगराव कदम यांच्याशी माझा खूप जुना परिचय. पौड रोडवरील पहिल्या शाळेचे बांधकाम झाले तेव्हापासून त्यांचे व माझे संबंध अधिक दृढ झाले. शिक्षणाबाबत साहेबांना विशेष ओढा होता. सांगली भागातील विद्यार्थ्यांना अल्पशा मोबदल्यात, वेळप्रसंगी निःशुल्क शिक्षण देऊन शिक्षणासाठी प्रेरित केले आहे. आज साहेबांनी संपूर्ण महाराष्ट्रात प्राथमिक ते पदव्युत्तर, तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या वेगवेगळ्या १८० शाखा विस्तारित केल्या आहेत. साहेबांची जीवनशैली व राहणीमान अत्यंत साधे होते. माणसे जोडण्याचा त्यांचा छंद होता. त्यांनी जीवनात अनेक व्यक्तींना आपलेसे केले. त्यामुळेच ते समाजप्रिय व्यक्तिमत्त्व होते. नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती त्यांनी अंगीकारली होती. मुत्सद्दी व स्पष्टपणे मनातील गोष्टी बोलून दाखविणे हा त्यांचा स्वभावविशेष होता. त्यांच्या जाण्याने आज आम्ही उत्तम मित्राला मुकलो आहोत. त्यांच्या निधनाने शिक्षणक्षेत्रात कधीही न भरून निघणारी मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मी द फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्स, महाराष्ट्र राज्य, पूना मर्चंट चेंबर आणि कॅम्प एज्युकेशन सोसायटी व माझ्या कुटुंबाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

●



# मोकळा ढाकळा, निरागस आणि निष्कपट नेता




**राजीव खांडेकर**
मुख्य संपादक, एबीपी माझा

**बरेचदा आपण म्हणतो की, वाऱ्याची एखादी झुळूक आली तरी त्यामुळे वातावरणामध्ये प्रसन्नता येते. पण पतंगराव म्हणजे वाऱ्याची झुळूक नव्हते, ते वादळ होतं. पण ते वादळ असं होतं की, ते जिथे जातील तिथे चैतन्य निर्माण करायचे. जिथे जातील तिथल्या वातावरणातला सगळा ताण हलका करायचे. अनेक माणसांना आपलंसं करत ते काम करीत राहिले. खूप प्रचंड मोठं असं काम त्यांनी केलं.**

महाराष्ट्राच्या राजकारणातील सगळ्यात ऐसपैस, मोकळाढाकळा, सगळ्यात निरागस, अत्यंत निष्कपट अशा मनाचा एक राजकीय नेता अशी ज्यांची ओळख होती, ते पतंगराव इतक्या अचानक आपल्यातून जातील याची खरंतर आपल्या कोणालाच कल्पना, अंदाज असं काही नव्हतं. मघापासून बऱ्याच मान्यवरांनी उल्लेख केला की, गेल्या पाच वर्षांच्या काळामध्ये इतक्या झपाट्याने महाराष्ट्राच्या राजकारणातले चार मोहरे अचानक काळाच्या पडद्याआड गेले.

ज्याच्यामुळे खरंच महाराष्ट्राची, महाराष्ट्राच्या राजकारणाची, समाजकारणाची मोठी हानी झालेली आहे. पतंगरावांच्या कार्याबद्दल मी जास्त काही बोलावं असं नाही, कारण आपण सगळेच जण ते जाणतोच, पण मला या गोष्टीचं सदैव कुतूहल वाटत आलेलं आहे की, वयाच्या १८ व्या वर्षी एखादा तरुण मुलगा ग्रामीण भागातून आलेला, पुण्यासारख्या शहरात येतो आणि तो स्वतःची संस्था उभी करतो. आणि त्याचं नावही 'भारती विद्यापीठ' असं देतो. भारती हायस्कूल, भारती शिक्षण संस्था असं नाव त्यांनी दिलं असतं तर त्याचं नवल वाटलं नसतं. पण भारती विद्यापीठ असं नाव त्यांना आपल्या संस्थेला द्यावं, असं वाटलं. खरंतर यातच त्यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय आपल्याला येतो. माझं गाव आटपाडी, त्या अर्थाने पतंगराव मला खूप जवळचे. लहानपणापासून मला पतंगरावांची जी ओळख आहे ती, आमच्या भागातील मुले जरा शिकली आणि बाकी काही नाही तरी भारती विद्यापीठामध्ये त्यांना नोकरी मिळते, मिळेल. कारण पतंगराव आपल्या माणसांना नेहमीच मदतीचा हात देत आलेले आहेत. ही आमच्या भागात त्या वेळेला धारणा होती. त्यामुळे जेव्हा मी पुण्यामध्ये आलो, त्या वेळी पतंगरावांच्या मोकळेपणाचा पहिला अनुभव घेतला.

भारती विद्यापीठामध्येच कार्यक्रम होता आणि मी नुकता-नुकताच पत्रकार झालो होतो. त्या कार्यक्रमामध्ये पत्रकार परिषद होती, बरीच गर्दी होती. त्या वेळी पतंगरावांनी एकाला हाक मारली की, 'ए चिकण्या, इकडे ये.' ती हाक ऐकून मी एकदम अवाक् झालो. कारण चिकण्या म्हणून पतंगरावांनी ज्यांना हाक मारली, ते मराठीतले प्रथितयश लेखक होते, मला जरा धस्स झालं, की असं कसं. पण नंतर माझ्या असं लक्षात आलं की, पतंगरावांमधल्या मोकळेढाकळेपणाचा किंवा






त्यांच्यातील चुंबकत्वाचा असा काही परिणाम होता, की त्याच्याबद्दल कोणाला कधीच त्या वेळेलाही गैर वाटलं नाही आणि नंतरही कोणाला त्यामध्ये कधी काही गैर वाटलं नाही. त्याचा उल्लेख मघापासून बऱ्याच जणांनी केला, कारण पतंगरावांचा हा अधिकार होता. त्यांच्या सहवासामध्ये जे जे आले, त्या सगळ्यांवर त्यांनी अशी एक जादू केली होती की, प्रत्येकाला त्यांचे आणि आपले काही खास विशेष संबंध आहेत, असं वाटत राहायचं. त्या अधिकारामध्ये पतंगराव फार मोकळेपणानं बोलायचे, वागायचे. मला अनेकदा असं वाटायचं की, हा मोकळेढाकळेपणा घेऊन ते राजकारणात वावरतात तर त्यांचा कधी राजकीय घात न होवो. पण नंतर असंही वाटायचं की, पतंगराव इतके मोकळे-ढाकळे आहेत की, त्यांचं काही स्टिंग करायचं कोणी ठरवलं तरी ते कोणाला कधी शक्य होणार नाही. कारण आपण होऊनच ते खूप सगळं बोलतात. हा मोकळेपणाच त्यांची खूप मोठी जमेची बाजू होती.

बरेचदा आपण म्हणतो की, वाऱ्याची एखादी झुळूक आली तरी त्यामुळे वातावरणामध्ये प्रसन्नता येते. पण पतंगराव म्हणजे वाऱ्याची झुळूक नव्हते, ते वादळ होतं. पण ते वादळ असं होतं की, ते जिथे जातील तिथे चैतन्य निर्माण करायचे. जिथे जातील तिथल्या वातावरणातला सगळा ताण हलका करायचे. अनेक माणसांना आपलंसं करत ते काम करीत राहिले. खूप प्रचंड मोठं असं काम त्यांनी केलं. अनेकदा त्यांच्याबरोबर गप्पांच्या मैफिली झाल्या. वयातल्या अंतराचा विचार न करता मित्रांच्या मैफिली जमवायला त्यांना खूप आवडायचं. अनेकदा कुमार केतकर, मी, अशा आमच्या मैफिली व्हायच्या. त्याच्यामध्ये मला नेहमी जाणवणारी गोष्ट अशी होती की, आपण कोणाच्याही घरी जेवायला जातो, तेव्हा आपल्याबरोबर जे जेवणारे असतात, त्यांचं जेवण पूर्ण होईपर्यंत आपणही थांबतो. पतंगरावांचं एक वेगळेपण किंवा मला नवल वाटायचं की, पतंगराव सदैव इतक्या घाईत असायचे की, पाहुणे म्हणून आपण त्यांच्या घरी जेवायला गेलो तरीसुद्धा पतंगराव त्यांचं जेवण पटकन उरकून बाहेर हॉलमध्ये जाऊन बसायचे. ही त्यांची जी घाई होती, त्याच घाईमधून त्यांनी इतकं अफाट काम उभं केलं. एवढी प्रचंड मोठी संस्था निर्माण केली. पण त्याच घाईनं, ज्या पद्धतीनं ते आपल्यातून निघून गेले, ती आपल्या सगळ्यांनाच चटका लावणारी बाब आहे. पतंगरावांसारखा नेता, त्यांच्यासारखा निष्कपट, निगर्वी आणि मनानं अत्यंत सज्जन असा नेता. त्यांची जागा या पुढच्या काळात कोण भरून काढेल, मला माहिती नाही. पण त्यांची उणीव, त्यांचा मोकळेढाकळेपणा सदैव आपल्या सगळ्यांच्याच स्मरणात राहील. मी, माझं कुटुंब, एबीपी माझा परिवार आणि समस्त माध्यमकर्मींच्या वतीनं पतंगरावांना श्रद्धांजली वाहतो.

●



# किमयागार



**डॉ. उदय निरगुडकर**
ज्येष्ठ पत्रकार

**लाखो-करोडो लोकांशी व्यक्तिगत नातं तयार करण्याची किमया साधलेला हा किमयागार... वन खातं असेल, उद्योग खातं असेल, सहकार असेल, पुनर्वसन असेल, या सर्व क्षेत्रांत स्वतःच्या कार्याचा ठसा त्यांनी उमटवला. अलीकडच्या काळात राजकारणात अत्यंत दुर्मीळ असलेला असा खळाळत्या विनोदाचा झरा ज्यांच्याकडे उपजत होता, असा राजकारणी त्यांच्या जाण्याने आपण गमावला.**




इतक्या लवकर हे असं काही घडेल, याची सुतराम कल्पना आपल्यापैकी कोणालाच नव्हती. ज्या वेळेला त्यांचं पार्थिव शरीर अंत्यसंस्कारासाठी नेलं जात होतं आणि तो उसळलेला जनसागर आमच्या चॅनलवरून सर्व प्रेक्षकांना दाखवत होतो, तेव्हा महाराष्ट्रातल्या अशाच दोन मनाला चटका लावणाऱ्या अलीकडच्या मृत्यूंची आठवण झाली. त्यातला एक विलासरावांचा होता आणि एक गोपीनाथरावांचा. त्या वेळेला ज्याप्रमाणे गर्दी उसळली होती, तशीच गर्दी ही पतंगरावांना अखेरचा निरोप द्यायला जमली होती. त्यातला प्रत्येकजण शोकाकुल होता, कारण त्या प्रत्येकाचं एक व्यक्तिगत नातं होतं. अशा लाखो-करोडो लोकांशी व्यक्तिगत नातं तयार करण्याची किमया साधलेला हा किमयागार. आपण ज्या परिस्थितीत जन्माला आलो, ती परिस्थिती बदलली पाहिजे यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, काहीशी हेटाळणी स्वीकारत पुण्यामध्ये भारती विद्यापीठाची स्थापना आणि त्यानंतर संपूर्ण भारतभर केलेला त्याचा विस्तार आणि त्याच्या माध्यमातून सशक्त महाराष्ट्राची निर्मिती जी आपण पाहतो आहोत, त्यात केलेलं भरीव असं योगदान. वन खातं असेल, उद्योग खातं असेल, सहकार असेल, पुनर्वसन असेल, या सर्व क्षेत्रांत स्वतःच्या कार्याचा ठसा उमटवला आहे. अलीकडच्या काळात राजकारणात अत्यंत दुर्मीळ असलेला असा खळाळत्या विनोदाचा झरा ज्यांच्याकडे उपजत होता, असा राजकारणी त्यांच्या रूपाने आपण गमावला. जाताजाता एक चुटपुटती आठवण म्हणजे, हे सगळं इतक्या लवकर घडेल याची सुतरामसुद्धा कल्पना नव्हती. त्यांचा शेवटचा फोन मला आला तेव्हा भारती विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभामध्ये मी प्रमुख पाहुणा म्हणून यावं आणि कॉन्व्होकेशन ॲड्रेस द्यावं, अशी विनंती त्यांनी केली. परंतु, त्याचवेळेला रत्नागिरीमध्ये दुसरा एक कार्यक्रम घेतलेला होता. मी चॉपरने जाण्या-येण्याची व्यवस्था करतो, इथपर्यंत सगळ्या गोष्टी झाल्या. मात्र दोन्ही कार्यक्रमांची वेळ एकच असल्यामुळे मला जाता आलं नाही. त्यांचे फोनवरचे शेवटचे शब्द मला आठवतायेत, पुढच्या वर्षी कुठलंही कारण द्यायचं नाही, पुढच्या वर्षी नक्की यायचं. पण वेळ आली, ती लीलावतीमध्ये त्यांच्या पार्थिवाचं दर्शन घेण्याची. माझ्या वाहिनीचे असंख्य प्रेक्षक, कर्मचारी यांच्यातर्फे त्यांना आदरांजली. ●



# मेरुमणी



**डॉ. पी.ए. इनामदार**
अध्यक्ष, एम्.सी.ई. सोसायटी, पुणे.

»

**जीवनाच्या तीन पायऱ्या आहेत, स्वतःला सांभाळणं, कुटुंबाला सांभाळणं आणि समाजाला सांभाळणं. काही लोकांच्या नशिबी तर स्वतःला सांभाळण्याचेही भाग्य नसते. आणि फक्त पाच टक्के लोकांना तिसरी पायरी गाठता येते. त्यापैकी एक टक्का लोक त्या पायरीवर जाण्याचा विचार करतात आणि त्यापैकी एक टक्का लोक प्रत्यक्ष त्या मार्गाने जातात. त्या एक टक्का लोकांमध्ये पतंगरावांचे नाव आपल्याला अग्रभागी घ्यावे लागेल.**

»

अजातशत्रू पतंगरावजी कदम यांच्या आठवणी, त्यांनी केलेले काम, हाताळलेली क्षेत्रं आणि मिळवलेले यश याच्या संदर्भामध्ये आपल्यासमोर विचार मांडले जात आहेत. जी चित्रफित दाखवली गेली, त्याच्यापेक्षाही भयंकर त्या वेळेची परिस्थिती होती आणि या सभागृहामध्ये बसलेले लोक जे लहान गावातून आलेले असतील, त्यांना त्या वेळेची भयानक परिस्थिती आज समोर दिसली असेल. आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती प्रतिकूल असताना कुटुंब मोठं असायचं, त्यामुळे दुहेरी प्रॉब्लेम असायचा. शैक्षणिक संस्था चालवत असताना काय बोचण्या असतात, याची मला जाणीव आहे. ते हसत जरी होते तरी त्यांना भरपूर काळजी असायची. शिवाजीरावांनी, मोहनरावांनी, सर्वांनी कुटुंबाला एकत्रित ठेवण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. जीवनाच्या तीन पायऱ्या आहेत, स्वतःला सांभाळणं, कुटुंबाला सांभाळणं आणि समाजाला सांभाळणं. काही लोकांच्या





> जेवढे निर्णय आपण आयुष्यामध्ये घेतो, तेवढी प्रगती होते आणि जेवढी प्रगती होते, तेवढे निर्णय घेतलेले असतात, हे समीकरण आहे. काहींच्या बाबतीत फक्त एक किंवा दोन निर्णय घेता घेता लोकांचे आयुष्य संपते. अशा व्यक्ती ज्या एक ठसा उमटवून जातात, सर्वसामान्यांच्या जीवनाला एक वेगळे वळण लावून जातात, तशा व्यक्तींमधला मेरुमणी म्हणजे पतंगराव होते, असेच मी म्हणेन.

नशिबी तर स्वतःला सांभाळण्याचेही भाग्य नसते. आणि फक्त पाच टक्के लोकांना तिसरी पायरी गाठता येते. त्यापैकी एक टक्का लोक त्या पायरीवर जाण्याचा विचार करतात आणि त्यापैकी एक टक्का लोक प्रत्यक्ष त्या मार्गाने जातात. त्या एक टक्का लोकांमध्ये पतंगरावांचे नाव मला वाटते की आपल्याला अग्रभागी घ्यावे लागेल.

प्रत्येकाशी अरे-तुरे जसे लहानपणापासूनचे मैत्र. त्यांच्यात जे दातृत्व होते, त्याचे बीज लहानपणी त्यांना जी शिकवण दिली त्यांच्या मातोश्रींनी आणि वडिलांनी, त्यामध्ये होते. मीदेखील पुण्यामध्ये फक्त पंधरा रुपये घेऊन आलो आणि सदैव ते ज्या ज्या वेळेला मला भेटायचे, त्या वेळेला शिक्षणाच्या संदर्भामध्ये अनेक कायद्याच्या, अनेक अडचणींच्या गोष्टी समोर आल्या की, आम्ही एकत्र बसून चर्चा करायचो. त्यांची ऐकायची प्रवृत्ती होती आणि नेमका निर्णय घेताना ते रूथलेसली निर्णय घ्यायचे. त्यांच्यातील ही वेगळी चुणूक, ही माझ्या दृष्टीने त्यांच्या यशाचे गमक होती.

जेवढे निर्णय आपण आयुष्यामध्ये घेतो, तेवढी प्रगती होते आणि जेवढी प्रगती होते, तेवढे निर्णय घेतलेले असतात, हे समीकरण आहे. काहींच्या बाबतीत फक्त एक किंवा दोन निर्णय घेता घेता लोकांचे आयुष्य संपते. अशा व्यक्ती ज्या एक ठसा उमटवून जातात, सर्वसामान्यांच्या जीवनाला एक वेगळे वळण लावून जातात, तशा व्यक्तींमधला मेरुमणी म्हणजे पतंगराव होते, असेच मी म्हणेन. ते माझे स्नेहीपण होते. मला वेळोवेळी ते मार्गदर्शन पण करायचे. अडीअडचणीत माझ्याशी हितगुज करायचे. असे लोक थोडे आहेत, त्यापैकी पतंगरावजी आज आपल्यामध्ये राहिले नाहीत, याची खंत वाटते. मी त्यांना माझ्यावतीने, माझ्या कुटुंबाच्या वतीने, माझ्या संस्थेच्या वतीने आणि महाराष्ट्रातील सर्व अल्पसंख्याक संस्थांचा अध्यक्ष या नात्याने आदरांजली वाहतो आणि रजा घेतो.

●



# शिक्षणक्षेत्रातील रत्न




**डॉ. विश्वनाथ कराड**
संस्थापक, एम.आय.टी., पुणे


**एकदाच मी पाहिलं की एक गरीब मुलगा होता कोणीतरी आणि त्याचे काहीतरी काम होते सचिवालयामध्ये. तेव्हा योगायोगाने मी बाजूला होतो. पतंगराव ते जे सेक्रेटरी होते त्यांना म्हणाले की, 'साहेब, मला काही बाकीचे कायदा-कानून सांगायचे नाही. हे जे पोरगं आहे ना फार गरीब आहे, हुशार आहे, चांगलं आहे. ते काम झालं पाहिजे.' त्यांचा करारीपणा, त्यांचे धाडस, त्यांचा स्वभाव याचं मी वर्णन करण्याची गरज नाही.**

पतंगरावांच्या नसण्याचं मनामध्ये एक दुःख आहे. खूप मनापासून ही उणीव जाणवते आहे. जणू आपल्या घरचाच कोणीतरी भाऊ, आपल्या कुटुंबातील कोणीतरी व्यक्ती अचानक निघून जावी, असे वाटते आहे. त्यांचे स्मरण या सभागृहातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये होते आहे. पतंगरावांच्या जाण्याने जनता हळहळलेली मी पाहिलेली आहे. वास्तविक पाहता त्यांच्या आमचा स्नेह जुना आहे. महाराष्ट्रात शिक्षणक्षेत्रात ज्यांनी खऱ्या अर्थाने कार्याला सुरुवात केली, पुढे त्याला भारती विद्यापीठाचे स्वरूप आले. खरं पाहिलं तर त्यांचं हे जाण्याचं वय नव्हतं, असं मला प्रांजळपणे वाटतं. पतंगरावांनी कधी नव्हे ते महिना दोन महिन्यांपूर्वी कराडांनी जे उभे केले, ते पाहायला जाण्याची इच्छा व्यक्त केली. दुर्दैव आमचे, की ती भेट होऊ शकली नाही. अनेक गोष्टी आता सांगण्यात आल्या. एकदाच मी पाहिलं की एक गरीब मुलगा होता कोणीतरी आणि त्याचे काहीतरी काम होते सचिवालयामध्ये. तेव्हा योगायोगाने मी बाजूला होतो. पतंगराव ते जे सेक्रेटरी होते त्यांना म्हणाले की, 'साहेब, मला काही बाकीचे कायदा-कानून सांगायचे नाही. हे जे पोरगं आहे ना फार गरीब आहे, हुशार आहे, चांगलं आहे. ते काम झालं पाहिजे.' त्यांचा करारीपणा, त्यांचे धाडस, त्यांचा स्वभाव याचं मी वर्णन करण्याची गरज नाही. आमच्या श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, त्याचे विद्यार्थी, शिक्षक आणि सगळ्यांच्या वतीने श्रद्धांजली वाहतो. खरं पाहिलं तर आमच्या क्षेत्रामध्ये 'शिक्षण सम्राट' म्हणण्याची पद्धत निर्माण झाली. त्याऐवजी पतंगरावांना मी 'शिक्षणक्षेत्रातील रत्न' असं म्हणेन. 'शिरोमणी' म्हणेन की, त्यांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला एक जाग आणली. बसंतदादा पाटलांची आठवण होते, पतंगरावांनी केलेले काम पाहून. कदम कुटुंबीयांच्या दुःखामध्ये आमचा सगळा परिवार, वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, आमच्या वारकरी संप्रदायातील अनेक लोक, आम्ही सगळे सहभागी आहोत आपल्या वेदनेमध्ये. विश्वजित, तुमचे वेगळे सांत्वन करण्याची गरज नाही, पण मला फार वाईट वाटते. रघुनाथ माशेलकरांचा सत्कार केला, तेव्हा आपण सगळे जण एकत्र होतो. मुजुमदार होते. पण अशी काही घटना घडेल असं कधी वाटलं नाही. आमच्या संपूर्ण कराड परिवाराच्या वतीने, विश्वशांती विद्यापीठाच्या वतीने, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने, सर्व विश्वस्त, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या वतीने मनापासून भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो आणि थांबतो.





# खळाळणारा झरा



**दिवाकर रावते**
परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य आणि शिवसेना नेते

**काही व्यक्तिमत्त्वंच अशी असतात. खळखळणारा झरा बघितल्यानंतर आपल्याला जसा आनंद होतो, तसे पतंगराव सभागृहात प्रवेश करताना आनंदमयी वातावरणात प्रवेश करायचे. समोरच्याला बरं वाटायचं, मग तो विरोधी पक्षाचा असो की कुठलाही असो. अनेक खाती त्यांनी सांभाळली. ते वनखात्याचे मंत्री असताना झालेल्या वृक्षतोडीचा प्रश्न मी उपस्थित केला, तेव्हा ते मला म्हणाले, 'दिवाकर, जरा तिकडे साताऱ्यात येऊन बघा.' आणि खरोखरच त्यांनी मला तिकडे नेऊन सगळी परिस्थिती दाखवली होती.**

तसं आमच्यासाठी पतंगरावांचं जाणं एकदम अचानक. कालच्या अधिवेशनापर्यंत आम्ही त्यांना पुढे बसलेले, विरोधी पक्षनेत्यांच्या पुढे खुर्चीवर बसलेले बघितलेलं. वर्षानुवर्षे आम्ही त्यांना पाहत आलो ते मंत्री म्हणून. प्रथमतःच आम्ही पतंगरावजींना समोरच्या बाकावर बसलेले पाहत होतो. भारदस्तपणा जो असतो पक्षनेतृत्वाच्या अनुभवाचा, तो त्या समोरच्या जागेवर भासत होता कारण पहिल्या लाइनमध्ये बसणाऱ्या आमच्या दादांपर्यंत आणि पाटलांपर्यंत ही सबंध ओळ अनुभवाची. कारण पतंगराव कधी असे मध्येच उठून पटकन काहीतरी करतील अशातला भाग नव्हता. पण मुद्द्याचं असेल त्या वेळेला ते नक्की बोलणार. त्यामुळे विरोधी पक्षामधला पतंगरावांचा आमचा अनुभव हा तसा मवाळ. सत्तेत असताना मंत्री म्हणून आम्ही पाहिलेले पतंगराव. काही व्यक्तिमत्त्वंच अशी असतात. खळखळणारा झरा बघितल्यानंतर आपल्याला जसा आनंद होतो, तसे पतंगराव सभागृहात प्रवेश करताना आनंदमयी वातावरणात प्रवेश करायचे. समोरच्याला बरं वाटायचं, मग तो विरोधी पक्षाचा असो की कुठलाही असो. अनेक खाती त्यांनी सांभाळली. ते वनखात्याचे मंत्री असताना झालेल्या वृक्षतोडीचा प्रश्न मी उपस्थित केला, तेव्हा ते मला म्हणाले, 'दिवाकर, जरा तिकडे साताऱ्यात येऊन बघा.' आणि खरोखरच त्यांनी मला तिकडे नेऊन सगळी परिस्थिती दाखवली होती. गुलाम नबी आझाद ज्या वेळेला सांगत होते की, आपण इथे बसल्यानंतर आपण विचार करायला लागलो की, शून्यातून किती निर्मिती होऊ शकते. एका दूरचित्रवाहिनीवर एकदा त्यांची मुलाखत पाहिल्यानंतर त्या रात्री मी त्यांना फोन केला. त्या मुलाखतीत त्यांनी सगळी आपली विद्यापीठ स्थापनेची कथा सांगितली. त्या १८-१९ वर्षांच्या तरुणाची ती जिद्द होती. आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करताना कुठपर्यंत माणूस जाऊ शकतो, याचे ते आदर्श उदाहरण होते. शिक्षणक्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांची संख्या लाखात, वेगवेगळ्या विषयांच्या सर्व फॅकल्टी. आपल्याला १०-१५ वाचताना पंचाईत होते.

त्याचे नियोजन, नियंत्रण आणि त्याचा पूर्ण पसारा देशभर आणि देशाच्या बाहेर. भारती विद्यापीठ आणि त्याचे कुलगुरू. लाल दिवा आणि त्यांचा संपर्क नेहमीच






असायचा. शिक्षणमंत्री होते ते. ती आठवण मी सभागृहात सांगितली त्यांना श्रद्धांजली वाहताना. आमच्या वरच्या सभागृहामध्ये बी.टी. देशमुख आणि शिक्षकांचा जो ग्रुप होता, तो शिक्षकांच्या प्रश्नांवर एवढा आक्रमक व्हायचा, की महाराष्ट्रात दुसरा प्रश्नच नाही की काय, अशी परिस्थिती कितीतरी वेळा निर्माण व्हायची. शिक्षणमंत्री होणं आणि वरच्या सभागृहात जाणं म्हणजे मंत्र्यांनाही भीती वाटायची. पण पतंगराव हे हसत-खेळत सगळं अंगावर घ्यायचे. विनाअनुदानितमधील 'विना' हा शब्द काढून टाका आणि अनुदानित शब्द फक्त ठेवा, याविषयी ते मंत्री असताना झालेला संघर्ष मी जवळून पाहिला आहे. हसत हसत ते निर्णय घ्यायचे. त्यांचा तो स्वभाव होता. ते कधीही नाही म्हणायचे नाहीत. चार-पाच- अधिवेशनं केल्यानंतर बाबा मुख्यमंत्री होते तेव्हा, त्यांना आठवत असेल, दिला त्यांनी निर्णय की, 'काढून टाकला शब्द'. पटकन निर्णय घ्यायचे ते. पण एखादा शब्द इतक्या सहजपणे निघतो का? सरकारमध्ये एका माणसाने सांगून लगेच काही होत नसतं, म्हणून पुन्हा त्याच्यावरून वाद उठला की, तुम्ही म्हटला होतात. त्या वेळी मी हसलो होतो. तेव्हा मला या सगळ्या शिक्षकांनी घेरून सांगितलं की, तुम्ही आमच्याबरोबर बोलता, आमच्याबरोबर बसता, शिक्षकांबद्दल चर्चा करता, मग तुम्ही हसलात का? त्यावर मी एवढंच म्हणालो की, महाराष्ट्रातल्या काही हजार शिक्षकांसाठी तुम्ही भांडत आहात, पण ज्यांनी स्वतः हजारो शिक्षकांचं पालकत्व स्वीकारलं आहे आणि जे त्या शिक्षकांना वेळोवेळी पगार देतात, त्यांना तुम्ही सांगता की विनाअनुदानित हा शब्द बदला म्हणून? हा विषय आपण त्यांना सांगावा, अशातलं हे व्यक्तिमत्त्व नाही. त्यांनी एवढ्या मोठ्या संस्थेची निर्मिती केली, शिक्षणक्षेत्रात एवढं प्रचंड कार्य केलं, पण 'शिक्षणमहर्षी' म्हणून त्यांनी कधीही स्वतःला मिरवून घेतलं नाही.

एक गोष्ट पतंगरावांच्या बाबतीमध्ये सांगावीशी वाटते, निवडणूक झाली की, मुख्यमंत्री कोण, या चर्चेत पतंगरावांचं नाव शंभर टक्के. ते नाही मिळालं, पण त्यांचा चेहरा कायम हा असाच. पक्षाच्या पडझडीमध्येसुद्धा. इथे आज दोन-तीन माजी मुख्यमंत्री माझ्यासमोर बसलेले आहेत. पक्षनिष्ठा हा विषय ज्या व्यक्तिमत्त्वांकडून शिकावा, त्यामध्ये पतंगरावांचं नाव शंभर टक्के आहे. अपेक्षा होती का, होती, योग्यता होती का, होती. पण पक्षाने संधी दिली नाही म्हणून त्यांनी कधी नाराजी दाखवली नाही. कधी राग व्यक्त केला नाही. पक्षाच्या विरोधात बोलल्याचं आपल्या कोणाच्याही कधी ऐकिवात नाही. आणि मग सभागृहात काय पतंगराव, असं विचारलं की, 'चालतंय' एवढंच



> पक्षनिष्ठा हा विषय ज्या व्यक्तिमत्त्वांकडून शिकावा, त्यामध्ये पतंगरावांचं नाव शंभर टक्के आहे. अपेक्षा होती का, होती, योग्यता होती का, होती. पण पक्षाने संधी दिली नाही म्हणून त्यांनी कधी नाराजी दाखवली नाही. कधी राग व्यक्त केला नाही. पक्षाच्या विरोधात बोलल्याचं आपल्या कोणाच्याही कधी ऐकिवात नाही.

ते बोलायचे. मनात काय वाटत असेल ते असेल, पण चारचौघांमध्ये कधीही त्यांनी पक्षश्रेष्ठींच्या किंवा पक्षाच्या विरोधात एकही शब्द उच्चारला नाही. मला मिळालं नाही, माझी ही पात्रता आहे, मला कसं देत नाही बघतो, असं कधीही त्यांनी काहीच बोलून दाखवलं नाही. हे असे पतंगराव अनेक वर्षं मी सभागृहात पाहत आलो.

त्यांच्याकडे अनेक खाती आली, बदलत गेली, परत मिळाली. पण मिळेल त्या खात्याशी एकरूप होऊन काम करणारं ते व्यक्तिमत्त्व होतं. या अनुभवांमुळे ते आपल्यातून गेल्याचं खूप जाणवतं. ते समोर बसलेले दिसत नाहीत, बाबा, तुमच्या शेजारी ते दिसत नाहीत. ते जाणवतं जास्त. बसून राहायचे ते इतके ज्येष्ठ असून. मला दादांचंही कौतुक वाटतं. दादा सकाळपासून सभागृहात आपली दिवसभर उपस्थिती लावणार म्हणजे लावणार. आल्यानंतर सगळ्यांशी मिळूनमिसळून वागणार. हा जो ज्येष्ठतेचा गुण असतो राजकारण्यांमधला, तो आपण शिकायचा असतो. आपल्या कृतीतून ही शिकवण देणारे पतंगराव आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांच्याविषयी खूप बोलावं अशी मनःस्थिती नाही. कारण ते नेहमीच समोर दिसायचे. याच अधिवेशनात दिसले नाहीत. प्रत्येक अधिवेशनात असायचे. आल्यानंतर सगळ्यांना नमस्कार करायचे. हसायचे, बोलायचे. सगळ्यांशीच मैत्री त्यांची. असं एक चांगलं व्यक्तिमत्त्व, वैभवसंपन्न व्यक्तिमत्त्व आपल्यातून गेलं. आदरांजली तर आपण वाहतोच आहोत, पण पतंगराव नसल्याचं आम्हाला खूप जाणवतं तिकडे बसल्यावर. आणि ते ज्या ज्या ठिकाणी जात असतील, ज्या मित्र- परिवारात वावरत असतील, त्या सगळ्यांनाच हे जाणवत असेल की, पतंगराव आज आपल्यात नाहीत. मी माझ्या वतीने, माझ्या कुटुंबाच्या वतीने, शिवसेनेच्या वतीने, शिवसेना पक्षप्रमुख आदरणीय उद्धवजी ठाकरे यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहतो.

●




# सहृदयी आणि सकारात्मक



**गिरीष बापट**
अन्न व नागरी पुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य

**पतंगरावांच्या सगळ्या सहवासात त्यांचा स्वभाव मला खूप भावला. मी त्यांना कधीही नाराज पाहिलं नाही. नेहमी उत्साही असायचे. म्हणजे मंत्री असताना ज्या पद्धतीने ते विधानसभेत यायचे, पण मंत्रिपद किंवा सरकार गेलेलं असताना त्यांच्या चेहऱ्यावरची रेष मला यत्किंचितही हललेली दिसली नाही. इतकं त्यांचं व्यक्तिमत्त्व आगळंवेगळं होतं.**

स्वर्गीय पतंगराव आणि त्यांच्या सगळ्या आठवणी आज पुन्हा येत आहेत. मीही २५-२६ वर्षे त्यांच्या सहवासात होतो. त्यामुळे या कमी वेळात त्या सांगणं अवघड आहे. इतके वक्ते आता बोलले आहेत की, त्यावरून इतक्या लोकांचं, संस्थांचं, सर्वच राजकीय पक्षांचं त्यांच्यावर प्रेम होतं ते लक्षात आलं. मी जेव्हा माझ्या जीवनाचा विचार करतो, तेव्हा मला नेहमी असं वाटतं की, दुसऱ्याचं चांगलं शिकावं. आणि पतंगरावांच्या सगळ्या सहवासात त्यांचा स्वभाव मला खूप भावला. मी त्यांना कधीही नाराज पाहिलं नाही. नेहमी उत्साही असायचे. म्हणजे मंत्री असताना ज्या पद्धतीने ते विधानसभेत यायचे, पण मंत्रिपद किंवा सरकार गेलेलं असताना त्यांच्या चेहऱ्यावरची रेष मला यत्किंचितही हललेली दिसली नाही. इतकं त्यांचं व्यक्तिमत्त्व आगळंवेगळं होतं. शिक्षणक्षेत्रात त्यांनी इतिहासच घडवला असं म्हटलं तरी हरकत नाही. पतंगरावांच्या कितीतरी आठवणी आहेत. कितीवेळा त्यांच्याकडे कामं घेऊन गेलो. मोहनराव समोर बसले आहेत, शिवाजीराव आहेत, विश्वजित आहे. सुबराबही आमच्याबरोबर होता. खूप जुन्या आठवणी आहेत. माणूस शब्दातून भावना व्यक्त करतो. पण मी नेहमी विचार करतो की, अशा आपल्याला सोडून गेलेल्या व्यक्तींचा आदर्श आपल्या जीवनात ठेवणं आणि त्याप्रमाणे आपण वाटचाल करणं ही खरी त्यांना श्रद्धांजली असते. म्हणून वेळेचं भान ठेवून मी अधिक बोलत नाही. मी माझ्या कुटुंबीयांच्या वतीनं, भारतीय जनता पार्टीच्या वतीनं आणि पुणे शहर जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्यानं भावपूर्ण आदरांजली वाहतो. ●





# अजातशत्रू



**पृथ्वीराज चव्हाण**
माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**शिक्षण खातंच नव्हे तर सहकार असेल, शैक्षणिक संकुलं असतील, राजकारण असेल, मंत्रिमंडळ असेल, यातील प्रत्येकाशी म्हणजे ज्यांच्या ज्यांच्याशी त्यांचा संबंध आला, त्यांचं मन पतंगरावजींनी जिंकलं. कायमस्वरूपी मैत्री निर्माण केली आणि नंतर कधीही त्या मैत्रीला अंतर दिलं नाही. कधीही, कोणीही त्यांच्याबद्दल शत्रुत्व मनामध्ये बाळगलं नाही आणि त्यांनीही कोणाबद्दल शत्रुत्व बाळगलं नाही. असं अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेलेलं आहे.**

पतंगरावजी आपल्या सगळ्यांना सोडून गेलेले आहेत, यावर विश्वासच बसत नाही. विधिमंडळामध्ये आम्ही दोघंही एका बाकावर बसायचो. माझ्याआधी नेमके पतंगरावजी विधानसभेत हजर असायचे. आज काय करायचंय, काय ठरलंय, वगैरे चर्चा व्हायची. एखादा प्रश्न आला की, त्याचा लगेच मथितार्थ काढून ते उभे राहायचे. विचारायचे. चर्चेत भाग घ्यायचे आणि बरोबर पावणे दोन-दोनच्या सुमारास जेवायला जातो, म्हणून सांगून जायचे. नागपूर अधिवेशनामध्ये असंच एक दिवस म्हणाले की, 'मला जेवायला जायचंय, मी जातो.' ते निघून गेले आणि परत काही त्यांची भेट होऊ शकली नाही.

मी जेव्हा अचानक महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून आलो, तेव्हा पतगंरावांचंही नाव चर्चेत होतं. मात्र माझ्या नावावर शिक्कामोर्तब झालं. आम्ही मंत्रिमंडळ स्थापन केलं आणि कामाला सुरुवात केली. मात्र, पतंगरावांनी कधीही त्यांच्या मनात किंतु परंतु ठेवला नाही. कारण त्यांना माहीत होतं की, हे सगळे निर्णय दिल्लीतून होतात आणि ते निर्णय घेताना त्यामध्ये अनेक गोष्टी असतात. परंतु, मंत्रिमंडळाच्या मुख्यमंत्रिपदाच्या माझ्या त्या कारकिर्दीमध्ये पतंगराव माझ्यामागे भक्कमपणे, मोठ्या भावाप्रमाणे उभे राहिले.

त्यांनी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये अनेक खाती सांभाळली होती. माझ्या मंत्रिमंडळात ते मदत, पुनर्वसन आणि वनखात्याचे मंत्री होते. महाराष्ट्रामध्ये तीन वर्षं सलग दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर अशीच मालिका चालू होती. पण अत्यंत समर्थपणे त्यांनी मदत आणि पुनर्वसन खात्याचे मंत्री म्हणून जबाबदारी निभावली. दर मंगळवारी त्यांच्या उपसमितीची बैठक होत असे. ती कॅबिनेटची उपसमिती असली तरी त्या उपसमितीमध्ये कुठल्याही आमदाराला प्रवेश होता. अधिकारी सांगायचे की ही कॅबिनेटची उपसमिती आहे, पण ते म्हणायचे, 'नाही. प्रत्येक आमदाराच्या मतदारसंघात काय अडचण आहे, काय त्रास आहे, हे मला स्वतःला ऐकून घ्यायचं आहे.' मला आठवतं आहे की, महाराष्ट्राच्या इतिहासात कधी नव्हे ते दहा लाख जनावरांना आम्ही छावण्यांमध्ये सांभाळलं. स्वतः पतंगरावजी प्रत्येक छावणीला






भेटण्याचा प्रयत्न करत असत. कित्येक वेळेला आम्ही दोघे मिळून गेलो होतो. इतका भीषण दुष्काळ पडला तरी त्याचा चटका, त्याची झळ जनावरांना पोहोचू दिली नाही. एकही जनावर दगावलं नाही. कुठे स्थलांतर होऊ दिलं नाही. ते धाडसी वृत्तीने निर्णय घ्यायचे.

ते वनमंत्री असताना माझ्यासमोर त्यांनी एक प्रस्ताव आणला की, वनखात्यामध्ये जवळजवळ आठ हजार वनरक्षक ३०-४० वर्षे अस्थायी म्हणजेच टेंपररी म्हणून काम करतायेत. त्यांना कुठल्याही सुविधा मिळत नाहीत. निवृत्तीनंतर काय करायचं, याची टांगती तलवार त्यांच्या डोक्यावर आहे. या सगळ्यांना आपण कायम म्हणजेच पर्मनंट केलं पाहिजे. वित्त खात्यानं हे अशक्य असल्याचं आम्हाला सांगितलं. एकदम आठ हजार वगैरे लोकांना घेण्यामध्ये आरक्षण वगैरे अशा काही अडचणी आहेत. पण एखादं काम करायचं म्हणून पतंगरावांनी एकदा ठरवलं की, ते कधीही मागेपुढे पाहत नसत. महाराष्ट्राच्या इतिहासात मला वाटतं की, एका दिवशी आठ हजार लोकांना सरकारी नोकरीमध्ये स्थायी, कायम करण्याचा ऐतिहासिक निर्णय फक्त पतंगरावांच्या जिद्दीमुळे घेता आला. वनखात्याचेच मंत्री असताना त्यांनी ठरवलं की, कुंडलला त्यांच्या गावाजवळ फॉरेस्ट विभागाची अकॅडमी उभी करायची. नेहमीप्रमाणे विरोध झाला. कुंडलला कुठे वनक्षेत्र आहे, असा प्रश्न आला. पण कुठलाही विरोध न जुमानता, अगदी चिकाटीनं ज्या ज्या अडचणी आल्या, त्यांच्यावर मात करून त्यांनी आपला विचार प्रत्यक्षात आणला आणि आज कुंडलला देशातील वनखात्याच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी एक अकॅडमी काम करते आहे.

त्यांचं शिक्षणक्षेत्रातलं जे काम आहे, ते मला वाटतं अद्वितीय म्हणावं लागेल. त्या भागात त्या काळामध्ये शिक्षण घेताना २-४ रुपये फीदेखील गोळा करणं शक्य नसायचं. तेवढ्या फीची जुळवाजुळव करताना किती धावपळ करावी लागायची, हे त्यांना माहीत होते. म्हणून त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली होती की, शिक्षणक्षेत्रातच आपल्याला मुख्य काम करायचं आहे. बहुजन समाज जो प्रचंड प्रमाणात मागासलेला आहे, तो शिक्षणाच्या अभावामुळे. म्हणून त्यांनी स्वतःचं जीवन हे शिक्षणक्षेत्राला वाहून घेतलं. ते पुण्यामध्ये कसे आले, किती पैसे घेऊन आले, कसे त्यांनी काम केले ही जीवनगाथा आपल्या सगळ्यांना माहीत आहेच. पण त्या वेळेला त्यांनी शिक्षणाची परिस्थिती जी ओळखली की, गणित आणि इंग्रजी या विषयांमध्ये मुलं मागे पडतात. गणित शिकलं की, विज्ञानाशी संबंधित विषय सोपे होतात. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण



करता येतो, ज्याची नेहरूजींनी नेहमीच चर्चा केली होती. घटनेमध्येही नंतर आपण तरतूद केली की, समाजामध्ये आपण वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे. आणि इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे. जगाच्या पाठीवर जे ज्ञान निर्माण होत आहे, ते इंग्रजीमध्ये निर्माण होत आहे. या दोन विषयांमध्ये बहुजन समाजाची मुलं मागे राहिली तर मग त्यांना स्पर्धेमध्ये उतरता येणार नाही. म्हणून पतंगरावांनी गणित आणि इंग्रजी शिकविण्याच्या दृष्टीने सुरुवात केली. त्यातूनच आज भारती विद्यापीठ ही वटवृक्षासारखी संस्था उभी राहिली आहे. महत्त्वाकांक्षा आणि जिद्द याच्या जोरावर काय करता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे पतंगरावजींचे जीवन आहे. त्या वेळी एखाद्या आठ बाय दहाच्या खोलीत एखादी शाळा सुरू करताना त्याला विद्यापीठ असं नाव द्यायचं म्हणजे जबरदस्त महत्त्वाकांक्षाच म्हणावी लागेल. कोणी कितीही काही म्हटलं, काहीही झालं, कितीही टीका केली, टिंगल केली तरी हे करणारच हे त्यांनी ठरवलं आणि जिद्दीने ते करून दाखवलं.

मला वाटतं की, खऱ्या अर्थाने पतंगरावजींना श्रद्धांजली वाहायची असेल तर भारती विद्यापीठ हे देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ होईल, असा प्रयत्न आपण सर्वांनी, विशेषतः विश्वजित, शिवाजीराव यांनी करायला पाहिजे. दगडमातीच्या कोणत्याही स्मारकापेक्षा ते मोठे स्मारक होईल. मला अजूनही आठवतंय की, विधानसभेत आलो किंवा राजकीय मिटिंगसाठी आम्ही एकत्र आलो की, लगेच कानात सांगायचे की, आमच्या भारती विद्यापीठाला नॅकचा ए प्लस दर्जा मिळाला आहे. हे सांगताना त्यांची छाती फुगून यायची. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा भारती विद्यापीठाला दर्जा, गुणवत्ता मिळालेली आहे, केंद्र सरकारच्या नॅकने त्यांना ए प्लस, ए कॅटेगिरी दिलेली आहे, याचा त्यांना खूप आनंद व्हायचा.

गेल्यावर्षी आम्ही कऱ्हाडच्या गाडगे महाराज कॉलेजमध्ये एका गुणवत्ताविषयक कार्यक्रमासाठी गेलो होतो. तेव्हा पतंगरावांनी त्यांना खूप मार्गदर्शन केले. आणखी काय काय केलं पाहिजे, ते सांगितलं. आपली आणि आपल्या कॉलेजची गुणवत्ता आणखी कशी वाढवली पाहिजे, ते सांगितलं. हा एकच ध्यास त्यांनी घेतला होता. राजकारण, शिक्षणक्षेत्र, सहकारक्षेत्र हे सगळं त्यांनी समाजकारणाकरता वापरलं. मला वाटतं की, त्यांनी आपल्या या कामाने लाखोंचे संसार फुलवले. पतंगराव नसते तर त्यांना शिक्षण मिळालं नसतं, परंतु त्यांचं काम हे विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात होतं. त्यातून समाज परिवर्तनाचं प्रचंड मोठं काम त्यांनी या कार्यातून केलं. म्हणून मला वाटतं की, आपल्या सगळ्यांना त्यांच्या कामाची, जिद्दीची, चिकाटीची, त्यांच्या मनमोकळेपणाची, त्यांच्या औदार्याची कायम आठवण राहणार आहे.

शिक्षण खातंच नव्हे तर सहकार असेल, शैक्षणिक संकुलं असतील, राजकारण असेल, मंत्रिमंडळ असेल, यातील प्रत्येकाशी म्हणजे ज्यांच्या ज्यांच्याशी त्यांचा संबंध आला, त्यांचं मन पतंगरावजींनी जिंकलं. कायमस्वरूपी मैत्री निर्माण केली आणि नंतर कधीही त्या मैत्रीला अंतर दिलं नाही. कधीही, कोणीही त्यांच्याबद्दल शत्रुत्व मनामध्ये बाळगलं नाही आणि त्यांनीही कोणाबद्दल शत्रुत्व बाळगलं नाही. असं अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेलेलं आहे. आमच्या सर्व राजकारणामध्ये काम करणाऱ्यांमध्ये, पश्चिम महाराष्ट्राच्या राजकीय जीवनामध्ये प्रचंड मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आज विश्वजित असेल, मोहनराव कदम असतील, शिवाजीराव असतील, श्रीमती कदम असतील, हा प्रचंड मोठा कदम परिवार आणि त्याचबरोबर त्यांची एक्स्टेंडेड फॅमिली म्हणजे भारती विद्यापीठ परिवार हा सर्व त्यांच्या अचानक जाण्यामुळे आज शोकाकुल अवस्थेमध्ये आहे. मला खात्री आहे की, त्यांनी जे विश्व आज निर्माण केलं आहे, त्यांनी जी दिशा घालून दिलेली आहे, त्याच मार्गाने त्यांचे कुटुंबीय सांभाळतील, त्याला पुढे नेतील. काँग्रेस पक्षाची तर खूप मोठी हानी झालेली आहे. मला वैयक्तिकपणे कुटुंबातील एखादी जवळची व्यक्ती सोडून गेल्याची भावना होते आहे. मी माझ्यावतीनं डॉ. पतंगरावजी कदम यांच्या पुण्यस्मृतीला आदरांजली वाहतो. त्यांचं हे काम असंच पुढे नेण्याची ताकद त्यांच्या कुटुंबीयांना मिळो, अशी प्रार्थना करतो. जयहिंद.

●



# तत्काळ निर्णय घेणारा नेता



**अशोक चव्हाण**
माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस

**आम्ही सगळे मंत्रिमंडळात असताना आर.आर. पाटील आणि पतंगरावजी दोघं एकमेकांच्या बाजूला बसायचे. दुपारी तिथे काही खायला आलं आणि त्यात काही गोड असेल तर आर.आर. पाटील पतंगरावजींना आधीच सांगायचे की, तुम्ही काही गोड खायचं नाही, तुम्हाला शुगर आहे, बिलकूल गोड खाऊ नका तुम्ही! एकमेकांविषयी एवढं जिव्हाळ्याचं नातं होतं.**

काँग्रेस पक्षाचा आणि महाराष्ट्राचा एवढा मोठा नेता, एवढा मोठा माणूस. मोठा माणूस म्हणजे मनाने मोठा. कर्तृत्वाने मोठा. ज्यांनी आपल्या आयुष्यामध्ये कर्तृत्वाने शून्यातून विश्व घडवलं अशा प्रकारचे पतंगरावजी आज आपल्यामध्ये नाहीत, याचं दुःख सर्वांनाच आहे. पतंगरावजींचा आज इथे असलेला फोटो पाहिल्यानंतर हे खरंच वाटत नाही की, याच पतंगरावजींच्या शोकसभेला आपण आज या ठिकाणी आलेलो आहोत. पण जे नियतीला मान्य होतं, ते स्वीकारून आज आपण एकत्र आलो आहोत, ते त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता. हे करत असताना सर्वांच्याच मनामध्ये सगळ्या जुन्या आठवणी उसळल्या आहेत. इथे बसलेल्या सर्व वक्त्यांनी आपापले अनुभव विशद केलेले आहेत. राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये काम करत असताना पतंगरावजी आणि आम्ही सर्वजण एकत्रपणे त्यांच्या सोबत राहिलो. त्यांच्याविषयीच्या आमच्या आठवणी आजही ताज्या






आहेत. त्यामुळे त्यांना शेवटचा निरोप देण्यासाठी आम्ही त्यांच्या गावी गेलो, त्या वेळेस खरोखरच मनामध्ये खूप दुःख होतं. विश्वजित असतील, मोहनराव असतील, शिवाजीराव असतील, या सर्वांच्या मनामध्ये ज्या भावना आहेत, तशाच प्रकारच्या भावना इथे बसलेल्या आपल्या सर्वांच्या मनात आहेत की, आपला एक जवळचा माणूस आज आपल्यातून निघून गेलेला आहे. परवाच गुढीपाडवा झाला. पण मी जी माहिती घेतली आणि जी मला सहकाऱ्यांनी सांगितली की, सांगलीमध्ये आणि विशेषतः पतंगरावजींच्या मतदारसंघामध्ये कोणी गुढी उभी केलेली नाही, एवढं मोठं दुःख लोकांच्या मनामध्ये आहे. आपला जाणता राजा, ज्याने आपलं सर्व विश्व घडवलं तो राजा गेल्याचं हे दुःख आहे.

त्यांनी आपला मतदारसंघ तर पाहिलाच, पण जिल्हा सांभाळला, महाराष्ट्र सांभाळला, असा हा सहकारी अचानकपणे आमच्यातून निघून गेला ही भावना सगळ्यांच्या मनामध्ये आहे. पण ती कशा प्रकारे व्यक्त करावी, आपलं दुःख कशा पद्धतीने कोणाला सांगावं, असा प्रश्न आहे. इथे बसलेला प्रत्येक माणूस, मी प्रत्येकाकडे पाहत होतो की, तो किती दुःखी आहे. अंत्ययात्रेच्या वेळेला दिसणाऱ्या ग्रामीण भागातल्या प्रत्येक माणसाच्या मनामध्ये जी भावना होती की, फार वाईट झालं, असं व्हायला नको होतं. सर्वांनी सांगितली ती गोष्ट खरी आहे की, त्यांनी पुण्यामध्ये दहा बाय दहाच्या खोलीमध्ये भारती विद्यापीठ सुरू केलं. तिथून मग जी सुरुवात झाली, त्यानंतर त्यांनी मागे कधी वळून पाहिलं नाही. पूर्णपणे त्यांनी भारती विद्यापीठासाठी वाहून घेतलं. त्या संस्थेचं रूपांतर आज मोठ्या वटवृक्षामध्ये झालेलं आहे. संपूर्ण देशात आणि परदेशातही सर्वत्र शिक्षणाचं एक प्रचंड नेटवर्क पतंगरावजींच्या कर्तृत्वामुळे निर्माण झालं आहे. पण भारती विद्यापीठापुरते त्यांचे कर्तृत्व मर्यादित नाही. तर तो एक मोठ्या मनाचा माणूस होता. दिलखुलास व्यक्तिमत्त्व होतं आणि सर्वांचाच अनुभव आहे की, पतंगरावजी मोकळेपणाने बोलायचे. एखाद्यावेळी काही रागवले तर ते तात्पुरते असायचे, दुसऱ्या दिवशी त्याचा काही मागमूस राहायचा नाही. मनात जी भावना येईल, ती मोकळेपणाने व्यक्त करण्याचा प्रयत्न पतंगरावजी नेहमी करायचे. मघाशी अजित पवार म्हणाले आणि माझाही तोच अनुभव आहे की, आम्ही सगळे मंत्रिमंडळात असताना आर.आर. पाटील आणि पतंगरावजी दोघं एकमेकांच्या बाजूला बसायचे. दुपारी तिथे काही खायला आलं आणि त्यात काही गोड असेल तर आर.आर. पाटील पतंगरावजींना आधीच सांगायचे की, तुम्ही काही गोड खायचं नाही, तुम्हाला शुगर आहे, बिलकूल गोड खाऊ नका तुम्ही.

म्हणजे एकमेकांविषयी एवढं जिव्हाळ्याचं नातं होतं की, पतंगरावजींना सल्ला द्यायचं काम आम्हीपण करायचो मित्र म्हणून आणि पतंगरावजीसुद्धा आम्हाला त्यांच्या हक्काने सांगायचे की, तुम्ही हे जे करत आहात ते योग्य आहे किंवा अयोग्य आहे. असं केलं पाहिजे, तसं केलं पाहिजे ते सांगायचे. हि वॉज मॅन इन हरी,



असे ते होते. जे काही निर्णय आहेत, ते तत्काल झाले पाहिजे असं त्यांना वाटायचं. सकाळी सात वाजता पतंगरावजींचा मला फोन यायचा, तेव्हा मला आश्चर्य वाटायचं की, हे झोपतात तरी केव्हा? अठरा तास काम करणाऱ्या माणसाचा सकाळी सात वाजता फोन असायचा की, अशोकराव, हे काम राहिलं आहे, ते झालं पाहिजे. सांगलीमध्ये असं चाललं आहे, महाराष्ट्रात ते चाललं आहे, त्यासाठी हे निर्णय घेतले पाहिजे. मंत्रिमंडळामध्ये ते निर्णय घेतले पाहिजे. ते अधिकारवाणीने सांगायचे आणि त्यांनी सांगितलेलं आपण ऐकलं पाहिजे, अशीच भावना आमच्या सगळ्यांच्या मनामध्ये असायची. आम्ही कधीही त्यांचा अनादर केलेला नाही. कधी मोठे निर्णयसुद्धा घेऊन टाकायचे, जाहीर करून टाकायचे. नंतर सांगायचे आम्हाला.

मला आठवतंय, विधानपरिषदेमध्ये जो प्रसंग समोर आला तो म्हणजे कायम विनाअनुदान तत्त्वांवर चालेल्या संस्थांना अनुदान देण्याच्या बाबतीमध्ये एक विषय आला होता. त्या वेळेस पतंगरावजींना सभागृहामध्ये लोकांनी सांगितलं की, यातील 'कायम विनाअनुदानित' मधील कायम शब्द काढून टाका, ते कायम म्हटल्यामुळे या संस्थांचे भविष्य अडचणीत येणार आहे आणि यांना अनुदान मिळाल्याशिवाय त्या चालणार नाहीत. काहीतरी केलं पाहिजे. त्या वेळी पतंगरावजींनी जाहीर करून टाकलं सभागृहामध्ये. त्या वेळेला मी मुख्यमंत्री होतो. 'मी कायम हा शब्द काढत आहे,' असं त्यांनी सांगून टाकलं. त्या वेळी पतंगरावजींना मी बोलवून घेतलं आणि म्हणालो की, 'पतंगरावजी फार मोठा शब्द तुम्ही काढून टाकला आहे.' ते म्हणाले, 'काय झालं एवढं?' तेव्हा मी म्हणालो की, 'पाचशे कोटींना पडला हा शब्द. महागात पडला. पण हरकत नाही, तुम्ही जो निर्णय घेतला, तो योग्य विचार करून घेतला हे मला मान्य आहे. कारण शिक्षणक्षेत्रामध्ये तुमचा जो अनुभव आहे आणि या संस्थांचे जे प्रश्न आहेत, ते कशा पद्धतीने हाताळायचे, याचा अनुभव आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाला असू शकत नाही. त्यामुळे तुम्ही जो निर्णय घेतला, त्याला हरकत नाही. पाच-सहाशे कोटी गेले तरी हरकत नाही. पण महाराष्ट्रातल्या या सगळ्या शैक्षणिक संस्थाना मदत केली पाहिजे, या प्रांजळ भावनेतून आपण हा निर्णय घेतलेला आहे. तो आम्ही मान्य करतो.' मंत्रिमंडळाने तो निर्णय घेऊन विषय मार्गी लावला. हा प्रसंग आजही माझ्या आठवणीमध्ये आहे. पतंगरावजींचे असे अनेक किस्से आहेत. सगळ्यांशी फार जिव्हाळ्याचे संबंध होते त्यांचे. बरेचदा मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये काही डिटेल्स आर्ग्युमेंट्स व्हायचे, काही चर्चा व्हायची. पण पतंगरावजींनी सहजपणे एखादा विनोद केला की, तो विषय एकदम शांत होऊन जायचा. अशा प्रकारचा अनुभव पतंगरावजींच्या बाबतीमध्ये नेहमी आलेला आहे. फार मोठ्या मनाचा माणूस होता. मी समजू शकतो की, आज एवढ्या मोठ्या माणसाच्या जाण्याने आमची, काँग्रेस पक्षाची तर हानी झालेलीच आहे. मी तर फार लहानपणापासून त्यांना पाहतो आहे. शंकरराव चव्हाण साहेब, आमच्या आई यांचे पतंगरावजी कदम साहेब यांच्याशी आणि त्यांच्या कुटुंबाशीही जवळचे संबंध होते. त्यामुळे अतिशय जवळून मला त्यांना पाहण्याचा, त्यांनी केलेले कार्य अनुभवण्याचा फार मोठा योग आला. म्हणून कदम परिवाराच्या दुःखामध्ये आम्ही सर्व सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो आणि त्यांच्या कुटुंबाला, विशेषतः विश्वजित, मोहनरावजी, शिवाजीराव यांनी ही जबाबदारी आता पुढच्या काळामध्ये अधिक जोमाने सांभाळली पाहिजे. पतंगरावजींचं अपूर्ण राहिलेलं कार्य पुढे नेण्यासाठी ते निश्चितपणे चांगल्या पद्धतीने काम करू शकतील, याविषयी कोणाच्याही मनात शंका नाही. याठिकाणी पतंगरावजींच्या आत्म्याला शांती लाभो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

●

**"सकाळी सात वाजता पतंगरावजींचा मला फोन यायचा, तेव्हा मला आश्चर्य वाटायचं की, हे झोपतात तरी केव्हा? अठरा तास काम करणाऱ्या माणसाचा सकाळी सात वाजता फोन असायचा की, अशोकराव, हे काम राहिलं आहे, ते झालं पाहिजे. सांगलीमध्ये असं चाललं आहे, महाराष्ट्रात ते चाललं आहे, त्यासाठी हे निर्णय घेतले पाहिजे. मंत्रिमंडळामध्ये ते निर्णय घेतले पाहिजे. ते अधिकारवाणीने सांगायचे आणि त्यांनी सांगितलेलं आपण ऐकलं पाहिजे, अशीच भावना आमच्या सगळ्यांच्या मनामध्ये असायची. आम्ही कधीही त्यांचा अनादर केलेला नाही. कधी मोठे निर्णयसुद्धा घेऊन टाकायचे, जाहीर करून टाकायचे. नंतर सांगायचे आम्हाला."**





# मैत्रीचं पावित्र्य जपणारा मित्र



**नारायण राणे**
माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि ज्येष्ठ नेते

**कुठल्याही अडीअडचणीच्या प्रसंगाला वडिलांप्रमाणे धावून येऊन मार्गदर्शन करणारे पतंगराव आज जगात राहिले नाहीत, याचं दुःख आहे. कोकणात कुठलीही घटना घडली की स्वतःहून यायचं आणि त्या कामात मदत करायची ही त्यांची ख्याती होती. कोकणाविषयी त्यांच्या मनामध्ये नितांत आदर होता. कोकणचा कोणताही प्रश्न आला आणि मी जर त्यांना तो सांगितला तर तो प्रश्न ते तात्काळ सोडवत असत. पतंगराव मनमिळावू होते, मित्र म्हणून मैत्रीचे पावित्र्य जपणारे होते.**

डॉ पतंगराव कदम यांना श्रद्धांजली वाहण्याचा दुर्दैवी प्रसंगी आपल्यावर आलेला आहे. माझ्या आयुष्यातील हा दुर्दैवी क्षण आहे, असंच म्हणावं लागेल. कारण पतंगराव कदम आणि माझे संबंध मैत्रीचे, जिवलग मित्राप्रमाणे होते. पतंगराव कदम यांच्याविषयी बोलताना अनेकांनी त्यांच्या जीवनामध्ये त्यांनी शिक्षण घेताना किंवा त्यांनी जीवनामध्ये जी वाटचाल केली त्याचा उल्लेख केला. सर्वसामान्य कुटुंबामध्ये जन्माला येऊन कठीण प्रसंगातून शिक्षण घेतले, शिक्षण घेत असतानाच त्यांनी भारती विद्यापीठ उभं केलं वयाच्या विसाव्या वर्षी. ही सोपी गोष्ट नाहीये. आज भारती विद्यापीठाच्या एकूण १८० संस्था आहेत. पतंगराव कदम म्हणजे 'शिक्षणक्षेत्रातील महर्षी' असा त्यांचा उल्लेख करावा लागेल. एवढं अथांग काम, कार्य शिक्षणक्षेत्रात त्यांनी केलं आहे. पतंगराव कदम यांच्यासोबत २००५ पासून २०१४ पर्यंत महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात काम करण्याची संधी मिळाली. मंत्रिमंडळात जे त्यांचं योगदान आहे, जे काम आहे, ते खरंच उल्लेखनीय आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात महाराष्ट्राच्या सरकारमधील अनेक खाती सांभाळली. अतिशय चांगल्या प्रकारे सांभाळली. अनेक मान्यवरांनी उल्लेख केल्याप्रमाणे त्या मंत्रिमंडळात, कोणत्याही विषयात अधिकारवाणीने बोलणारे अभ्यासू मंत्री, जाणकार मंत्री म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल.








पतंगराव मनमोकळे होते. कोणताही विषय हसतखेळत मांडायचा आणि प्रश्न सोडवायचा, अशी त्यांची ख्याती होती. पतंगरावांनी आपल्या आयुष्यामध्ये गोरगरिबांना मदत करून, सहकार्य करून अशाच प्रकारे योगदान दिलं. पतंगराव हॉस्पिटलमध्ये, लीलावतीमध्ये असताना मी त्यांना पाहायला गेलो. आयसीयूमध्ये होते. मी त्यांना भटलो. मला म्हणाले, 'नारायणराव, सगळ्या माझ्या तपासण्या झाल्या, मला काहीही नाहीये.' मी म्हटलं, 'आनंद आहे पतंगराव. चांगलं आहे. लवकर बाहेर या इथून.' काही दिवस मध्ये गेले आणि हे वृत्त कानावर आले की, पतंगराव गेले. तीव्र दुःख झालं. कुठल्याही अडीअडचणीच्या प्रसंगाला वडिलांप्रमाणे धावून येऊन मार्गदर्शन करणारे पतंगराव आज जगात राहिले नाहीत, याचं दुःख आहे. कोकणात कुठलीही घटना घडली की स्वतःहून यायचं आणि त्या कामात मदत करायची ही त्यांची ख्याती होती. कोकणाविषयी त्यांच्या मनामध्ये नितांत आदर होता. कोकणचा कोणताही प्रश्न आला आणि मी जर त्यांना तो सांगितला तर तो प्रश्न ते तात्काळ सोडवत असत. पतंगराव मनमिळावू होते, मित्र म्हणून मैत्रीचे पावित्र्य जपणारे होते.

महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री म्हणून काम करताना जनतेचे प्रश्न सुटले पाहिजेत, दिलासा मिळाला पाहिजे, हा महाराष्ट्र लोककल्याणकारी व्हावा म्हणून नेहमीच त्यांची धडपड असायची. विधायक, सामाजिक, शैक्षणिक अशा सगळ्याच क्षेत्रांमध्ये त्यांनी कार्य करून दाखवलं. या राज्यातील ते एक कर्तृत्ववान व्यक्ती होते. ते आज आपल्यामध्ये नाहीयेत. खरं म्हणजे इथे बसल्यानंतर पतंगराव नाहीत, असं अजूनही मनाला पटत नाही. इथे ते हसताहेत असं तैलचित्र आहे, हे पाहून खरंच मन हेलावून जातं. पण पतंगराव आपल्यातून गेलेले आहेत, याचं तीव्र दुःख सगळ्यांनाच आहे. त्यांच्यामागे त्यांचं शिक्षणक्षेत्रातलं अथांग कार्य, विविध क्षेत्रातलं, ग्रामीण भागातलं आपल्यासमोर उभं आहे. शिक्षणक्षेत्रात केवळ महाराष्ट्र नाही, दिल्ली नाही, तर देशाच्या बाहेरही त्यांचं कार्य आहे. आपल्या आयुष्यात त्यांनी शैक्षणिक आणि इतर सर्व क्षेत्रांत उभं केलेलं कार्य आज त्यांची आठवण करून देतं. अशा प्रसंगी त्यांना श्रद्धांजली वाहताना त्यांच्या कदम कुटुंबावर फार मोठं दुःख कोसळलेलं आहे, याची जाणीव होत आहे. मी ईश्वराकडे प्रार्थना करतो की, विश्वजित आणि त्यांच्या सर्व कदम कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती दे, ताकद दे. माझे मित्र स्वर्गीय पतंगराव कदम यांना माझ्यातर्फे, माझ्या कुटुंबीयांतर्फे मी श्रद्धांजली वाहतो आणि इथेच थांबतो.

●





# धडाकेबाज व्यक्तिमत्त्व

**अजित पवार**
माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**अनेक चांगल्या चांगल्या संस्था त्यांनी काढल्या, ज्याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. ज्या वेळी आपण पलूस, कडेगावच्या परिसरात आणि सांगलीला जातो, किंवा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जातो, तेव्हा तिथे त्यांच्या संस्था आपल्याला पाहायला मिळतात. त्यांनी केवळ पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात शिक्षणसंस्था काढल्या नाहीत, तर आदिवासी, डोंगरी आणि दुर्गम भागातील माझी मुले-मुली शिकली पाहिजेत, याबद्दलची आपलेपणाची भावना पतंगरावांमध्ये पाहायला मिळाली, ती दुसरीकडे कुठे आमच्यासारख्यांना कधी पाहायला मिळाली नाही. पवार साहेबांबरोबर त्यांचे जवळचे संबंध होते. रयत शिक्षण संस्थेमध्ये आम्ही एकत्र काम करायचो. अनेकदा काही कटू प्रसंग आला, तर तो कटू प्रसंग कशा पद्धतीने हाताळायचा, याचा आदर्श पतंगरावांनी घालून दिला.**

इतक्या अचानकपणे पतंगरावजी आपल्याला सोडून जातील, असं कोणाच्या स्वप्नात देखील कधी आलेलं नव्हतं. काळाच्या, नियतीच्या पुढे तुमचं-माझं- कोणाचं काही चालत नाही. आणि ते घडून गेलेलं आहे. खरंतर सांगली जिल्ह्यातल्या सोनसळसारख्या गावातून १९ वर्षांचा तरुण विद्येचं माहेरघर असलेल्या पुण्यासारख्या शहरात येतो काय आणि एक व्हिजन मनामध्ये ठेवून, भारती विद्यापीठाचं स्वप्न मनामध्ये ठेवून, ते विद्यापीठ स्थापन करतो काय! वास्तविक १९ व्या वर्षी आपण अनेक जण ग्रामीण भागात काम करणारे कार्यकर्ते- की ज्यांना एखादी विकास सोसायटी काढायची म्हटलं तरी जमत नाही. तिथं शंभर शंभर वर्षांचा इतिहास असणाऱ्या मोठ्या-मोठ्या शिक्षणसंस्था असलेल्या पुण्यासारख्या ठिकाणी येऊन स्वतःची शिक्षणसंस्था काढायची आणि त्या संस्थेचा बोर्ड देखील स्वतः लावायचा. किती दूरची दृष्टी पतंगरावांची हे सगळं आपल्याला पाहायला मिळतं आहे, अनुभवायला मिळतं आहे. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नाही, घरामध्ये शैक्षणिक पार्श्वभूमी नाही. शेतकरी कुटुंबातलं हे व्यक्तिमत्त्व. त्याच्यातून पतंगराव येतात आणि एक विश्व निर्माण करतात. गेल्या अनेक वर्षांमध्ये त्यांना अनेक सुख-दुःखांना सामोरं जावं लागलं. परंतु पतंगराव कधी डगमगले नाहीत. एक मोकळंढाकळं अशा प्रकारचं त्यांचं व्यक्तिमत्त्व. धडाकेबाज व्यक्तिमत्त्व.

आम्ही लोकांनी १५ वर्षे त्यांच्याबरोबर काम केलं. सुरुवातीच्या काळात विलासरावजी, त्याच्यानंतर सुशीलकुमार शिंदेजी, त्याच्यानंतर पुन्हा विलासरावजी, त्यानंतर अशोकरावजी आणि नंतर पृथ्वीराजजी असे सगळे मुख्यमंत्री त्या काळामध्ये झाले. त्या वेळेस आम्ही मंत्रिमंडळात काम करत असताना पतंगरावजींकडे कुठलंही खातं आलं, तरी अतिशय उत्तम पद्धतीने तो विभाग ते चालवायचे. माझ्या आधी अनेक जणांनी बोलत असताना सांगितलं की, पतंगरावजी अरे, तुरे असे एकेरी बोलायचे पण ते आपलेपणाचं वाटायचं. मीदेखील महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अनेक वर्षे काम करतोय, परंतु या राज्याच्या मुख्य सचिवाला देखील अरे-तुरे बोलवणारा एकमेव नेता होता, ते म्हणजे पतंगराव. पण कधी कोणाला त्याचं कधी






वाईट वाटायचं नाही. मी बघितलं की, सभागृहामध्ये कुठलंही उत्तर देत असताना ते एकही कागद हातात ठेवायचे नाहीत. पतंगरावांचं भाषण, पतंगरावजींच्या कारकिर्दीमध्ये अनेकदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली, त्या वेळेस त्यांनी केलेलं काम, त्या वेळी त्यांनी घेतलेले निर्णय, एकंदरीतच काम करीत असताना वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या अनेक नेत्यांशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध. पतंगरावांचं वय जवळपास ७४ होतं, तरीदेखील तरुण कार्यकर्त्यांना पतंगराव तेवढेच जवळ वाटायचे आणि पतंगरावांनाही तरुण कार्यकर्ते तेवढेच जवळचे वाटायचे. जनरेशन गॅप ही कधीही आम्हाला पतंगरावांच्या बाबतीमध्ये पाहायला मिळाली नाही. मी, जयंत पाटील, आर.आर. पाटील, दिलीप वळसे-पाटील आम्ही सगळेजण ९० च्या बॅचचे. पतंगरावजी आम्हाला सिनीअर. परंतु काम करत असताना कधी चेष्टा-मस्करी झाली तरी पतंगराव कधीही मनामध्ये किंतू ठेवायचे नाहीत. अशा प्रकारचं हे व्यक्तिमत्त्व.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये तसं बघितलं तर राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर काँग्रेस पक्ष तिथे टिकविण्याकरिता, पश्चिम महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्ष वाढविण्याकरिता पतंगरावांचं योगदान काँग्रेस पक्षाला किंवा एकंदरीतच सर्वांना कधीही विसरता येणार नाही. मला आठवतंय, सुरुवातीच्या काळामध्ये पी.व्ही. नरसिंह राव असतील, प्रणव मुखर्जी साहेब असतील, स्वर्गीय अर्जुनसिंगजी असतील, सोनियाजी असतील, या सगळ्या दिग्गजांशी पतंगरावजींचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध आम्ही अगदी जवळून पाहिले. अलीकडे महाराष्ट्रामध्ये अशा घटना सातत्याने घडतायेत. मधल्या काळामध्ये विलासरावजी आपल्याला सोडून गेले, गोपीनाथजी मुंडे सोडून गेले, आर. आर. पाटील सोडून गेले आणि पतंगरावजी आता आपल्याला सोडून गेले. ही सगळी दिग्गज माणसं. अशा प्रकारची माणसं ज्यांची खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला गरज होती. ही माणसं आकस्मितरीत्या सोडून गेली. आर.आर. पाटील आणि पतंगरावांचं नातं तर मी स्वतः पाहिलं. कारण बरेचदा पतंगरावजींची जी जागा होती, त्या जागेच्या शेजारची जागा मला मिळायची. आताही सभागृहामध्ये बसलेलो असताना पृथ्वीराज चव्हाण साहेब आणि माझ्या मध्येच पतंगराव असायचे. कोणत्याही विषयावर पतंगरावजी नेहमीच अधिकारवाणीने बोलायचे. अनेक विषयांचा त्यांचा दांडगा अभ्यास असायचा. म्हणूनच भारती विद्यापीठाचं जाळं सातासमुद्रापलीकडे नेण्याचं, पोहोचविण्याचं काम हे पतंगरावांच्या माध्यमातून झालं आहे, हे आपण कदापिही विसरता कामा नये.

अनेक चांगल्या चांगल्या संस्था त्यांनी काढल्या, ज्याचा



केला, तशाच पद्धतीने इथून पुढच्या काळात देखील या सगळ्या परिवारामध्ये एकोपा राहिला पाहिजे. ही सगळ्या महाराष्ट्राची अपेक्षा आहे, आम्हा लोकांची अपेक्षा आहे. आणि तुम्ही सगळे जण निश्चितपणे तो एकोपा ठेवाल. पतंगरावांनी लावलेले रोपटे, त्यांनी उभे केलेले विश्व पुढे नेण्यासाठी तुम्हा सगळ्यांचं योगदान अतिशय चांगल्या पद्धतीने राहिले पाहिजे. तीच खऱ्या अर्थाने पतंगरावांना श्रद्धांजली ठरणार आहे. एखादी गोष्ट उभी करण्याच्याकरिता बराच काळ लागतो. परंतु, ते उभं केलेलं पुढं टिकवण्याचं काम अतिशय अवघड आणि जोखमीचं असतं. ते काम करण्याची ताकद निश्चितपणे मोहनशेठ, शिवाजीराव, विश्वजित आणि संपूर्ण कदम परिवारामध्ये आहे, याच्याबद्दल आम्हा लोकांच्या मनामध्ये तिळमात्र शंका नाही. अनेक गोष्टी ते मोकळेपणाने, गमतीने बोलायचे. मला म्हणायचे, 'अजित, तू उपमुख्यमंत्री आणि मी मुख्यमंत्री, बघ कसं जोरात चालतंय सरकार.' काँग्रेस पक्षामध्ये ज्या वेळेस नेतृत्वबदलाचा विषय यायचा, त्या वेळेस पतंगरावांचं नाव बऱ्याच वरच्या क्रमांकावर असायचं. त्यांच्या नावाची चर्चाही व्हायची. तेवढ्या तोडीचं ते नेतृत्व होतं. परंतु शेवटी वरिष्ठ घेतील तो निर्णय मान्य असतो. त्यांनी घेतलेल्या निर्णयाच्या बाबतीत पतंगरावांनी मनामध्ये कधी कटुता ठेवली नाही. जे कोणी प्रमुख असतील त्यांच्याबरोबर अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये ते मनापासून काम करायचे. हे आम्ही सातत्याने पाहत आलो आहोत. त्यांचे हे वैशिष्ट्य कदापिही विसरता येणार नाही. पुढच्या काळामध्ये एकंदरीतच त्यांनी उभे केलेले काम चांगल्या पद्धतीने चालत राहील, अशी अपेक्षा व्यक्त करतो. आदरणीय पवार साहेबांच्या वतीनं, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीनं, व्यक्तिशः माझ्या वतीनं पतंगराव कदम साहेबांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मोहनराव, शिवाजीराव, विश्वजित आणि सगळ्याच कदम परिवाराला हे दुःख पेलण्याची ताकद परमेश्वराने द्यावी, अशी प्रार्थना परमेश्वर चरणी करतो.

●

उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. ज्या वेळी आपण पलूस, कडेगावच्या परिसरात आणि सांगलीला जातो, किंवा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जातो, तेव्हा तिथे त्यांच्या संस्था आपल्याला पाहायला मिळतात. त्यांनी केवळ पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात शिक्षणसंस्था काढल्या नाहीत, तर आदिवासी, डोंगरी आणि दुर्गम भागातील माझी मुले-मुली शिकली पाहिजेत, याबद्दलची आपलेपणाची भावना पतंगरावांमध्ये पाहायला मिळाली, ती दुसरीकडे कुठे आमच्यासारख्यांना कधी पाहायला मिळाली नाही. पवार साहेबांबरोबर देखील त्यांचे जवळचे संबंध होते. रयत शिक्षण संस्थेमध्ये आम्ही एकत्र काम करायचो. अनेकदा काही कटू प्रसंग आला, तर तो कटू प्रसंग कशा पद्धतीने हाताळायचा, याचा आदर्श पतंगरावांनी घालून दिला. असं व्यवस्थितपणे काम जर कोणी करत असतील, तर ते त्या वेळेस पतंगरावजी करायचे, हे आम्ही जवळून पाहिलेलं आहे. अशा प्रकारचं व्यक्तिमत्त्व असलेले पतंगरावजी आपल्याला सोडून गेले आहेत. खूप गोष्टी बोलण्यासारख्या आहेत, अनेक दिग्गज नेते यानंतर बोलणार आहेत. त्याच्यामुळे मी जास्त वेळ घेऊ इच्छित नाही.

पतंगरावजींच्या जाण्यामुळे मोहनशेठ, शिवाजीराव, विश्वजित, कदम परिवार असेल, मी, तो अधिकार मला आहे की नाही मला माहीत नाही, परंतु मी या सगळ्यांना सांगेन की, पतंगरावजींनी कदम परिवार जसा एकसंध ठेवण्याचा प्रयत्न





# वडीलधारा मार्गदर्शक

**राधाकृष्ण विखे-पाटील**
विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा

**आमचे वडील कै.बाळासाहेब विखे-पाटील आणि त्यांचा तर घनिष्ठ स्नेह राहिला. प्रवरेचा तर एकही कार्यक्रम त्यांनी चुकवला नाही. त्यापेक्षाही एका मार्गदर्शकाची भूमिका त्यांनी माझ्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीमध्ये बजावली. अनेक लोकांनी त्यांना वेगळं सांगायचा प्रयत्न केला तरी त्यांनी माझ्याबद्दलची भूमिका कधी बदलली नाही. दोन महिन्यांपूर्वी पुण्याला त्यांनी मला घरी बोलवले. दोन तास गप्पा मारल्या. वडिलांच्या निधनानंतर तेच खरे माझे मार्गदर्शक होते. त्यामुळे स्वाभाविकपणे त्या अधिकारानं ते मला काही गोष्टी सांगायचे, म्हणून त्यांच्या जाण्याने माझं व्यक्तिगत नुकसान झालं आहे. राजकारणाच्या वाटचालीत अनेक सहकारी भेटतात. मित्र होतात, पण मार्गदर्शक म्हणून त्यांची जी भूमिका होती, ती माझ्या दृष्टीने जीवनातील सगळ्यात मोठा ठेवा आहे.**

एक पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आज आपल्यातून निघून गेलेलं आहे. बऱ्याच वक्त्यांनी आदरणीय कदम साहेबांच्याबद्दल आपल्या आठवणी सांगितल्या. विधानसभेमध्ये शोकप्रस्तावाच्या निमित्ताने विस्तारानं त्यांचं संपूर्ण जे जीवनकार्य आहे, त्यापेक्षाही जो व्यक्तिगत स्नेह त्यांनी आपल्या आयुष्यामध्ये निर्माण केला आहे, त्याबद्दल मी सविस्तर बोललो आहे. अजातशत्रू अशाच प्रकारचं खरंतर त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं. ज्येष्ठता तर एवढी मोठी होती की, परंतु सहजगत्या माझ्यासारख्या एका नवख्या कार्यकर्त्याला बरोबर घेऊन बसायचे. अनेक गोष्टींबद्दल ते माहिती द्यायचे, गप्पा मारायचे. परंतु, एक सगळ्यात मोठा गुण त्यांच्यामध्ये होता की, त्यांचा स्वभाव अतिशय मोकळा होता. मनामध्ये कपट नव्हतं. त्यांच्याबद्दल प्रचंड जिज्ञासा वाटायची सगळ्यांना. हवंसं वाटणारं त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं. आमचे वडील कै.बाळासाहेब विखे-पाटील आणि त्यांचा तर घनिष्ठ स्नेह राहिला. प्रवरेचा तर






एकही कार्यक्रम त्यांनी चुकवला नाही. त्यापेक्षाही एका मार्गदर्शकाची भूमिका त्यांनी माझ्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीमध्ये बजावली. अनेक लोकांनी त्यांना वेगळं सांगायचा प्रयत्न केला तरी त्यांनी माझ्याबद्दलची भूमिका कधी बदलली नाही. दोन महिन्यांपूर्वी पुण्याला त्यांनी मला घरी बोलवलं. दोन तास गप्पा मारल्या. वडिलांच्या निधनानंतर तेच खरे माझे मार्गदर्शक होते. त्यामुळे स्वाभाविकपणे त्या अधिकारानं ते मला काही गोष्टी सांगायचे, म्हणून त्यांच्या जाण्याने माझं व्यक्तिगत नुकसान झालं आहे. राजकारणाच्या वाटचालीत अनेक सहकारी भेटतात. मित्र होतात, पण मार्गदर्शक म्हणून त्यांची जी भूमिका होती, ती माझ्या दृष्टीने जीवनातील सगळ्यात मोठा ठेवा आहे. आदरणीय कदम साहेबांनी मला जे मार्गदर्शन केलं, त्यांनी जी भूमिका मांडली, त्या सर्व चिरंतन अशा स्मृती यानिमित्ताने माझ्या मनात आहेत.

मोहनदादांचा अर्ज भरायचा होता विधानपरिषदेला. पक्ष उमेदवारी देईल की नाही, माहीत नव्हतं. मला त्यांनी सांगितलं, तू आलं पाहिजे. शेवटी आम्ही तो अर्ज भरला. पण मोहनदादांना आमदार करण्याची त्यांची जी भावना होती, त्या वेळी ते जे काही बोलले, त्यातून त्यांच्या बंधूंबद्दलचा, कुटुंबाबद्दलचा प्रचंड आदर दिसून आला. राजकारणात मला पुष्कळ मिळालं. त्यांचा हा जो व्यक्तिगत पातळीवरचा स्नेह होता, तो मला वाटतं, राजकारणाच्या पलीकडचा होता. सत्ता येते-जाते. पण हे जे नातं, मानसिक पातळीवरचं असतं, ते चिरंतन अशा प्रकारे मनामध्ये घर करून राहतं. त्यांच्या निधनाने विखे कुटुंबीयांचंही व्यक्तिगत नुकसान झालं आहे. विधिमंडळातसुद्धा पृथ्वीराज बाबांच्या डाव्या हाताला ते बसायचे. सभागृहात आले म्हणजे आधी मला विचारणार की, तू काय करायचं ठरवलं आहे आज. मग मी सांगायचो की, आज शांतता आहे सभागृहात. पण कधी काही प्रसंग आला की, ते मला सांगायचे की असं करायला पाहिजे, तसं करायला पाहिजे. आजही सभागृहात गेल्यानंतर आम्ही आधी डावीकडे पाहतो. मी त्यांना आमच्या कुटुंबीयांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

●





# पारदर्शक व्यक्तिमत्त्व

**बाळासाहेब थोरात**
ज्येष्ठ नेते काँग्रेस आणि माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मला असं वाटतं की, त्यांचं मोठेपण हे एक माणूस म्हणून खूप मोठं होतं. खऱ्या अर्थानं एक अत्यंत पारदर्शक व्यक्तिमत्त्व त्यांचं होतं. आपण म्हणतो की, राजकारण डावपेचांचं असतं, कपट-कारस्थानांचं असतं, परंतु त्यांच्या जीवनामध्ये त्यांनी राजकारणाची ही व्याख्या बदलून टाकली आणि मला खात्री आहे कोणतंही, कोणाचंही, विरोधकाचंसुद्धा कपट कारस्थान नाही, कोणाचंसुद्धा कधी वाईट चिंतलंसुद्धा नाही, मनामध्ये सुद्धा आणलं नसेल, असं व्यक्तिमत्त्व म्हणजे पतंगरावजी कदम.**

डॉ. पतंगरावजी कदम यांचं दुःखद निधन आपल्या सर्वांच्या अंतःकरणाला एक चटका लागून गेला. डॉ. पतंगराव कदम यांचं संपूर्ण जीवन पाहिलं तरी आपल्या लक्षात येतं की, अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये जीवनाची सुरुवात त्यांनी केली आणि अत्यंत कमी वयामध्ये त्यांना स्वर्गीय यशवंतरावजी मोहिते साहेबांनी एक संधी दिली, एस.टी. महामंडळाची. जिचा उल्लेख त्यांनी जीवनामध्ये कायम केला की, हो, भाऊंनी मला ती एक संधी दिली आणि तिचा खूप चांगला उपयोग मी केला, असं ते कायम सांगायचे. पण त्या संधीनंतर त्यांनी पाठीमागे वळून पाहिलं नाही. त्याबरोबरच त्यांनी शिक्षणक्षेत्रात काम सुरू केलं आणि झपाट्याने ते पुढे जात राहिले. खरं म्हणजे त्यांचं वय आपण पाहिलं तर इतक्या कमी वयामध्ये त्यांनी खूप मोठी प्रगती केलेली दिसते. शिक्षणक्षेत्रात त्यांनी एक विश्व उभं केलं, भारती विद्यापीठ या नावानं. राजकीय क्षेत्रात ८५ साली ते पहिल्यांदा निवडून आले, त्या वेळी मीही





निवडून आलो. आमचा आणि त्यांचा अत्यंत जवळकीचा संबंध आला. १९९३ साली ते पहिल्यांदा मंत्री झाले. मंत्री म्हणून काम करत असतानाही कोणतंही काम असो, ते झालं पाहिजे, असा त्यांचा प्रयत्न असायचा. नंतर विविध खातीसुद्धा त्यांनी खूप यशस्वीपणे सांभाळली. मनापासून काम करण्याची त्यांची पद्धत होती. त्यांनी सांभाळलेल्या मदत आणि पुनर्वसन विभागाची इथे चर्चा झाली. दुष्काळाच्या कालखंडात त्यांच्याकडे हा विभाग होता. प्रत्येक मंगळवारी तीन वाजता ते बैठक घ्यायचे. आठवडाभरातील प्रश्न घेऊन लोकप्रतिनिधी किंवा कोणीही असो, ते यायचे, प्रश्न मांडायचे. तो समजून घेऊन त्याविषयीचा निर्णय व्हायचा. दुसऱ्या दिवशी कॅबिनेटमध्ये ते विषय मंजूर करून घेण्यामध्ये त्यांचा हातखंडा होता. सहकार क्षेत्रात, साखर कारखाना असो किंवा अन्य काही, याही क्षेत्रात त्यांचं काम खूप चांगलं राहिलं. यशस्वी रीतीने त्यांनी सहकार चालवला, मंत्रिपद चालवलं. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय अशा विविध क्षेत्रांत त्यांनी मोठं काम केलं.

मला असं वाटतं की, त्यांचं मोठेपण हे एक माणूस म्हणून खूप मोठं होतं. खऱ्या अर्थानं एक अत्यंत पारदर्शक व्यक्तिमत्त्व त्यांचं होतं. आपण म्हणतो की, राजकारण डावपेचांचं असतं, कपट–कारस्थानांचं असतं, परंतु त्यांच्या जीवनामध्ये त्यांनी राजकारणाची ही व्याख्या बदलून टाकली आणि मला खात्री आहे कोणतंही, कोणाचंही, विरोधकाचंसुद्धा कपट कारस्थान नाही, कोणाचंसुद्धा कधी वाईट चिंतलंसुद्धा नाही, मनामध्ये सुद्धा आणलं नसेल, असं व्यक्तिमत्त्व म्हणजे पतंगरावजी कदम. आम्ही मित्रांप्रमाणे नेहमीच त्यांच्या बरोबर असायचो आणि त्यांच्या सहवासाचा आनंदच वेगळा असायचा. त्यांच्या जाण्याने ही सामाजिक, शैक्षणिक, राजकीय अशा महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात खूप मोठी पोकळी निर्माण झाली, त्याचबरोबर आपल्या सर्वांच्या व्यक्तिगत जीवनात देखील पोकळी निर्माण झाली. त्यांच्या कुटुंबाकरता हा मोठा आघात आहेच. परंतु, त्याबरोबर समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने देखील आपणा सर्वांवर देखील हा मोठा आघात झालेला आहे. आपल्याला त्यांची कायम आठवण येत राहील. खरं म्हणजे माननीय शिवाजीराव असतील, विश्वजितजी असतील, दादा असतील, यांच्याकरता फार मोठे संकट आहे. विश्वजितजींना मी एकच सांगेन की, पतंगरावांच्या आठवणींचं एक पुस्तक निघावं आणि आपल्या सगळ्यांच्या आठवणी त्यामध्ये असाव्यात. याकरिता एक वेगळं मंडळ नेमावं. त्यांच्या खूप संस्था आहेत, त्यापैकी एखाद्या संस्थेने असं काम करावं. मला निश्चित खात्री आहे की, खूप मोठ्या काळाकरिता पतंगरावजी आपल्या सगळ्यांना, महाराष्ट्राला, कायम आठवणीत राहणारं व्यक्तिमत्त्व ठरणार आहेत. त्यांच्या स्मृतीस मी भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो आणि माझे श्रद्धांजलीचे दोन शब्द संपवतो.

●





# प्रशासन यशस्वीपणे हाताळणारा नेता

**माणिकराव ठाकरे**
ज्येष्ठ नेते काँग्रेस, माजी प्रदेशाध्यक्ष

**मी प्रांत अध्यक्ष असतानाचा एक प्रसंग आठवतोय, आदिवासींना त्यांच्या कसत असलेल्या जमिनी परत कराव्यात, म्हणून केंद्रामध्ये एक कायदा आहे आणि त्या कायद्याची अंमलबजावणी प्रत्येक राज्यामध्ये चांगल्या पद्धतीने व्हायला पाहिजे, अशा प्रकारे पक्ष नेतृत्वाकडून मला सूचना आल्या. महाराष्ट्रात आदिवासींना जमिनी परत करण्यासंदर्भातील टक्केवारी त्या वेळी ७ की १० टक्क्यांपर्यंत होती. ती टक्केवारी अधिक वाढली पाहिजे, असं मी पतंगरावजींना सांगितलं आणि त्यांनी तात्काळ एक बैठक बोलवली. त्यांनी नियोजन करून दिलं की, कशा पद्धतीने आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळाल्या पाहिजेत. दहा टक्क्यावरून पुढच्या तीन-चार महिन्यांमध्ये जवळ जवळ ४० टक्के आदिवासींना त्यांच्या जमिनी परत करण्यासंदर्भातला निर्णय पतंगरावांनी प्रशासनाला दिला. ही जी त्यांची हातोटी होती, त्याद्वारे त्यांनी दाखवून दिलं की, आपण प्रशासन कशा पद्धतीने हाताळू शकतो.**

पतंगरावजी कदम साहेब हे आज आपल्यात नाहीत, यावर तुमचा आमचा विश्वासच नाही बसत. मंत्रिमंडळामध्ये आणि राजकीय कामामध्ये पतंगरावांसोबत काम करण्याची संधी मिळाली. पतंगरावजींनी डोंगरी क्षेत्रामध्ये काम करत असताना, याठिकाणी जो उल्लेख झाला पतंगरावजींच्या संदर्भामध्ये की, त्यांनी मंत्री म्हणून काम करत असताना तो विरोधी पक्षाचा आमदार असेल किंवा सत्ताधारी पक्षाचाही आमदार असेल तरीही त्या सगळ्याच आमदारांशी त्यांचं जिव्हाळ्याचं नातं होतं. एकेरी नाव घेऊन ते बोलायचे आणि सगळे आमदार त्यांच्यावर प्रचंड प्रेम करायचे. कोणताही प्रश्न असला तरी पतंगराव कधी अडचणीत आहेत, असा प्रसंग आम्ही कधी पाहिलाच नाही. राजकीय क्षेत्रातला कोणताही कार्यक्रम असो, मी प्रदेशाध्यक्ष असताना पतंगरावजींना कोणत्याही कार्यक्रमाला बोलवलं आणि ते कार्यक्रमाला आले नाहीत, असं कधीच व्हायचं नाही. असा एकसुद्धा प्रसंग मला





आठवत नाही. अशा प्रकारे पक्षावर पतंगरावांची जी निष्ठा होती, ती नेतृत्वावर निष्ठा होती, श्रद्धा होती. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पक्ष वेगळे झाले, त्या वेळेला पतंगरावजी ठामपणे काँग्रेस पक्षाच्या पाठीमागे उभे राहिले. माधवरावजी सिंधीया साहेब असतील, सोनियाजी गांधी असतील, त्यांच्यावर पतंगरावांनी विश्वास दाखवला आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाची धुरा सांभाळली. अशा प्रकारचं काँग्रेस पक्षामधलं हे नेतृत्व आमच्यामधून निघून गेलं. त्या वेळेला मी प्रांत अध्यक्ष असतानाचा एक प्रसंग आठवतोय, आदिवासींना त्यांच्या कसत असलेल्या जमिनी परत कराव्यात, म्हणून केंद्रामध्ये एक कायदा आहे आणि त्या कायद्याची अंमलबजावणी प्रत्येक राज्यामध्ये चांगल्या पद्धतीने व्हायला पाहिजे, अशा प्रकारे पक्ष नेतृत्वाकडून मला सूचना आल्या. महाराष्ट्रात आदिवासींना जमिनी परत करण्यासंदर्भातील टक्केवारी त्या वेळी ७ की १० टक्क्यांपर्यंत होती. ती टक्केवारी अधिक वाढली पाहिजे, असं मी पतंगरावजींना सांगितलं आणि त्यांनी तात्काळ एक बैठक बोलवली, मलाही त्यासाठी निमंत्रित केलं.

त्यांनी नियोजन करून दिलं की, कशा पद्धतीने आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळाल्या पाहिजेत. दहा टक्क्यावरून पुढच्या तीन-चार महिन्यांमध्ये जवळ जवळ ४० टक्के आदिवासींना त्यांच्या जमिनी परत करण्यासंदर्भातला निर्णय पतंगरावांनी प्रशासनाला दिला. ही जी त्यांची हातोटी होती, त्याद्वारे त्यांनी दाखवून दिलं की, आपण प्रशासन कशा पद्धतीने हाताळू शकतो.

अशा केवळ एकाच क्षेत्रात नाही, तर अनेक क्षेत्रांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण काम केलं. राज्यात दुष्काळ होता, त्या वेळी मदत आणि पुनर्वसन खातं त्यांच्याकडे होतं. याठिकाणी सन्माननीय सुशीलकुमारजी शिंदे साहेब आहेत, अशोकरावजी चव्हाण साहेब आहेत, आदरणीय पृथ्वीराजजी आहेत. हे सर्व मुख्यमंत्री असताना, त्यांच्या कार्यकाळामध्ये काम करत असताना पतंगरावजींनी एखादा शब्द वापरला किंवा एखादा विषय त्याठिकाणी मांडला, तरी कधीही मुख्यमंत्र्यांकडूनही ते नाकारलं जात नव्हतं. कारण ते पतंगरावजींनी सांगितलं म्हणजे ग्रामीण भागाच्या हिताचं आहे, महत्त्वाचं आहे, त्याला मान्यता दिली पाहिजे, अशा प्रकारची भूमिका शासनाकडून, माननीय मुख्यमंत्र्यांकडून घेतली जायची. अशा प्रकारचं नेतृत्व त्यांचं होतं. राजकारणामध्ये खऱ्या अर्थाने त्यांच्यासोबत काम करण्याची संधी आम्हाला मिळाली, त्या वेळी अगदी जवळून पाहता आलं. ते कोषाध्यक्ष होते, काँग्रेस प्रदेश कमिटीचे. त्याहीवेळेला अत्यंत प्रभावीपणे त्यांनी काम केलं. सोनियाजी गांधी असतील, प्रणव मुखर्जी साहेब असतील, नरसिंह रावजी असतील, या सगळ्यांशी त्यांचे फार सलोख्याचे आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. अशा प्रकारचं एक नेतृत्व आपल्यामधून निघून गेलं. शिक्षणक्षेत्रामध्ये, राजकीय क्षेत्रामध्ये आणि सहकार क्षेत्रामध्ये त्यांनी एक दिशा दाखवली आहे. त्यांनी केलेलं कार्य आपल्या सर्वांना निश्चितच भविष्यामध्ये मार्गदर्शन देत राहील, अशा प्रकारचा विश्वास आपल्या सर्वांना आहे. त्यांना मी माझ्या वतीनं, माझ्या कुटुंबाच्या वतीनं याठिकाणी श्रद्धांजली अर्पित करतो आणि माझे दोन शब्द संपवतो. ●





# दिलदार माणूस

**उल्हासदादा पवार**
ज्येष्ठ नेते, काँग्रेस

**परिवारावर प्रेम करणारा, आईबद्दल श्रद्धा बाळगणारा, आईच्या नावाने पंढरपूरमध्ये धर्मशाळा बांधणारा, कला आणि संस्कृतीवर प्रेम करणारा, सकृतदर्शनी रांगडा असलेला, पण मनाचा अत्यंत दिलदार मवाळ असलेला असा हा माणूस आज आपल्यामध्ये नाही.**

स्वर्गीय पतंगरावजी कदम यांच्या अनेक आठवणी त्यांच्या बऱ्याच सहकाऱ्यांनी, मित्रांनी आणि त्यांच्याबद्दल आदर असलेल्या अनेक व्यक्तींनी मांडलेल्या आहेत. मी त्यांच्या परिवाराचा एक घटक या नात्याने आणि अगदी सुरुवातीपासून पतंगरावजी वाडिया कॉलेजमध्ये टिचर्स डिप्लोमा करीत असताना त्याच कॉलेजमध्ये मी शिकत होतो. तेव्हापासून मी पतंगरावजींना पाहिलं आहे. साधा पायजमा- शर्ट घालून सायकलवर यायचे. ज्या रयत शिक्षण संस्थेमधून ते शिकून आले, त्याच रयत शिक्षण संस्थेच्या हडपसरला असलेल्या साधना विद्यालयात शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली. त्या वेळी त्यांच्या लक्षात आले की, ग्रामीण भागातील जे विद्यार्थी आहेत ते इंग्रजी आणि गणित या विषयांमुळे दहावीच्या परीक्षेत नापास होतात. म्हणून बहुजन समाजातील, खेड्यापाड्यातील, उपेक्षित-वंचित, ज्यांना गणित आणि इंग्रजी हे विषय अवघड






जातात त्यांच्यासाठीच स्पर्धा परीक्षा घेऊन त्यांचे हे विषय पक्के करावेत, या कल्पनेतून त्यांच्या मनात खरे विचार सुरू झाले. त्यातून भारती विद्यापीठाची कल्पना साकार झाली आणि त्या परीक्षा सुरू झाल्या, त्याचा मी साक्षीदार आहे. मग भारती विद्यापीठाची स्थापना होऊन नंतर नवी पेठेमध्ये जी दलित वस्ती होती– मातंग समाजाची, त्याठिकाणी म्हात्रेंनी दिलेल्या छोट्याशा जागेमध्ये ते कार्यालय आले.

आज आपल्याला जंगली महाराज रोडला इंजिनिअरिंग कॉलेजच्या हॉस्टेलच्या बाहेर कै. शंकरराव मोरे यांचा जो पुतळा आपल्याला पाहायला मिळतो, ती कल्पना पतंगरावजींची. ती अशा स्वरूपातून आली की, सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणावादाविरुद्ध चळवळ त्याला वर्गलढ्याचे रूप देणारे एक विचारवंत आणि १९५२ आणि १९६२ दोन वेळा खासदार असलेले अतिशय थोर संसदपटू, ज्यांना स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू देखील खूप मानत असत, त्या शंकरराव मोरे यांचे स्मारक पुण्यामध्ये असावे, ही पतंगरावजींची कल्पना. ती कल्पना साकार करण्यासाठी पुण्याच्या सर्किट हाउसच्या हिरवळीवर पतंगरावजींनी एक बैठक आयोजित केली होती. त्यात स्वर्गीय यशवंतरावजी मोहिते, आदरणीय प्रा. एन. डी. पाटील, रवींद्र मोरे, नामदेवराव मते, नहार, त्या सगळ्यांना घेऊन शंकरराव मोरे यांचे स्मारक आणि तो अर्धपुतळा त्यांनी समारंभपूर्वक स्थापन केला. पहिली शाळा कोथरूडला वसाहतीच्या जवळ ही कै. शंकरराव मोरे यांच्या नावाने सुरू केली. पत्र्याच्या खोल्यांमध्ये ती शाळा सुरू केली होती, त्याचा एक साक्षीदार या नात्याने मी त्या आठवणींना उजाळा देऊ इच्छितो. स्वर्गीय शंकरराव मोरे यांचा पुतळा, त्यांच्या नावाची शाळा इथपासून जो प्रवास सुरू झाला, त्याला अचाट कल्पना, प्रचंड इच्छाशक्ती, प्रचंड महत्त्वाकांक्षा, अविरत कष्ट करण्याची तयारी, जिद्द, कुठेही न थांबता संकटांना सामोरे जाताना सगळ्या नेत्यांचा आशीर्वाद बरोबर घेऊन चाललेली पतंगरावजींची वाटचाल ही अनेकांनी, महाराष्ट्रातील सर्वांनी पाहिली, त्यापैकी एक मी. त्यांची ही जी भरारी आहे ती खरोखरच इतकी उत्तुंग आहे की, एका दहा बाय दहाच्या खोलीमधले हे विद्यापीठ आज पूर्ण भारतभर आणि भारताबाहेरील आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी संलग्न असलेल्या त्यांच्या शाखा, याचे या ठिकाणी कौतुक करावेसे वाटते.

पतंगरावांचे आणखी एक वैशिष्ट्य पाहायला मिळालं ते असं की, स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्यापासून, मोहिते साहेबांच्यापासून, दादांच्यापासून वसंतराव नाईकांच्यापर्यंत सर्वांचा, सहकार्याचा, आशीर्वादाचा आणि पाठिंब्याचा हात पतंगरावजींच्या पाठीवर कायम सगळ्यांनी ठेवला होता. हे सकृतदर्शनी रांगडे असणारे, खळाळून हसणारे, भेटल्यानंतर आपल्यावर रागावलेले आहेत, असे क्षणभर वाटायचे, पण त्या रांगडेपणामध्ये प्रेमाचा, आपुलकीचा, माणुसकीचा आणि जवळकीचा ओलावा होता. सोनसळ त्यांचे गाव. सोनहिरा ज्याचे स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांनी आपल्या कृष्णाकाठमध्ये वर्णन केले आहे, या सर्व गोष्टींवर त्यांची अपार माया आणि प्रेम होते. त्यांच्या गावाजवळ असलेले चौरंगीनाथांचे मंदिर जे नवनाथांच्यापैकी एक होते, त्या मंदिराचा त्यांनी केलेला जीर्णोद्धार असेल किंवा त्या ठिकाणी बांधलेले गेस्ट हाउस असेल, तो निसर्ग, ते गाव, आपले कुटुंब आणि आपल्या गावातला प्रत्येक माणूस या सगळ्याबद्दल त्यांना खूप आस्था होती. या प्रत्येकाचे पुनरुत्थान व्हावे, त्याची उन्नती व्हावी, ही जी इच्छाकांक्षा पतंगरावजींनी उराशी बाळगली, ती खूप मोठी होती. हे सगळं करीत असताना सहकारी भांडार, सहकारी बँक त्यांनी निर्माण केली. मला आजही पायजमा-शर्ट घातलेले, सायकलवर फिरणारे आणि नंतर एक जुनी स्कुटर घेऊन त्यावरून फिरणारे पतंगराव कदम आठवतात. पन्नास पन्नास रुपयांचा भारती बँकेचा शेअर गोळा करणारे पतंगराव कदम मी पाहिलेले आहेत. अशी वाटचाल करत करत एका विद्यापीठाचे कुलपती ते झाले.

उत्तम गुणवत्तेचे शिक्षण त्यांनी दिले. त्यांनी मेडिकल कॉलेज काढल्यानंतर बी. जे. मेडिकल कॉलेजचे डीन रानडे निवृत्त झाल्यानंतर पतंगरावांनी त्यांना विनंती केली आणि त्यांना त्या ठिकाणी रुजू केले. मला आश्चर्य वाटलं, या गोष्टीचं. त्या वेळी पतंगराव मला म्हणाले की, 'काय आहे, आपण ती व्यक्ती कोण आहे ते न बघता, त्या व्यक्तीची विद्वत्ता बघायची. त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांच्या हाताखाली तोलामोलाचे विद्यार्थी घडतील, ती माझी अपेक्षा आहे.'

सर्व भेदाभेदाच्या पलीकडे माणूस पाहाणारा, नेहमी जात-पात-पंथ -धर्म याच्यापलीकडे जाऊन सर्व विद्यार्थ्यांना मदत करणारा असा एक अजातशत्रू म्हणजे पतंगरावजी. अनेक गरीब मुलांना, त्यांनी अ‍ॅडमिशन दिल्याचे मी पाहिलेले आहे. ती मुलं आज मोठी झाली आहेत. कोणी डॉक्टर झाले, कोणी इंजिनिअर झाले. त्यांनी कधी पक्षभेद किंवा कोणत्याही प्रकारचा भेद केला नाही. गरिबातल्या गरीब मुलांना मोफत शिक्षण द्यावं, अशी चिठ्ठी घेऊन अनेक कार्यकर्ते यायचे. शिवाजीराव, विश्वजित यांच्याकडेही ते कार्यकर्ते यायचे. त्या वेळी पतंगराव एवढ्या मोठ्याने रांगड्या भाषेत म्हणायचे की, 'दादा, आख्खी फी माफ करायची की, आर्धी माफ करायची एवढंच सांग.' लगेच दोन मिनिटात म्हणजे अगदी चालत असताना देखील सही करून त्यांची फी माफ करायचे. अशा अनेक आठवणी या ठिकाणी आहेत. मुख्य म्हणजे हे सगळं करीत असताना स्वतःचं मोठेपण कधीही न मिरवता ते नेहमी सांगायचे की, 'दादा, मी सगळीकडे फिरतो रे. पण यामध्ये शिवाजीरावांचा वाटा आहे, यामध्ये आमच्या मोहनरावदादांचा वाटा आहे, यामध्ये माझ्या सगळ्या परिवाराचा वाटा आहे. शेती करणारा माझा भाऊ हा जर शेती करत नसता तर आमची शेती कधीच गेली असती.' अशा अनेक गोष्टी ते खूप मनापासून मान्य करायचे. परिवारावर प्रेम करणारा, आईबद्दल श्रद्धा बाळगणारा, आईच्या नावाने पंढरपूरमध्ये धर्मशाळा बांधणारा, कला आणि संस्कृतीवर प्रेम करणारा, सकृतदर्शनी रांगडा असलेला पण मनाचा अत्यंत दिलदार मवाळ असलेला असा हा माणूस आज आपल्यामध्ये नाही. माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या भावना, वेदना शब्दातून प्रकट करणं अतिशय अवघड आहे. मी माझ्या वतीनं, माझ्या पक्षाच्या वतीनं, माझ्या असंख्य सहकाऱ्यांच्या वतीनं, त्यांच्या चाहत्यांच्या वतीनं त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. शिवाजीराव, मोहनराव, विश्वजित, वहिनी आणि सगळ्या कदम परिवाराला मी खात्री देऊ इच्छितो की, माझ्यासारखे असंख्य कार्यकर्ते आपल्या पाठीशी सदैव उभे राहतील. धन्यवाद. ●



**“ अनेक गरीब मुलांना, त्यांनी अ‍ॅडमिशन दिल्याचे मी पाहिलेले आहे. ती मुलं आज मोठी झाली आहेत. कोणी डॉक्टर झाले, कोणी इंजिनिअर झाले. त्यांनी कधी पक्षभेद किंवा कोणत्याही प्रकारचा भेद केला नाही. गरिबातल्या गरीब मुलांना मोफत शिक्षण द्यावं, अशी चिठ्ठी घेऊन अनेक कार्यकर्ते यायचे. शिवाजीराव, विश्वजित यांच्याकडेही ते कार्यकर्ते यायचे. त्या वेळी पतंगराव एवढ्या मोठ्याने रांगड्या भाषेत म्हणायचे की, 'दादा, आख्खी फी माफ करायची की, आर्धी माफ करायची एवढंच सांग.' लगेच दोन मिनिटात म्हणजे अगदी चालत असताना देखील सही करून त्यांची फी माफ करायचे. ”**






# चालतं-बोलतं विद्यापीठ

**हर्षवर्धन पाटील**
ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मी जवळजवळ १५ वर्षे राज्य मंत्रिमंडळामध्ये त्यांचा एक कनिष्ठ सहकारी म्हणून त्यांच्याबरोबर काम केलं. पण बहुजन समाजातील, सर्वसाधारण कुटुंबातील एखादी व्यक्ती काय करू शकते, हे त्यांच्या कर्तृत्वावरून लक्षात येते. मंत्रिमंडळ असो, विधानसभा असो, प्रशासकीय कामकाज असो, कदम साहेबांच्या डिक्शनरीमध्ये 'नाही' हा शब्द कधीच नव्हता. कोणताही अधिकारी असला तरी ते त्यांच्याच भाषेत सांगायचे आणि अधिकाऱ्यांनाही कधी त्यांच्या बोलण्याबद्दल वाईट वाटायचं नाही. त्यांच्यातला तो मोकळेपणा होता. एखादी गोष्ट बोलल्यानंतर ते सहजपणे विसरून जायचे आणि आम्हाला कोणालाही कधी त्याबद्दल वाईट वाटत नव्हतं. कारण आपुलकीनं, वडिलकीच्या नात्यानं ते आपल्या भूमिका मांडत असायचे. खऱ्या अर्थाने एक चालतं-बोलतं विद्यापीठ म्हणजे पतंगराव कदम साहेब होते.**

आज आपण सर्वजण कदम साहेबांना श्रद्धांजली वाहण्यासाठी या ठिकाणी एकत्र जमलेले आहोत. अजूनही विश्वास बसत नाही की, कदम साहेब आपल्यामध्ये नाहीत म्हणून. कारण पाच महिन्यांपूर्वी याच बालगंधर्व रंगमंदिरात एक कार्यक्रम झाला होता आणि व्यासपीठावर मध्यभागी कदम साहेब बसले होते आणि मी पण त्या कार्यक्रमाला उपस्थित होतो. असं वाटलं नाही, की ते इतक्या लवकर आपल्यातून निघून जातील म्हणून. मी जवळजवळ १५ वर्षे राज्य मंत्रिमंडळामध्ये त्यांचा एक कनिष्ठ सहकारी म्हणून त्यांच्याबरोबर काम केलं. पण बहुजन समाजातील, सर्वसाधारण कुटुंबातील एखादी व्यक्ती काय करू शकते, हे








त्यांच्या कर्तृत्वावरून लक्षात येते. मंत्रिमंडळ असो, विधानसभा असो, प्रशासकीय कामकाज असो, कदम साहेबांच्या डिक्शनरीमध्ये 'नाही' हा शब्द कधीच नव्हता. कोणताही अधिकारी असला तरी ते त्यांच्याच भाषेत सांगायचे आणि अधिकाऱ्यांनाही कधी त्यांच्या बोलण्याबद्दल वाईट वाटायचं नाही. त्यांच्यातला तो मोकळेपणा होता. एखादी गोष्ट बोलल्यानंतर ते सहजपणे विसरून जायचे आणि आम्हाला कोणालाही कधी त्याबद्दल वाईट वाटत नव्हतं. कारण आपुलकीनं, वडिलकीच्या नात्यानं ते आपल्या भूमिका मांडत असायचे.

खऱ्या अर्थाने एक चालतं-बोलतं विद्यापीठ म्हणजे पतंगराव कदम साहेब होते. सर्वसामान्य, गोरगरीब लोकांना सढळ हाताने मदत करण्याची दानत त्यांच्यामध्ये होती. आता उल्हासदादा म्हणाले त्याप्रमाणे, ज्या वेळी भारती विद्यापीठ मोठ्या प्रमाणात विकसित झालं, त्या वेळेस गरीब विद्यार्थ्याने फी माफ करण्याकरता म्हणून अर्ज केला की, कधी अर्धी फी माफ व्हायची तर कधी संपूर्ण फी माफ व्हायची. उभी केलेली ही संस्था सर्वसामान्य माणसासाठी आहे, अशी भावना कायमच त्यांच्या मनामध्ये असायची.

भारती विद्यापीठासारखी एक संस्था निर्माण करणं आणि त्या उभारणीमध्ये कदम साहेब असतील, शिवाजीराव असतील, मोहनदादा असतील, आता विश्वजित असतो, त्यांचा सगळा परिवार असेल, या सगळ्यांनी खूप मेहनत घेतली आणि त्यामुळे ते हे विश्व निर्माण करू शकले. अनेकांनी भावना व्यक्त केल्या. मी अधिक बोलणार नाही. पण ज्या व्यक्तीने हजारो डॉक्टर या राज्यामध्ये, या देशामध्ये निर्माण केले, पण दुर्दैवाने ही वैद्यकीय सेवासुद्धा त्यांच्या बाबतीत अपुरी पडली ही खरी खंत आमच्या सगळ्यांच्या मनामध्ये आहे. म्हणून, मोहनदादा, शिवाजीराव, विश्वजित सगळ्यांवर खूप मोठे दुःख आलेले आहे आणि आम्ही सर्वजण त्याच्यामध्ये सहभागी आहोत. मला वाटतं की, कदम साहेबांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली वायची असेल तर त्यांनी आखून दिलेल्या मार्गावर चालणं आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मागे आपण सर्वांनी उभं राहणं आवश्यक आहे. मी माझ्या वतीनं, माझ्या परिवाराच्या वतीनं भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

●



# दीपस्तंभ




**राजीव सातव**
खासदार

**साहेब गेले त्याच्या आदल्या दिवशी लीलावतीमध्ये सोनियाजी गांधी मॅडम त्यांना भेटून गेल्या. आता लोकसभेचे अधिवेशन सुरू आहे. राहुलजी त्या दरम्यान सिंगापूरला होते. ते आल्यानंतर जवळ जवळ ४० मिनिटे लोकसभेच्या लॉबीमध्ये सोनियाजी आणि राहुलजी पतंगरावांच्या संदर्भात अशोकराव चव्हाण साहेब आणि इतर सगळ्यांशी चर्चा करीत होते. पतंगराव कदम साहेबांनी कशा पद्धतीने काँग्रेसच्या एकंदर जडणघडणीत महत्त्वाची भूमिका पार पाडली, यासंदर्भात ते बोलत होते.**

स्वर्गीय आमदार पतंगरावजी कदम साहेबांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आपण जमलेलो आहोत. गेल्या ५-६ वर्षांमध्ये महाराष्ट्राने पाच लोक नेते गेल्याचं दुःख अनुभवलं. २०१२ साली अचानक विलासराव देशमुख साहेब गेले, हजारोंच्या-लाखोंच्या संख्येने जनसमुदाय त्यांना अखेरचा निरोप द्यायला आला. बाळासाहेब ठाकरे साहेब २०१२ मध्येच गेले. २०१४ साली लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब गेल्याचे दुःख महाराष्ट्राला होते. २०१५ साली जिल्हा परिषद आणि पुढील मंत्रिपदाच्या माध्यमातून ज्यांनी तरुण कार्यकर्त्याला राजकारण करण्याचं मार्गदर्शन केलं ते आर.आर. आबा गेले. आबा गेल्याचे दुःख आणि त्याचा चटका महाराष्ट्रातील सगळ्यांना आजही आहे. आणि २०१८ मध्ये आपल्यातून पतंगराव कदम साहेब गेल्याचे दुःख आहे. असे पाच लोकनेते गेले.

माझं शालेय शिक्षण आणि कॉलेजचं शिक्षण हे याच ठिकाणी पुण्यातच झालं. शाळेमध्ये असताना, कॉलेजमध्ये असताना दोन व्यक्तिमत्त्वांचं अनामिक आकर्षण मला नेहमी वाटत राहिलं. एक म्हणजे पवार साहेब, ज्या पद्धतीने त्यांनी राजकीय क्षेत्रात काम उभं केलं, त्यांच्याबद्दलचं एक आकर्षण असायचं आणि दुसरं म्हणजे शिक्षण, सहकार आणि नंतर राजकारणामध्ये जे काम कदम साहेबांनी केलं, त्याच्याबद्दलचं एक आकर्षण आम्हा सगळ्याच तरुणांना होतं. ग्रामीण भागाची पार्श्वभूमी असलेला माणूस एखादी गोष्ट ठरवतो आणि एवढ्या मोठ्या पद्धतीने काम उभे करतो. याचे कुतूहल होते. ते सतरा रुपये घेऊन पुण्यात आले आणि हजारो लोकांना मदत करू शकले, हजारो लोकांना त्यांच्या कार्यकर्तृत्वातून दिशा देण्याचं काम हे कदम साहेबांच्या माध्यमातून झालं. मी ज्या वेळेस युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो, तसेच जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून काही कामासाठी अनेक मंत्र्यांकडे जाण्याचा योग आला. दोनच मंत्री असे भेटले. मी वसंतदादा पाटील यांना कधीच पाहू शकलो नाही. कारण मी लहान होतो. पण दादांविषयी आम्ही ऐकायचो की दादा लुंगी, बनियानवर बसलेले असायचे. मोकळ्या मनाने बोलवणं आणि कामं करून देणं असं वसंतदादांबद्दल आम्ही ऐकायचो. परंतु, मागच्या काही वर्षांमध्ये दोन






नेत्यांकडे जाताना अगदी त्यांच्या बेडरूममध्ये जातानासुद्धा मला कधी संकोच वाटला नाही, त्यामध्ये एक मनोहर नाईक साहेब होते. कोणत्याही कामानिमित्त मनोहर नाईक साहेबांकडे गेलो आणि ते बेडरूममध्ये असले तरी तिथे बोलवायचे आणि अर्धा-अर्धा, एक-एक तास चर्चा करायचे. तीच पद्धत पतंगराव कदम साहेबांची होती. वेळ पाहिजे आणि वेळ नाही, असं त्यांचं नव्हतं. आजारी असले तरी, तब्येत बरी नसली तरी जिथे असतील तिथे भेटायची या नेत्याची तयारी होती. त्यामुळे आम्ही सगळ्यांनी एक दीपस्तंभ या रूपात कदम साहेबांकडे पाहिलं.

माझ्या मतदारसंघामध्ये औंढा ज्योतिर्लिंग आहे. एकदा औंढा ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी पतंगराव कदम साहेब आले. त्या वेळी मी त्यांच्याकडे मदत मागितली. या ठिकाणी वन पर्यटनाचा विचार ते करू शकले, तर फार मोठी मदत होऊ शकेल असे सांगितले. तिथे जंगल नव्हतं, पण त्यांनी वन पर्यटन जाहीर केलं. आता त्या ठिकाणी चांगल्या प्रकारचं वनही तयार झालं आहे. काही प्राणीसुद्धा त्या ठिकाणी येऊ लागले आहेत. म्हणजे एखाद्या वेळी एखाद्या नेत्याने ठरवलं तर तो ते करू शकतो. असं आम्ही वसंतदादा साहेबांच्या संदर्भात ऐकायचो. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या संदर्भात ऐकलं. शरद पवार साहेबांच्या संदर्भात तर पाहतोच आहोत. परंतु, मदत करायची असेल तर कशी मदत केली पाहिजे, याचं उदाहरण कदम साहेब होते.

माझ्या जिल्ह्यामध्ये गारपीट झाली. कलेक्टरांनी अहवाल दिला की, पंधरा गावांत गारपीट झाली. त्या वेळी साहेब मदत आणि पुनर्वसन मंत्री होते. जिल्ह्यातले आम्ही सगळेच आमदार त्यांच्याकडे गेलो. त्यांना विनंती केली की, साहेब, सगळ्यांना सरसकट मदत झाली तर बरं होईल. मदत आणि पुनर्वसन सचिव सांगायला लागले की, साहेब २२ गावांनाच गारपीट झाली आहे आणि २२ गावांनाच आपण मदत करू शकतो. २२ गावांच्या पुढे मदत करता येणार नाही. जिल्हाधिकारी तयार नव्हते. त्या वेळी कदम साहेबांनी सांगितलं की, गारपीट झाली म्हणजे जोराची थंड हवा, थंड वारा आला. म्हणजे गारपीट झालेल्या आजुबाजूच्या गावांमध्येही तो थंड वारा आला. गारपीट झालेल्या आजुबाजूच्या गावांमधील वातावरणावर आणि पर्यायाने तिथल्या शेतीवर परिणाम झाला असं समजून आपण तिथल्या सर्व गावांना मदत केली पाहिजे, असे कदम साहेबांनी सांगितले आणि सरसकट मदत दिली. ते मंत्री असताना गारपिटीची मदत एक वर्ष नाही, तर तीन वर्षं मदत मिळू शकली. एखाद्या सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नाला तडीस लावायचे असेल तर तेही ते करायचे. हल्लीच्या काळामध्ये नोकरशाही




सहजासहजी ऐकत नाही. परंतु, पतंगराव कदमांनी जर ठरवलं तर नियम बाजूला सारून मदत केल्याची उदाहरणे आम्हा तरुण कार्यकर्त्यांच्या समोर आहेत.

साहेब गेले त्याच्या आदल्या दिवशी लीलावतीमध्ये सोनियाजी गांधी मॅडम त्यांना भेटून गेल्या. आता लोकसभेचे अधिवेशन सुरू आहे. राहुलजी त्या दरम्यान सिंगापूरला होते. ते आल्यानंतर जवळ जवळ ४० मिनिटे लोकसभेच्या लॉबीमध्ये सोनियाजी आणि राहुलजी पतंगरावांच्या संदर्भात अशोकराव चव्हाण साहेब आणि इतर सगळ्यांशी चर्चा करीत होते. पतंगराव कदम साहेबांनी कशा पद्धतीने काँग्रेसच्या एकंदर जडणघडणीत महत्त्वाची भूमिका पार पाडली, यासंदर्भात ते बोलत होते. एक नेता ज्याने केवळ शैक्षणिक संस्था उभी केली असं नाही, केवळ सहकार क्षेत्रात काम केलं असं नाही, तर दिलदार मनाचा हा नेता सगळ्या क्षेत्रात काम करीत होता. एखादी गोष्ट करायची ठरवली म्हणजे करायची, असे ते होते. तडफेने बोलायचे. गोरगरिबांबद्दलची जी कणव त्यांना होती, ती फार कमी नेत्यांमध्ये आढळते. त्यापैकी हा एक नेता होता.

कदम साहेब अचानक गेले, ती खंत तर आहेच. परंतु, पतंगराव कदम साहेब हे राज्याचे मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत, ही खंतसुद्धा आम्हा राजकीय कार्यकर्त्यांच्या मनात आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या मनामध्ये राहणार आहे. हा प्रचंड ताकदीचा नेता होता, अनेक वर्षे तडफेने काम करणारा नेता होता पण ते मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत, ही खंत कायमच आपल्या मनात राहणार आहे. काँग्रेस पक्षाच्या उभारणीत त्यांचं मोठं योगदान राहिलं. दुसरे विलासराव गेल्या सहा वर्षांत आम्ही शोधू शकलो नाहीत, दुसरे बाळासाहेब ठाकरे आम्हाला दिसले नाहीत. दुसरे आर.आर. आबा कुठेच सापडले नाहीत. गोपीनाथ मुंडेसुद्धा सापडले नाहीत. दुसरे पतंगराव कदमसुद्धा निर्माण होणं अवघड आहे. 'या सम हाच' असा हा विषय आहे. परंतु, इतके दिवस मार्गदर्शक म्हणून आपण कदम साहेबांकडे पाहत होतो. आज पतंगराव कदम साहेब आपल्यात नाहीत. कदम परिवारावर दुःख आहे. विश्वजित पोरका झालेला आहे. माझी आपल्या सगळ्यांना विनंती आहे की, इतके दिवस पतंगराव आपले मार्गदर्शक होते, यापुढे विश्वजितचे मित्र, भाऊ, विश्वजितच्या परिवारातले सदस्य आणि त्याचे मार्गदर्शक म्हणून आपण सगळ्यांनी काम करावं. कदम परिवाराच्या या दुःखात आणि एका थोर नेत्याच्या जाण्याने झालेल्या दुःखात आपण सगळेच आहोत. आपल्या सगळ्यांतर्फे मी श्रद्धांजली व्यक्त करतो. धन्यवाद.



# माणुसकी जपणारं, प्रेम देणारं व्यक्तिमत्त्व



**सुदैवाने ज्या वेळी २००० साली मंत्रिमंडळात सहभागी झालो राज्यमंत्री म्हणून, तो प्रसंग मी कधीही विसरू शकणार नाही, असा आहे. पवार साहेबांना एखादं खातं सांगावं की, कुठलं खातं द्यावं, त्या वेळी मी त्यांना असं सांगितलं की, पतंगरावांना जे खातं मिळेल त्या खात्याचा राज्यमंत्री म्हणून मला काम करायला आवडेल. मग त्यांचं कुठलंही खातं असलं तरी चालेल. त्या अनुषंगाने मी स्वत:ला भाग्यवान समजतो की, जलसंधारण असेल, उद्योग असेल, या खात्यांचा राज्यमंत्री म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना मला खूप शिकायला मिळालं. पक्षाने त्यांच्यावर जी जी जबाबदारी टाकली, त्यासंदर्भातले सगळेच निर्णय त्यांनी अतिशय धडाकेबाज पद्धतीने घेतले. त्यांच्याकडे असलेलं मदत आणि पुनर्वसन खातं आणि मराठवाड्यातला दुष्काळ, या काळातील त्यांची काम करण्याची पद्धत, त्यांनी घेतलेले निर्णय हे कधीही विसरता न येणारं आहे.**

**राजेश टोपे**
माजी उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

कै. पतंगरावजी कदम यांचे अनेक परिवारांशी, घराण्यांशी खूप जिव्हाळ्याचे संबंध होते, त्यातील एक घराणे म्हणजे टोपे घराणं. खऱ्या अर्थाने माझे वडील कै. अंकुशराव टोपे आणि ते ७२ च्या काळापासून आमदारही होते आणि तेव्हापासून त्यांचे खूप स्नेहाचे संबंध होते. आज दुसऱ्या पिढीमध्ये माझ्याशीसुद्धा तेवढ्याच मार्गदर्शनाचं, स्नेहाचं, प्रेमाचं नातं त्यांनी जपलं. माझं इंजिनिअरिंगचं शिक्षण पुण्यामध्ये झालं, तेव्हापासूनच या व्यक्तिमत्त्वाबद्दल एक वेगळा आदर नेहमीच असायचा की, एवढं मोठं विश्व त्यांनी निर्माण केलं. सुदैवाने ज्या वेळी २००० साली मंत्रिमंडळात सहभागी झालो राज्यमंत्री म्हणून, तो प्रसंग मी कधीही विसरू शकणार नाही, असा आहे. पवार साहेबांना एखादं खातं सांगावं की, कुठलं खातं द्यावं, त्या वेळी मी त्यांना असं सांगितलं की, पतंगरावांना जे खातं मिळेल त्या खात्याचा राज्यमंत्री म्हणून मला काम करायला आवडेल. मग त्यांचं कुठलंही खातं






असलं तरी चालेल. त्या अनुषंगाने मी स्वतःला भाग्यवान समजतो की, जलसंधारण असेल, उद्योग असेल, या खात्यांचा राज्यमंत्री म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना मला खूप शिकायला मिळालं. पक्षाने त्यांच्यावर जी जी जबाबदारी टाकली, त्यासंदर्भातले सगळेच निर्णय अतिशय धडाकेबाज पद्धतीने त्यांनी घेतले. त्यांच्याकडे असलेलं मदत आणि पुनर्वसन खातं आणि मराठवाड्यातला दुष्काळ, या काळातील त्यांची काम करण्याची पद्धत, त्यांनी घेतलेले निर्णय हे कधीही विसरता न येणारं आहे. आमच्या मराठवाड्याच्या माणसांनाही कधी विसरता येणार नाहीत, असे निर्णय घेऊन त्यांनी या खात्याच्या माध्यमातून काम करून दाखवलं. त्यामुळे खातं कोणतंही द्या, त्या खात्याला महत्त्व प्राप्त करून देण्याचं काम पतंगरावांनी स्वतःच्या कर्तृत्वाने करून दाखवलं. आणि म्हणून जसं अनेकांनी सांगितलं की, जिव्हाळ्याने, प्रेमाने मार्गदर्शन करणारं हे व्यक्तिमत्त्व होतं. माणुसकी जपणारं, प्रेम देणारं, आपुलकी वाटणारं अशा पद्धतीचं हे व्यक्तिमत्त्व होतं. त्याचीच अनुभूती आमच्यासारख्या तरुण सहकाऱ्यांना त्यांच्याबरोबर राहून आलेली आहे. अधिक बोलण्याचा आज प्रसंग नाही. बऱ्याच मान्यवरांना बोलायचं आहे. परंतु, हे कौटुंबिक नातं टोपे परिवाराचं, कदम परिवाराचं निश्चितपणे कायमस्वरूपी राहील. आज त्यांच्या अकाली जाण्याने खूप मोठी हानी राज्याची आणि त्यांनी जो विस्तार केला शिक्षणक्षेत्राचा, त्या शिक्षणक्षेत्राची, सहकार क्षेत्राची झालेली आहे. मी माझ्या टोपे परिवाराकडून, आमच्या मराठवाड्याच्या जनतेकडून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनसुद्धा त्यांच्याप्रति आदरांजली व्यक्त करतो. शिवाजीराव कदम हेसुद्धा आम्ही शिकत असल्यापासूनचे आमचे जवळचे स्नेही आहेत, शिवाजीराव, मोहनशेठ, विश्वजित या सगळ्यांशी आमचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. प्रेमाच्या या माणसांना या मोठ्या दुःखातून सावरण्याची शक्ती ईश्वराने द्यावी, एवढीच ईश्वरचरणी प्रार्थना करून माझी भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो. ●





# हसरं-बोलतं खेळकर राजकीय नेतृत्व

**सुनील तटकरे**
माजी प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

**मला आठवतंय, ते आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री होते. १९९२ साली मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होत असताना तिकडे सांगलीत मोहनरावदादा कदम सांगली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होण्याचा क्षण होता. पण तरीही ते सांगलीत थांबले नाहीत. ते रायगडला, अलिबागला माझी निवड करण्यासाठी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने त्याठिकाणी उपस्थित राहिले. आणि राजकीय जीवनामध्ये मी आज जो काही उभा आहे, त्यात आदरणीय पवार साहेबांचं योगदान आहेच, पण आयुष्याच्या सुरुवातीच्या राजकारणामध्ये पतंगराव कदम साहेबांनी मला त्या काळात दिलेली संधी माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आणि उपयुक्त ठरली.**

शोकाकुल जनहो, आपल्या सर्वांचे आवडते डॉ. पतंगराव कदम यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आपण सर्वजण याठिकाणी जमलो आहोत. एका खिन्न वातावरणामध्ये आजची संध्याकाळ आपण दुःखी अंतःकरणाने  व्यतीत करीत आहोत. महाराष्ट्राच्या राजकारणातलंच नव्हे, तर समाजकारणातलं, शैक्षणिक क्षेत्रातलं हसतं, बोलतं, चालतं व्यक्तिमत्त्व आज आपल्यामध्ये नाही, याचं शल्य आणि दुःख आपल्याला मोठ्या प्रमाणावर आहे. आदरणीय पतंगराव कदम साहेबांनी अतिशय कष्टातून, मेहनतीतून राजकीय क्षेत्रात तर झेप घेतलीच, पण ज्या क्षेत्रात झेप घेतली, त्या क्षेत्रामध्ये त्यांनी आपलं नाव कर्तबगारीने, वेगळ्या पद्धतीने कोरलं. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी उभं केलेलं काम आपल्या सर्वांच्यासाठी, या महाराष्ट्रासाठी गौरवास्पद आहे. याचा अभिमान आपल्या सर्वांना निश्चित आहे. मला आठवतंय, ते आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री होते. १९९२ साली मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होत असताना तिकडे सांगलीत मोहनरावदादा कदम सांगली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होण्याचा क्षण होता. पण तरीही ते सांगलीत थांबले नाहीत. ते रायगडला, अलिबागला माझी निवड करण्यासाठी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री



या नात्याने त्याठिकाणी उपस्थित राहिले. आणि राजकीय जीवनामध्ये मी आज जो काही उभा आहे, त्यात आदरणीय पवार साहेबांचं योगदान आहेच, पण आयुष्याच्या सुरुवातीच्या राजकारणामध्ये पतंगराव कदम साहेबांनी मला त्या काळात दिलेली संधी माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आणि उपयुक्त ठरली. सहज एखाद्या विषयावर बोलणं, केवळ विनोदानं नाही तर समोरच्या माणसाला माहितीपूर्ण वक्तव्यानं सहजपणे आपल्याकडे खेचून घेणं, कोणत्याही विषयावर बोलताना परखडपणे आपली मतं मांडणं आणि आपण मांडलेली मतं समोरच्यांना पटतील अशा पद्धतीनं त्यांनी कायमच मांडली. मगाशी माझ्या सर्व सहकाऱ्यांनी सांगितलं ते खरं आहे की, कोणालाही त्यांनी एकेरी हाक मारली तरी कोणालाही त्याचे वैषम्य वाटले नाही, तर त्याचा आनंदच झाला. कदाचित त्यांनी 'अहो, जाओ' म्हटलं असतं तर त्यामागे वेगळी भावना आहे, असं वाटलं असतं. आपल्याला एकेरीने हाक मारणं, हा आपला गौरव आहे, अशाच मानसिकतेमध्ये प्रत्येकाने त्यांची ती एकेरी हाक, आपुलकीची, प्रेमाची, सद्भावनेची आणि तशाच पद्धतीने पितृतुल्य नात्याची आहे, असेच मानले.

मला आठवतंय, हिवाळी अधिवेशनामध्ये झालेलं त्यांचं शेवटचं भाषण, त्या भाषणामध्ये सभागृहामध्ये एकंदरीत जे वातावरण तयार झालं होतं, त्यात आपल्या हलक्या-फुलक्या पण योग्य, समर्पक आणि मर्मभेदक शब्दात त्यांनी केलेली त्या विषयाची मांडणी आणि त्या मांडणीतून सबंध सभागृहात निर्माण केलेलं सामंजस्याचं वातावरण ही त्यांची वेगळी खासियत त्या निमित्ताने सगळ्यांनी अनुभवली. महाराष्ट्रातल्या राजकारणातलं हसतं-बोलतं- खेळकर राजकीय नेतृत्व आज आपल्यामध्ये नाही. माझ्या कुटुंबीयांच्या वतीनं, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीनं भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो.

●



# स्नेह जपणारे पतंगराव



**सुधीर गाडगीळ**
प्रसिद्ध निवेदक



मी जवळजवळ ४० वर्षे पतंगरावजींना उत्तमपणे ओळखत होतो. ते ज्ञानप्रबोधिनी समोरच्या विद्याभवनमध्ये ज्या वेळेला आले ते छोट्याशा खोलीत, तेव्हापासून उत्तम स्नेह होता. विशेष म्हणजे दोन वेगवेगळ्या टप्प्यांच्या आठवणी अशा आहेत की, त्या वेळेला आमचीही उमेदवारी सुरू होती. नुकतीच नोकरी सोडलेली होती. अशावेळी येणाऱ्या अडचणींबद्दल जरा जरी कुरकूर करायला लागलो की, ते आपल्या स्वतःच्या आयुष्यातील अवघड टप्प्यांविषयी एकएक अशा आठवणी उलगडत जात असत की, आपल्यासमोरच्या अडचणी फारच क्षुल्लक आहेत, असे वाटून आपला उत्साह जरा वाढत असे. सत्ता, लोकप्रियता, संस्थेचे अधिपतीपद असे सगळे असतानाही संपूर्ण ४० वर्षांत कोणत्याही क्षणी त्यांनी त्याचा जराही अहंभाव त्यांच्या वागण्याबोलण्यातून, देहबोलीतून कणभरही कधी जाणवू दिला नाही. कायम हसतखेळत आणि अत्यंत मित्रत्वाच्या नात्याने ते सगळ्यांशी बोलत असत. दिलेला शब्द पाळण्याबाबतही ते चोख होते. एका छोट्या कार्यक्रमाला मला त्यांचे मुंबईचे पूर्ण वेळापत्रक माहिती होते. ते साडेअकरा पर्यंत व्यस्त होते आणि मी त्यांना साडेबाराच्या कार्यक्रमाला बोलावले होते. मी म्हटले की, तुम्ही काही येऊ शकत नाही, असे दिसते आहे. मात्र, साडेबाराला ते हजर झाले आणि म्हणाले की, बघ मी आलो की नाही. असे शब्द पाळणारे, स्नेह जपणारे आणि सर्वांना बरोबर घेऊन चेष्टा-मस्करी करत आपल्या ज्येष्ठत्वाची किंचितशीही चाहूल न लागू देता ते सगळ्यांमध्ये मिसळत असत, ही त्यांच्यातील मला विशेष गोष्ट वाटते. मी त्यांना आम्हा कलावंतांच्या वतीने मनःपूर्वक आदरांजली वाहतो. ●




# डॉ. पतंगराव कदम म्हणजे चालती-बोलती संस्था!



**जोगेंद्र कवाडे**
ज्येष्ठ नेते, पीपल्स रिपब्लिकन पक्ष

**आमच्या गडचिरोली जिल्ह्यातील दोन तरुण त्यांना मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन हवी होती. ते गेले ॲडमिशन घ्यायला, बिचारे गरीब लोक होते. ते माझ्याकडे आले. तेव्हा मी खासदार होतो. म्हटलं, चला आपण जाऊ पतंगरावांच्याकडे. पतंगरावजींच्या बंगल्यावर आम्ही गेलो आणि त्यांना त्या मुलांची अडचण सांगितली. तेव्हा ते म्हणाले, काहीही काळजी करू नका साहेब. जेवढी फी आहे तेवढीच द्यायची. एक रुपयासुद्धा जास्त द्यायचा नाही. त्यांनी लगेच फोन करून सांगितलं की, प्राध्यापक कवाडे साहेबांचे अमूक विद्यार्थी आहेत, त्यांना लगेच ॲडमिशन द्या. हा मनाचा मोठेपणा त्यांच्याकडे होता. दारिद्र्य काय असतं, ते त्यांना माहीत होतं. गरिबीतून आलेला माणूस मोठा झाला की, गरिबीकडे आणि गरिबांकडे पाठ फिरवतो. परंतु, पतंगरावजींसारखं व्यक्तिमत्त्व गरिबीतून पुढे आलं, पण गरिबांना कधी विसरलं नाही.**

डॉ. पतंगरावजी कदम यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित आजच्या या सर्वपक्षीय सभेमध्ये उपस्थित सर्व अतिथीगण, उपस्थित बंधूंनो, भगिनींनो आणि मित्रांनो. डॉ. पतंगरावजी कदम म्हणजे चालती-बोलती संस्था होती. शिक्षणाचं क्षेत्र असेल, सामाजिक क्षेत्र असेल, सांस्कृतिक क्षेत्र असेल, यामध्ये तर त्यांनी उल्लेखनीय अशा प्रकारचं काम केलेलंच आहे. परंतु, राजकारणामध्ये राहून देखील ज्या पद्धतीने निष्ठेनं राजकारण केलं, तेदेखील एक आदर्श म्हणून आपल्याला सांगता येईल. साहित्यक्षेत्रात पतंगरावजींना कशी रुची होती, त्याचा अनुभव मला आला. सांगलीमध्ये अस्मितादर्श साहित्य संमेलन होतं. त्या साहित्य संमेलनात पतंगरावजी होते आणि उद्घाटक मी होतो. उद्घाटन करत असताना मी उपस्थित साहित्यिकांना संबोधित करताना म्हटलं होतं की, फुले-शाहू-डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार घेऊन चालणारी आमची ही साहित्यिक मंडळी, शिवबांचा





विचार घेऊन चालणारी आमची साहित्यिक मंडळी यांनी लेखन करीत असताना आपल्या अक्षराची दगडफेक आणि शब्दांचा गोळीबार केला पाहिजे. हे वाक्य मी म्हणालो आणि पतंगरावांनी प्रचंड टाळ्या वाजविल्या. माझं भाषण संपल्यानंतर पतंगरावांनी मला विचारलं की, 'प्राध्यापक साहेब, तुम्ही कोणत्या विषयाचे प्राध्यापक आहात?' मी म्हणालो, 'मी कॉमर्स फॅकल्टीचा प्राध्यापक आहे. अतिशय रुक्ष विषयाचा प्राध्यापक आहे.' 'मग एवढं चांगलं मराठी तुम्ही कसे काय बोलता?' म्हटलं, 'हा महाराष्ट्राच्या मातीचा गुण आहे.' असे हे साहित्याच्या क्षेत्रामध्ये देखील अत्यंत प्रभावीपणे काम करणारे व्यक्तिमत्त्व होते. सांस्कृतिक क्षेत्रातही याचा प्रत्यय येतो. एक वृक्ष असेल, त्या एका वृक्षाला अनेक प्रकारच्या फांद्या असतात, मग ती शिक्षणाची फांदी असेल, साहित्याची फांदी असेल, राजकारणाची फांदी असेल. या महाराष्ट्रामध्ये शिक्षणक्षेत्राला बहर आणण्याचे काम डॉ. पतंगरावजींनी केलं. त्यांच्या राजकारणाविषयीचा तसा माझा काही जास्त अनुभव नाहीये. परंतु, जेव्हा जेव्हा राजकारणाचा अनुभव आला, तो चांगलाच होता. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून, हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून पतंगरावजींनी आपल्या शैक्षणिक क्षेत्राची वाटचाल केली. ज्यांना कुठेही ॲडमिशन मिळत नसेल अशा विद्यार्थ्यांना डोनेशन न घेता त्यांनी ॲडमिशन दिल्या. मग ते मेडिकल कॉलेज असेल, डेंटल कॉलेज असेल, बीएड कॉलेज असेल, डीएड कॉलेज असेल. माझा स्वतःचा अनुभव सांगतो. आमच्या गडचिरोली जिल्ह्यातील दोन तरुण त्यांना मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन हवी होती. ते गेले ॲडमिशन घ्यायला, त्यांना कळलं की इतके-इतके पैसे लागतील. बिचारे गरीब लोक होते. ते माझ्याकडे आले. तेव्हा मी खासदार होतो. म्हटलं, चला आपण जाऊ पतंगरावांच्याकडे. पतंगरावजींच्या बंगल्यावर आम्ही गेलो आणि त्यांना त्या मुलांची अडचण सांगितली. तेव्हा ते म्हणाले, काहीही काळजी करू नका साहेब. जेवढी फी आहे तेवढीच द्यायची. एक रुपयासुद्धा जास्त द्यायचा नाही. त्यांनी लगेच फोन करून सांगितलं की, प्राध्यापक कवाडे साहेबांचे अमूक विद्यार्थी आहेत, त्यांना लगेच ॲडमिशन द्या. हा मनाचा मोठेपणा त्यांच्याकडे होता. दारिद्र्य काय असतं, ते त्यांना माहीत होतं.

गरिबीतून आलेला माणूस मोठा झाला की, गरिबीकडे आणि गरिबांकडे पाठ फिरवतो. परंतु, पतंगरावजींसारखं व्यक्तिमत्त्व गरिबीतून पुढे आलं, पण गरिबांना कधी विसरलं नाही. अशा प्रकारचं गरिबांना साथ देणारं व्यक्तिमत्त्व होतं. मित्रांनो, आजच्या या प्रसंगी आमचे गुलाम नबी आझाद फार चांगलं बोलले की, दोस्तों का दोस्त और दुश्मनों का भी दोस्त. हा खरोखरच पतंगरावजींच्या व्यक्तिमत्त्वाचा आकर्षक असा पैलू होता. आपल्याला माहीत आहे की, आमच्या महाराष्ट्रामध्ये मॅग्नेटिक महाराष्ट्र सुरू झालं. पतंगरावांचं व्यक्तिमत्त्व हे मॅग्नेटिक व्यक्तिमत्त्व होतं. चुंबकीय व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्या संपर्कात जो येईल, तो कोणत्याही विचारांचा जरी असला, तरीपण पतंगराव त्यांना आपलेसे केल्याशिवाय राहायचे नाहीत. हे त्यांच्या वागण्याचे कौशल्य होते. आजच्या या प्रसंगी पतंगरावांच्या स्मृतीस माझ्या वतीनं, माझ्या पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीनं, रिपब्लिकन चळवळीच्या वतीनं, तमाम आंबेडकरी जनतेच्या वतीनं, माझ्या परिवाराच्या वतीनं मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. जाताजाता एवढंच म्हणेन की, प्रेरणा देणारी माणसं ज्यांना आपण म्हणतो, ती प्रेरणा देणारी माणसं पतंगरावांसारखी असतात. महाराष्ट्र मोठा होवो, देश मोठा होवो, यासाठी जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाद्वारे कार्यरत राहतात. तीच जिद्द, चिकाटी आणि परिश्रम पतंगरावांनी घेतले, हे मला आवर्जून सांगावंसं वाटतं. पतंगरावजींना श्रद्धांजली अर्पण करताना एवढंच सांगावंसं वाटतं की, पतंगरावजी, उजाले तुम्हारी यादोंके हमारे साथ रहेने दो, न जाने किस गली में जिंदगी की श्याम हो जाए...आमच्या जीवनाची संध्याकाळ कुठेही आणि कशीही झाली, तरी चालणार आहे, पण जो प्रेरणेचा जो दिवा तुम्ही पेटवला, तो आमच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आमच्या मनामध्ये तेवत राहावा, अशी तथागताच्या चरणी प्रार्थना करतो. माझ्यावतीनं पतंगरावजींच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण करतो आणि इथेच थांबतो. धन्यवाद, जयहिंद.

●



# राखेतून झेपावणारा फिनिक्स

**आशिष शेलार**
नेते भाजप



**काँग्रेस पक्षाचा एन्सायक्लोपिडिया, महाराष्ट्राच्या राजकारणाचा कर्तबगार, कर्तृत्ववान आणि तरीही सहज असा वाटणारा नेता असं पतंगरावांचं वर्णन करावं. ज्या प्रश्नाचं उत्तरच एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता म्हणून मला सापडलंच नाही, किंबहुना मनामध्ये कोडंच राहिलं, असं पतंगरावांचं व्यक्तिमत्त्व होतं. अगदी सहजतेनं पतंगराव राजकीय आयुष्यात जगत राहिले. राजकीय आयुष्यात त्यांना कुणीही शत्रू नसणं, याइतकं मोठं आश्चर्य नाही.**



आदरणीय पतंगराव कदम साहेबांना श्रद्धांजली वाहण्याचा दिवस आपल्या आयुष्यात कधी येऊच नये, असं वाटणाऱ्यांपैकी आपण सगळेजण या ठिकाणी एकत्र आले आहोत. पतंगराव कदमांना श्रद्धांजली वाहावी लागेल, असा दिवस म्हणजे दुर्भाग्याचा दिवस आहे, असं मानणारे आपण सगळेजण आहोत. पूर्वीच्या वक्त्यांनी सांगितलं त्याप्रमाणे पतंगराव कदम यांचा परिचय करून द्यायचा तर त्यासाठी शब्दकोश कमी पडेल, अशी स्थिती त्यांचे महाराष्ट्र आणि देशाच्या पातळीवरील कामाचे वर्णन करताना होते आहे. काँग्रेस पक्षाचा एन्सायक्लोपिडिया, महाराष्ट्राच्या राजकारणाचा कर्तबगार, कर्तृत्ववान आणि तरीही सहज असा वाटणारा नेता असं पतंगरावांचं वर्णन करावं, ज्या प्रश्नाचं उत्तरच एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता म्हणून मला सापडलंच नाही, किंबहुना मनामध्ये कोडंच राहिलं, असं पतंगरावांचं व्यक्तिमत्त्व होतं. अगदी सहजतेनं पतंगराव राजकीय आयुष्यात जगत राहिले. राजकीय आयुष्यात त्यांना कुणीही शत्रू नसणं, याइतकं मोठं आश्चर्य नाही. पतंगरावांच्या व्यक्तिमत्त्वात तेच दिसतं. महाराष्ट्रातील मोठी-मोठी खाती सांभाळली, पण कधी चर्चेमध्ये सहजतेने लाईट कॉमेंट केली पण तरीही पुनर्वसन विभाग असो वा अन्य ठिकाणी मूलभूत पथदर्शी निर्णय ज्यांनी घेतले, अशा एकाच माणसात दोन भूमिका कशा असू शकतात, ते पतंगरावांमध्ये आपण पाहतो.

स्वतःचं शिक्षण पूर्ण करण्याकरता हलाखीच्या परिस्थितीत अतिशय परिश्रम केले. जगाचं तसं एक्स्पोजर त्यांना मिळालंच नाही. पण तरीही जगात नाव मिळवावं, अशी स्वतःची एज्युकेशनल इन्स्टिट्यूट हा माणूस कशी काय उभी करू शकतो, हे मनाला पडलेलं कोडं आहे. स्वतः विद्यापीठ चालवलं, स्वतःचं विद्यापीठ उभं केलं, पण तरीही सहजतेनं जे विद्यापीठाच्या कुलपतीला किंवा विद्यापीठ चालविणाऱ्या माणसाला सहज शक्य होत नाही, ते म्हणजे विद्यार्थी चळवळ करणाऱ्या विद्यार्थीनेत्यांशी मैत्री. एका कुलपतीला विद्यार्थीनेत्यांशी मैत्री कशी जमू शकते? हा अजूनही मला पडलेला प्रश्न आहे.

राजकारणात अनेकदा ते विरोधी आमदारांनाही शांत करायचे, चर्चेत मध्येच थांबवायचे, पण कोणी त्यांच्यावर राग धरला नाही, किंवा यात स्वतःचा अपमान समजला नाही कारण विषयाची जाण, ज्येष्ठता आणि उमदं व्यक्तिमत्त्व पतंगरावांचं होतं. आणि म्हणून महाराष्ट्रात दुसरा पतंगराव होणे नाही. किंवा आमच्यासारख्या युवा कार्यकर्त्यांना राजकारणात काय व्हावंसं वाटेल, तर ज्या पद्धतीनं पतंगरावांनी फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून झेप घेत स्वतःचं जग निर्माण करण्याचं कर्तृत्व केलं, तसं पतंगरावांसारखं कर्तृत्व आपलं असावं असं वाटणारं पतंगरावांचं व्यक्तिमत्त्व होतं. त्यांना मी माझ्यातर्फे, भारतीय जनता पक्षातर्फे मनापासून आदरांजली वाहतो. धन्यवाद.





# मोठ्या भावासारखं प्रेम करणारे साहेब


**डॉ. गजानन एकबोटे**
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

**कार्यक्रमाच्या वेळी त्यांनी मेसेज बुकमध्ये लिहिले होते की, 'गरुडभरारी घे.' त्यावर्षीपासून संस्थेची गरूड भरारी सुरू झाली. साहेबांनी मला नेहमीच सांगितलं की, 'मी तुझ्या पाठीशी आहे. काहीही मदत लागली तरी मी तुला मोठ्या भावाप्रमाणे मदत करणार आहे. काळजी करू नको. मदत लागली की माझ्याकडे येत जा.' मला साहेबांचं वैशिष्ट्य असं वाटतं की, ३९ रुपये पगार असून त्या वयामध्ये रयत शिक्षण संस्थेत नोकरी केली साधी आणि आज भारती विद्यापीठाचं किती भव्य स्वरूप आहे. आज मी एका मित्राला विचारलं की, ॲसेटस् काय आहेत भारती विद्यापीठाचे?' तर ३९ रुपये पगार असणाऱ्या माणसाने सुरू केलेल्या संस्थेत पाच लाख विद्यार्थी शिकतात. शिक्षक- शिक्षकेतर असे १५ हजार कर्मचारी एवढा मोठा प्रचंड असा या संस्थेचा व्याप आहे.**

या सभागृहात उपस्थित असलेले सर्व बंधू-भगिनी, आज आपण शिक्षणक्षेत्रातील एक महान व्यक्तिमत्त्व आणि माझ्यावर मोठ्या भावासारखं प्रेम करणारे पतंगराव कदम साहेब, ते आपल्यातून गेले आहेत यावर अजूनही विश्वास बसत नाही. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आपण सगळे जण आज याठिकाणी जमलो आहोत.

१९९४ साली मी पुण्यातल्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा अध्यक्ष झालो. त्या वेळी एका कार्यक्रमानिमित्त साहेबांना मी मॉडर्न महाविद्यालयात बोलवलं होतं. ते कार्यक्रमाला आले आणि म्हणाले, ''अरे, संस्थेवर तुझा कंट्रोल आहे का सांग, पहिले मला.'' मी म्हणालो, 'आहे.' मग म्हणाले, 'ठीक आहे. घाबरू नकोस. तू वयाने लहान आहेस असं तुला वाटत असेल तर सोडून दे विचार. अठराव्या वर्षी मी माझी संस्था चालू केलेली आहे. मोठं स्वप्न पाहिलेलं आहे. दोन-चार वर्षांमध्ये विद्यापीठाचं स्वरूप येईल. तुझ्याकडूनही असं भव्य कार्य घडेल. यामध्ये तुला शासनाकडून जी काही मदत पाहिजे आहे, ती सर्व मी तुला करणार आहे. पण अतिशय सुंदर काम कर, धाडस कर.' त्याच वर्षी त्यांनी मला मॉडर्न महाविद्यालयामध्ये एकाच स्ट्रोकमध्ये सात पीजी कोर्सेस चालवायला परवानगी दिली. मी साहेबांकडे परत गेलो आणि सांगितलं की, 'साहेब, मला लोक वेडं म्हणायला लागले आहेत. सात पीजी कोर्स विनाअनुदान कसे काय चालवणार, म्हणून विचारायला लागले आहेत. शक्य आहे का फायनान्शियली?' ते म्हणाले, 'लोकांना वेडं म्हणू देत. मलाही लोक वेडंच म्हणाले होते. अठरा-एकोणिसाव्या वर्षी दहा बाय दहाच्या खोलीत भारती विद्यापीठ चालू केलं होतं त्या वेळी. लोक वेडं म्हणाले, म्हणजे तू भविष्यात यशस्वी होणार आहेस हे लक्षात ठेव. तुझं हे भविष्य जाणूनच मी तुला परवानगी दिलेली आहे.' साहेबांचे हे उद्गार तंतोतंत खरे ठरले आणि पुढच्याच वर्षी अतिशय चांगला रिस्पॉन्स मिळून आमचे कोर्सेस फार चांगल्या पद्धतीने सुरू झाले.

कार्यक्रमाच्या वेळी त्यांनी मेसेज बुकमध्ये लिहिले होते की, 'गरुडभरारी घे.'






त्यावर्षीपासून संस्थेची गरुड भरारी सुरू झाली. साहेबांनी मला नेहमीच सांगितलं की, 'मी तुझ्या पाठीशी आहे. काहीही मदत लागली तरी मी तुला मोठ्या भावाप्रमाणे मदत करणार आहे. काळजी करू नको. मदत लागली की माझ्याकडे येत जा.' मला साहेबांचं वैशिष्ट्य असं वाटतं की, ३९ रुपये पगार असून त्या वयामध्ये रयत शिक्षण संस्थेत नोकरी केली साधी आणि आज भारती विद्यापीठाचं किती भव्य स्वरूप आहे. आज मी एका मित्राला विचारलं की, 'ॲसेटस् काय आहेत भारती विद्यापीठाचे?' तर ३९ रुपये पगार असणाऱ्या माणसाने सुरू केलेल्या संस्थेत पाच लाख विद्यार्थी शिकतात आणि शिक्षक-शिक्षकेतर असे १५ हजार कर्मचारी एवढा मोठा प्रचंड असा या संस्थेचा व्याप आहे.

खरोखर काय स्वप्न रंगवलं असेल पतंगरावांनी, किती धडपड केली असेल, किती कष्ट केले असतील. मी डॉक्टर आहे म्हणून म्हणतो की, रक्ताच्या प्रत्येक बिंदूमध्ये जसा ब्लडग्रुप लिहिलेला असतो, तसंच अठराव्या वर्षापासून त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत भारती विद्यापीठ असंच लिहिलेलं असेल. त्यामुळे शिक्षणक्षेत्रामध्ये अतिशय उत्तुंग अशी त्यांची कामगिरी झाली. शिक्षणक्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी नेमकं काय रसायन त्यांच्यामध्ये होतं की, ते यशस्वी झाले? तर एक म्हणजे सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांची वृत्ती होती. सहज मी विश्लेषण करत होतो तर त्यांच्या संस्थेमध्ये जोशी होते, करंदीकर होते, पाटील होते, शिंदे होते, खरात होते, शेख होते. असे सर्व समाजाचे विविध घटक त्यांच्याबरोबर काम करत होते. त्यांच्यातील गुणग्राहकतेनुसार चांगल्या माणसाला चांगलं काम देऊन, योग्य माणसाला योग्य ते काम देऊन ही संस्था त्यांनी वाढवली. कोणाला दुखावलं नाही. सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याचं कौशल्य त्यांच्यामध्ये होतं.

त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सर्वांना मदत करणे. त्यांनी मला एक मंत्र सांगितला होता. ते मला नेहमी 'डॉक्टर' म्हणायचे. ते म्हणाले, 'डॉक्टर', जीओ और जीने दो, हा मंत्र कायम लक्षात ठेव. म्हणजे आपण जगायचं आणि दुसऱ्यांनाही जगू द्यायचं. म्हणून दुसऱ्याची संस्था मोठी करायची असेल तर आपण हातभार लावायचे. त्यांचं कधी नुकसान करायचं नाही. त्यांच्या संस्थेवर कधी पाय द्यायचा नाही. त्यांनाही मदत करायची. सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट, हा नियम आहे निसर्गाचा. त्यामुळे ज्याच्यामध्ये खरोखर गुण आहेत, तो पुढे येईल आणि ज्याच्यात गुण नाहीत तो मागे राहील. पण आपण मात्र सर्वांना मदत करायची. अशा पद्धतीचं धोरण तू ठेवलंस तर तुसुद्धा एक यशस्वी संस्थाचालक होशील.'




**"खरोखर काय स्वप्न रंगवलं असेल पतंगरावांनी, किती धडपड केली असेल, किती कष्ट केले असतील. मी डॉक्टर आहे म्हणून म्हणतो की, रक्ताच्या प्रत्येक बिंदूमध्ये जसा ब्लडग्रुप लिहिलेला असतो, तसंच अठराव्या वर्षापासून त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत भारती विद्यापीठ असंच लिहिलेलं असेल. त्यामुळे शिक्षणक्षेत्रामध्ये अतिशय उत्तुंग अशी त्यांची कामगिरी झाली. शिक्षणक्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी नेमकं काय रसायन त्यांच्यामध्ये होतं की, ते यशस्वी झाले तर एक म्हणजे सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांची वृत्ती होती. सहज मी विश्लेषण करत होतो तर त्यांच्या संस्थेमध्ये जोशी होते, करंदीकर होते, पाटील होते, शिंदे होते, खरात होते, शेख होते. असे सर्व समाजाचे विविध घटक त्यांच्याबरोबर काम करत होते. त्यांच्यातील गुणग्राहकतेनुसार चांगल्या माणसाला चांगलं काम देऊन, योग्य माणसाला योग्य ते काम देऊन ही संस्था त्यांनी वाढवली. कोणाला दुखावलं नाही. सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याचं कौशल्य त्यांच्यामध्ये होतं."**

निर्मळ मैत्री हा त्यांचा आणखी एक गुण. अनेक वेळेला घरी येऊन बसायचे, गप्पा मारायचे. राजकारण असेल, शिक्षणक्षेत्र असेल, सगळ्याविषयी मनमोकळेपणाने बोलायचे. कोणतीही भीडभाड न ठेवता समोरासमोर अर्धा-पाऊण तास बोलायचे. मला तर असं वाटायचं की, आणखी दोन-दोन तास त्यांच्याबरोबर चर्चा करावी. असा निर्मळ मैत्रीचा झरा होता. साहेबांविषयी बोलण्यासारखं खूप आहे. दोन तास बोललो तरी ते कमीच होईल. शेवटी एकच सांगतो की, एवढं मोठं त्यांनी काम केलं आहे. भारती विद्यापीठाच्या एका कमिटीवर मी होतो. आमचे मित्र शिवाजीराव त्याठिकाणी विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलचे मेंबर होते, मी होतो. एमडीएसला परवानगी द्यायची होती मेडिकल कॉलेजमध्ये. त्यावर सह्या झाल्या. त्या वेळी म्हटलं की, शंभर टक्के झालंच पाहिजे सुरू. सुरुवातीला रोपटं लहान असतं. हळुहळू वटवृक्षात त्याचं रूपांतर होतं. त्यानंतर पाच दिवसांनी मी मंत्रालयात भेटायला गेलो साहेबांना. त्या वेळी बाहेरील हवालदाराने मला ओळखलं नाही. तेव्हा मी त्याला सांगितलं की, त्यांना चिठ्ठी पाठवून दे की डॉ. गजानन एकबोटे आले आहेत पुण्याहून. नाइलाजाने तो चिठ्ठी घेऊन गेला. तेव्हा ते स्वतः बाहेर आले आणि त्यांनी त्या हवालदाराला खूप झापलं की, तुला कळतं का की हा कोण माणूस आला आहे म्हणून? मला आत बसवलं, चहा वगैरे दिला आणि कॉरीडॉरमध्ये खांद्यावर हात टाकून शालेय आणि उच्चशिक्षण खात्याचा कॅबिनेट मंत्री गप्पा मारत माझ्याबरोबर फिरत होता. सगळेजण, अगदी मंत्रालयातले अधिकारीसुद्धा अचंब्याने पाहायला लागले की, हे कोणाच्या खांद्यावर हात ठेवून बोलतायेत. म्हणजे शिक्षणक्षेत्रामध्ये नवीन काम करणारा एक तरुण माणूस, पण त्यांनी एवढी मैत्री जपली होती. फार दुःख होतं की, आज पतंगराव आपल्यामध्ये नाहीत. शिक्षणक्षेत्रामध्ये मार्गदर्शकाचं अतिशय महत्त्वाचं काम त्यांनी केलेलं आहे. प्रेरणास्रोत राहिलेले आहेत. त्यांना माझ्या कुटुंबीयांतर्फे, आमच्या संस्थेतर्फे मी भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो. धन्यवाद.

●



# संवेदनशील नेता



**मुक्ता टिळक**
महापौर, पुणे

**स्वप्न पाहणं हे खूप सोपं असतं, परंतु ती स्वप्नं प्रत्यक्षात उतरवणं आणि त्याचा ध्यास घेणं हे खूप महत्त्वाचं असतं. मला असं वाटतं की, त्यातही वैशिष्ट्य म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी एखाद्या विद्यापीठाची स्थापना करण्याचं मनात येणं हेसुद्धा खूप मोठ्या धाडसाचं काम आहे. ज्या काळामध्ये अत्यंत कमी संधी उपलब्ध होत्या, त्या काळामध्ये पतंगरावांनी हे काम केलं.**



भारती विद्यापीठाचे कुलपती, त्याचप्रमाणे आमदार, मंत्री अशी अनेक पदे ज्यांनी भूषविली, परंतु सर्वांत महत्त्वाचं म्हणजे एक माणूस म्हणून अत्यंत संवेदनशील असं हे व्यक्तिमत्त्व आपल्या सर्वांच्यातून निघून गेलेलं आहे. स्वप्न पाहणं हे खूप सोपं असतं, परंतु ती स्वप्नं प्रत्यक्षात उतरवणं आणि त्याचा ध्यास घेणं हे खूप महत्त्वाचं असतं. मला असं वाटतं की, त्यातही वैशिष्ट्य म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी एखाद्या विद्यापीठाची स्थापना करण्याचं मनात येणं हेसुद्धा खूप मोठ्या धाडसाचं काम आहे. ज्या काळामध्ये अत्यंत कमी संधी उपलब्ध होत्या, त्या काळामध्ये पतंगरावांनी हे काम केलं.

मला असं वाटतं की, फार थोड्या लोकांकडे अशी दूरदृष्टी असते. ही दूरदृष्टी ठेवून आज लाखो विद्यार्थी त्यांनी तयार केले. माझे सासरे जयंतराव टिळक यांच्यावर त्यांचं विशेष प्रेम होतं. या विद्यापीठाच्या कामामध्ये अनेक वेळा त्यांना जेव्हा नैराश्य यायचं, तेव्हा दादा त्यांना सांगायचे की, तुम्ही लोकांकडे लक्ष देऊ नका. तुमचं काम करीत राहा. हा कानमंत्र त्यांनी फक्त ऐकला नाही, तर त्यांनी तो उराशी बाळगला. त्याच्यातूनच या लाखो विद्यार्थ्यांचे संचित त्यांच्यापाशी जमा झाले. हे संचित बरोबर घेऊनच ते आपल्या सर्वांच्यामधून निघून गेले. परंतु हे करीत असताना आपल्या शहराचा मानबिंदू असे ज्याला म्हणता येईल ते, विद्यापीठ आपल्यासाठी सोडून ते निघून गेलेले आहेत. एक शिक्षकापासून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास खरोखरच अविस्मरणीय आणि थक्क करून सोडणारा आहे.

मी सर्व पुणेकर बांधवांच्या वतीने याठिकाणी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते.



# गुरुबंधू



**डॉ. इंद्रजीत यशवंतराव मोहिते**
उपाध्यक्ष, भारती विद्यापीठ

**आम्हाला पतंगराव कदम सतत सांगत की, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, शंकरराव मोरे, बाळासाहेब भारदे, विठ्ठलराव गाडगीळ, नरूभाऊ लिमये, मोहन धारिया आणि आमच्या वडिलांच्या पायाशी बसून त्यांना धडे मिळाले. शिक्षण मिळाले. समतावाद, समाजवाद, श्रमप्रतिष्ठा, धर्मनिरपेक्ष जातविरहित राजकारण, महिलांचे सबलीकरण, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि त्यासोबत छत्रपती शिवाजी महाराजांनी, शाहू महाराजांनी, महात्मा जोतिबा फुलेंनी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सगळ्या विचारांचा मेळ घालून या माणसाने काळानुरूप आपल्या वागणुकीमध्ये परिवर्तन करून यश प्राप्त केले. त्यांच्यामध्ये एक गुण होता की, नियुक्त केलेला माणूस, त्याच्या गुणासाठी ते नियुक्त करायचे आणि त्याला योग्य ते काम देऊन त्याला योग्य ती दिशा दाखवायचे. त्यातून त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आम्हाला सगळ्यांना परिचित झाली.**

नमस्कार, व्यासपीठ. 'गुरू गोविंद दौ खडे, काके लागू पाए, बलिहारी गुरू आपने, जिन गोविंद देव बताये.' माझे गुरुबंधू पतंगराव कदम. आमच्या गुरूंच्या आश्रमामधून पूर्वेकडे बघितलं तर मच्छिंद्रनाथाच्या आणि चौरोबाच्या डोंगराच्या कुशीमध्ये सोनसळ गाव. पूर्वेकडून सूर्य उगवतो आणि त्याचे आशीर्वाद आपल्या सगळ्यांवर पडतात. त्या गावामध्ये ८ जानेवारी १९४४ रोजी साहेबांचा जन्म झाला. परिसरातील सगळ्या इसमांचे ते कैवारी. बालकांचे शिक्षक, तरुणाईचे आशा आणि स्फूर्ती केंद्र, गृहस्थाश्रमामध्ये रमलेल्या माणसाचा विश्वस्त, वयस्कर लोकांचा आधार, दीन-दलित गोरगरिबांचा आधार, असंख्य लोकांचा अन्नदाता आणि पोषणकर्ता. एक स्वच्छ-निर्मळ मनाचा आणि मोठ्या काळजाचा अजातशत्रू. मोठा-छोटा, श्रीमंत-गरीब कसलाही फरक न करता जो जो त्यांच्या सान्निध्यात आला, त्या प्रत्येकासाठी त्यांचे प्रेम उतू जाण्यासारखी परिस्थिती. इतकं अफाट प्रेम करणारा, आमचे गुरुबंधू पतंगराव कदम. त्यांच्या प्रत्येक कार्यामध्ये सेवा होती आणि त्यांच्या प्रत्येक विचारात एक प्रार्थना. असं निष्काम कर्म आणि चिरंतन पूजा मनाशी बाळगून समाजसेवेमध्ये उतरलेले पतंगराव कदम. आमचे वडील त्यांचे गुरू. ते आम्हाला नेहमी सांगत की, पोटातल्या भुकेसारखा आणि दारिद्र्यासारखा दुसरा गुरू नसतो. ती भूक आणि ते दारिद्र्य भोगून, त्याच्यावर कठोर परिश्रम करून मात करण्याची क्षमता असलेला हा आमच्या वडिलांच्या असंख्य विद्यार्थ्यांपैकी अव्वल नंबरचा विद्यार्थी, पतंगराव कदम.

भारती विद्यापीठ त्यांनी स्थापन केले, हे तर आपल्या सर्वांना ज्ञात आहे. होय, एका छोट्या खोलीत चालू झाले, मोठी महत्त्वाकांक्षा होती, विद्यापीठ नाव दिलं, विश्वविद्यालय होईल हे स्वप्न रंगवलं, लोक हसले. परंतु, दृढ निश्चय केलेला माणूस कष्टाला, श्रमाला, प्रतिष्ठेला कशालाही भीक न घालता आपल्या ध्येयप्राप्तीसाठी जी वाटचाल करतो, ती वाटचाल करण्याची धमक आणि क्षमता असलेला माणूस काय घडवू शकतो आणि असंख्य लोकांचं, चार लाखांहून अधिक विद्यार्थी, दहा हजारांहून अधिक सेवक आणि कर्मचारी ह्या सगळ्यांचे प्रपंच थाटण्याची सुविधा






निर्माण करून देणारा, परमेश्वरस्वरूपी हा आपल्यातला एक सामान्य, कष्टकरी, श्रमिक घरात जन्म झालेला मोठ्या मनाचा इसम होता. हे सगळ्यांना ज्ञात आहे की, भारती विद्यापीठाची त्यांनी स्थापना केली, पण आपल्याला कल्पना आहे का की, इतर शैक्षणिक संस्थांनाही त्यांनी किती मनमोकळेपणाने आणि खुल्या दिलाने मदत केली. माझ्यापूर्वी आदरांजली वाहिलेल्यांनी पुण्यापुरत्या सीमित असलेल्या त्यांच्या अनेक उदाहरणांचा उल्लेख केला. परंतु, त्यांच्याबरोबर एसटी बोर्ड मेंबर असणारे रामभाऊ मेघे, बाबुराव हिवशे, शशीकुमार देशमुख हे जेव्हा त्यांच्याकडे आले, त्या वेळी मीदेखील तेथे होतो. कारण पर्णकुटीमध्ये आमच्या वडिलांच्या सान्निध्यातच ती चर्चा झाली होती. पतंगरावांनी त्या तीनही मित्रांना आखणीपासून, नोंदणीपासून अगदी उभारणीपर्यंत मदत करून विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावतीमध्ये निर्माण करून दिली. ती संस्था अजूनही, आजतागायत भारती विद्यापीठाशी संलग्न विचारसरणी राखून त्या भागामध्ये कार्यान्वित आहे. पेणची शिक्षणसंस्था, शिरवळची शिक्षणसंस्था, अगदी आमच्या रेठरे बुद्रुकमध्ये मी एक छोटीशी संस्था काढली तिलाही कायमस्वरूपी आशीर्वाद देऊन मार्गदर्शन करणारे आमचे साहेब.

प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली की, ज्याच्यामध्ये क्षमता असते त्याने जबाबदारी घ्यायची असते. ती जबाबदारी बहुजन समाजाची परिस्थिती बघून साहेबांनी स्वतःच्या शिरावर घेतली. त्यांना पहिली संधी आमच्या वडिलांनी दिली. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची स्थापना झाली होती आणि राज्याच्या वतीने हे महामंडळ चालावं आणि ते दुर्गम भागापर्यंत पोहोचावं, ही त्यांची कल्पना प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी त्यांनी जे पाच, सात, दहा जण नियुक्त केले, त्यात साहेबांचा नंबर होता. मी आपल्याला मोठ्या अभिमानाने सांगू शकतो की, महाराष्ट्रभर प्रवास करून जिथे 'गाव तिथे रस्ता', आणि 'जिथे रस्ता तिथे एसटी' हे भाऊंचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अहोरात्र कष्ट करून पतंगराव कदम साहेबांनी ती एसटी बोर्ड मेंबरच्या पदाची जबाबदारी इतकी उत्कृष्ट पार पाडली, इतक्या कार्यदक्षतेने पार पाडली की, तिथून पुढच्या काळात ते राजकारणात आणि समाजकारणात उतरण्यास समर्थ झाले. बारा वर्षांसाठी पुणे विद्यापीठाच्या सिनेटवर आणि एक्झिक्युटिवर, मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर, शिवाजी विद्यापीठाचे चान्सलर नॉमिनी म्हणून त्यांनी काम केले. महाराष्ट्र स्टेट कंझ्युमर फेडरेशनमध्ये ते डायरेक्टर होते आणि तिथल्या कामाच्या आधारावर नॅशनल कंझ्युमर फेडरेशनवर गेले.

आमच्या वडिलांनी कापूस एकाधिकाराची योजना मांडली

> प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली की, ज्याच्यामध्ये क्षमता असते त्याने जबाबदारी घ्यायची असते. ती जबाबदारी बहुजन समाजाची परिस्थिती बघून साहेबांनी स्वत:च्या शिरावर घेतली. त्यांना पहिली संधी आमच्या वडिलांनी दिली. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची स्थापना झाली होती आणि राज्याच्या वतीने हे महामंडळ चालावं आणि ते दुर्गम भागापर्यंत पोहोचावं, ही त्यांची कल्पना प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी त्यांनी जे पाच, सात, दहा जण नियुक्त केले, त्यात साहेबांचा नंबर होता. मी आपल्याला मोठ्या अभिमानाने सांगू शकतो की, महाराष्ट्रभर प्रवास करून जिथे 'गाव तिथे रस्ता', आणि 'जिथे रस्ता तिथे एसटी' हे भाऊंचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अहोरात्र कष्ट करून पतंगराव कदम साहेबांनी ती एसटी बोर्ड मेंबरच्या पदाची जबाबदारी इतकी उत्कृष्ट पार पाडली,



होती. कापूस उत्पादक शेतकऱ्याची पिळवणूक थांबविण्याच्या दृष्टिकोनातून. जसं साखरेला उसापासून ते साखरेपर्यंत नेण्याचा उद्योग शेतकऱ्याला सुपूर्त केला होता, तसंच कापसापासून वस्त्रोद्योगापर्यंत तो उद्योगही शेतकऱ्याच्या मालकीचा व्हावा, ही संकल्पना होती. त्याचा पहिला टप्पा एकाधिकार कापूस खरेदी योजना होती. ती खरेदी करण्यासाठी पतंगरावांवर विश्वास टाकून त्यांनी त्यांना महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनवर नियुक्त केलं. आजतागायत ती एकाधिकार खरेदी योजना जी चालू आहे, ती पतंगरावांनी केलेल्या कष्टाच्या दिमतीवर.

रयत शिक्षण संस्थेशी तर त्यांची नाळ जोडली होती. तिथे एक्झिक्युटिव कमिटी, मॅनेजिंग कौन्सिल मेंबर अशी पदं भूषवली. एक ऋण होतं त्यांच्या मनात की, या संस्थेच्या माध्यमातून आपण शिकलोसवरलो, या संस्थेत आपण नोकरी केली. आपली परतफेड करण्याची क्षमता निर्माण झाल्यानंतर आपलं सर्वस्व आपण त्या संस्थेला अर्पण केलं पाहिजे. शेवटच्या क्षणापर्यंत ते करत होते. त्यावरून मला आठवलं. शरद पवार साहेबांनी २००६ साली- मी तेव्हा कृष्णा सहकारी साखर कारखान्याचा चेअरमन नुकताच झालो होतो. आमच्या वडिलांच्या जागेवर वसंतरावदादा शुगर इन्स्टिट्यूटवर विश्वस्त म्हणून मला घेण्याचा निर्णय घेतला. मला अतिशय आनंद वाटला. परंतु, थोरल्या भावाला विचारल्याशिवाय आपण कसं करायचं, म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या मिटिंगनंतर सातारला मी गेलो होतो. तिथे साहेबांच्या गाडीत बसूनच मी त्यांना सांगितलं की, पवार साहेबांनी असं असं सांगितलं आहे. म्हणाले, 'अरे वेडा आहेस की काय? अरे लोक जन्मभर वाट बघतात त्यांच्याबरोबर काम करण्यासाठी. तुला ती संधी चालून आली आहे, ती नाकारू नकोस. त्या माणसाकडून शिकण्यासारख्या असंख्य गोष्टी आहेत. अन् चव्हाण साहेबांच्या मागे महाराष्ट्राच्या वतीने देशपातळीवर नेतृत्व करण्याची क्षमता जर कोणाकडे असेल तर ती पवार साहेबांमध्ये आहे.' पक्ष, गट, तट मनातून बाजूला ठेवून आपल्याकडे विचारपूस करणाऱ्या माणसाला योग्य ती दिशा दाखवून त्याच्या कर्तृत्वाला वाव मिळावा, हे मनाचे मोठेपण साहेबांनी दाखविले.

स्वामी विवेकानंद संस्थेचे आजीव सदस्य, कर्वे इन्स्टिट्यूटच्या सोशल सायन्सेसचे गव्हर्निंग कौन्सिल मेंबर, ही सगळी पदे त्यांनी भूषविली. आज मी उल्लेख केलाच पाहिजे. कारण मी सुरुवातीला म्हणालो की आमचा गुरु-आश्रम होता. भाऊंचं घर हे गुरु-आश्रम. तिथे केवळ पतंगराव आलेले नव्हते, परंतु काकीसाहेब विजयमाला कदमसुद्धा यायच्या. अन् ज्या पद्धतीने भाऊंनी पतंगरावांना दीक्षा दिली, त्याच पद्धतीने आमच्या आईंनी वहिनीसाहेबांना मार्गदर्शन केलं. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते, ही म्हण त्यांनी सिद्ध करून दाखविली. काकीसाहेब नसत्या तर साहेबांना इतकी मोकळीक, इतका मोकळा वेळ मिळाला नसता. सहकारी चळवळीत शिरायचं असेल तर गरीब जनतेला दुसरा पर्याय नाही. सांगली जिल्ह्यामध्ये सोनहिरा साखर कारखाना, सूत गिरण्या, पोल्ट्रीज्, डेअरीज्, भारती बँक, भारती बझार असंख्य रोजगार निर्मितीच्या योजना त्यांनी प्रत्यक्षात आणल्या. ३५ वर्षे आमदार, त्यातील

२५ ते २६ वर्षे मंत्री. शिक्षणमंत्री असताना दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना चांगलं दर्जेदार शिक्षण मिळालं पाहिजे, म्हणून एकशिक्षकी शाळांचे रूपांतर त्यांनी दोन शिक्षक शाळांमध्ये केले. विद्यार्थ्यांच्या पोषणाचीसुद्धा व्यवस्था केली. उद्योगमंत्री असताना महाराष्ट्रात जेवढी परकीय गुंतवणूक झाली, तेवढी इतर राज्यांत झाली नाही. कृषी-औद्योगिक समाजरचनेच्या आधारावर सात ॲग्रो बेस्ड इंडस्ट्रीयल पार्क सुरू केले. आयटी पार्क चालू केले. पुनर्वसन मंत्री असताना पूरग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी गुडघ्यापर्यंत चिखलातून चालत गेलेले साहेब मी स्वतः बघितले आहेत. दुष्काळ पडला तेव्हा छावण्या सुरू केल्या. त्या छावणीच्या शब्दरचनेमध्ये होतं 'गाई-गुरांसाठी'. त्यांच्याकडे तेव्हा धनगर समाजाचे लोक आले आणि म्हणाले, 'मेंढ्यांसाठी आणि शेळ्यांसाठी काय?' चुटकी वाजवल्यासारखा निर्णय झाला आणि शेळ्या-मेंढ्यांसाठी देखील छावण्या उघडल्या गेल्या. सहकार, महसूल, वन या सगळ्या विभागांचे अगदी उत्तुंग काम त्यांनी केले. जणू काही त्यांच्यामध्ये ती कला होती की, जिथे लाथ मारीन, तिथे पाणी काढीन.

आम्हाला पतंगराव कदम सतत सांगत की, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, शंकरराव मोरे, बाळासाहेब भारदे, विठ्ठलराव गाडगीळ, नरूभाऊ लिमये, मोहन धारिया आणि आमच्या वडिलांच्या पायाशी बसून त्यांना धडे मिळाले. शिक्षण मिळाले. समतावाद, समाजवाद, श्रमप्रतिष्ठा, धर्मनिरपेक्ष जातविरहित राजकारण, महिलांचे सबलीकरण, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि त्यासोबत छत्रपती शिवाजी महाराजांनी, शाहू महाराजांनी, महात्मा जोतिबा फुलेंनी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सगळ्या विचारांचा मेळ घालून या माणसाने काळानुरूप आपल्या वागणुकीमध्ये परिवर्तन करून यश प्राप्त केले. त्यांच्यामध्ये एक गुण होता की, नियुक्त केलेला माणूस, त्याच्या गुणासाठी ते नियुक्त करायचे आणि त्याला योग्य ते काम देऊन त्याला योग्य ती दिशा दाखवायचे. त्यातून त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आम्हाला सगळ्यांना परिचित झाली. त्यांच्याकडे एक दृढनिश्चय होता, एक आत्मविश्वास होता. महत्त्वाकांक्षा होती, साधने होती, यंत्रणा होती पण दुर्दैवाने त्यांच्याकडे वेळ नव्हता.

अब्राहम लिंकन एकदा म्हणाले होते की, कोणताही माणूस विपरीत परिस्थितीला सामोरे जाऊ शकतो. एखाद्या माणसाचे चारित्र्य तपासायचे असेल तर त्याला सत्ता आणि संपत्ती द्या. पतंगराव कदमांनी चारित्र्यसंपन्न असल्याचा पुरावा तिथेच दिला. सत्ता आणि संपत्ती दोन्हीही प्राप्त झाल्यानंतरसुद्धा कष्टकरी, श्रमिक आणि सामान्य माणसांमध्ये राहून मातीचा मान, मातीची जाण राखून त्यांनी स्वतःचे आयुष्य व्यतीत केले. बरेच लोक त्यांना मंत्री म्हणून ओळखतात, आमदार म्हणून ओळखतात, काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आणि नेते म्हणून ओळखतात. शिक्षणमहर्षी, सहकारमहर्षी, कृषिमहर्षी, समाज परिवर्तनाचे द्योतक असं त्यांना म्हणतात. माझ्या दृष्टिकोनातून दोन गोष्टी, महाराष्ट्राच्या प्रत्येक कर्तृत्ववान माणसाच्या शरीरातून निघणारी शुभ्र पांढरी ज्योत जी आहे, ती सप्तरंगी प्रकृतीमध्ये निर्माण करून सुपूर्त करण्याचे ते एक लोलक पतंगराव कदम होते. ते एक नैसर्गिक ताकद होते. ते ऊर्जा होते. आजसुद्धा गुरुआश्रमावर मच्छिंद्रनाथाच्या आणि चौरोबाच्यामध्ये सोनसळ गावावरनंच सूर्य उगवतो. पण परमेश्वरच जाणे की, साहेब गेल्यानंतर सूर्याची ज्योतसुद्धा मला मंदावल्यासारखी वाटते. कुटुंबीयांबरोबर तर आम्ही कायमस्वरूपी राहणार. पण या श्रद्धांजली सभेच्या निमित्ताने इथे उपस्थित असलेल्या आपल्या सगळ्या जणांना विनंती करणार आहोत की, माणसाला अमरत्व द्यायचे असते ते त्याच्या कार्याच्या, त्याच्या विचाराच्या, त्याच्या कर्तृत्वाच्या पाठपुराव्याने द्यायचे असते. शरीररूपी साहेब जरी आज आपल्या बरोबर नसले अन् आमचा दीपस्तंभ जरी हरवला असला तरी त्यांचे विचार, त्यांचे आचार, अन् त्यांचे चारित्र्य हे मनामध्ये कायम ठेवून आपण सर्वांनी इथून पुढे रचनात्मक कामाने गोरगरिबांना आणि दीनदलितांना दिलासा दिला पाहिजे. महाराष्ट्राला प्रबळ बनवले पाहिजे आणि समाजाला सुदृढ. नमस्कार. ●



**"अब्राहम लिंकन एकदा म्हणाले होते की, कोणताही माणूस विपरीत परिस्थितीला सामोरे जाऊ शकतो. एखाद्या माणसाचे चारित्र्य तपासायचे असेल तर त्याला सत्ता आणि संपत्ती द्या. पतंगराव कदमांनी चारित्र्यसंपन्न असल्याचा पुरावा तिथेच दिला. सत्ता आणि संपत्ती दोन्हीही प्राप्त झाल्यानंतरसुद्धा कष्टकरी, श्रमिक आणि सामान्य माणसांमध्ये राहून मातीचा मान, मातीची जाण राखून त्यांनी स्वतःचे आयुष्य व्यतीत केले."**



# रयतचे 'भीष्माचार्य'



**डॉ. अनिल पाटील**
चेअरमन, रयत शिक्षण संस्था

कदम साहेबांवर प्रेम करणारे आपण सर्व. चार मार्च. पवार साहेबांबरोबर पुण्याला मिटिंग होती. मिटिंग संपवून सातारला परत जात असतानाच पवार साहेबांचा फोन आला की, 'अनिल, कुठे आहेस? आताच विश्वजितचा फोन आला की, साहेब सपोर्ट सिस्टीमवर आहेत.' एक डॉक्टर-मेडिकल क्षेत्रातला माणूस ज्याला सपोर्ट सिस्टीम या शब्दाचा अर्थ त्याच क्षणाला कळला आणि काळजाचा ठोका चुकला म्हटलं तरी चालेल. दुसऱ्या दिवशी लीलावतीमध्ये गेलो. विश्वजित होते बरोबर. नियती किती क्रूर होते, याचा एक अनुभव तिथे घेतला. सर्वकाही करता येण्यासारखं होतं, पण काहीच करू शकत नव्हतो. मग पतंगरावांची रयत शिक्षण संस्थेबरोबरची ६० वर्षांची वाटचाल मनामध्ये तरळून गेली. १९५८ला किर्लोस्करांचं गोल्डन ज्युबिली वर्ष होतं की, ज्या किर्लोस्करांच्यासाठी कर्मवीर अण्णांनी १९१५ ते १९२२ अशी सात वर्षे मार्केटिंग केले. त्याच्या गोल्डन ज्युबिलीच्या कार्यक्रमात अण्णांनी एक भाषण केलं. ते भाषण ऐकायला कदम साहेब रामानंद नगर, किर्लोस्करवाडीला आले होते. कुठंतरी त्यांच्या मनात शिक्षणाविषयी आस्था निर्माण झाली आणि पुढे भारती विद्यापीठ निर्माण झाले, ते अण्णांच्या त्या भाषणातून निर्माण झाले, असं म्हटलं तरी चालेल. त्यातूनच १९६० साली कदम साहेब शिवाजी कॉलेजमध्ये आले. लेबर स्कीममध्ये शिकले. पहिल्या दिवसापासूनच नेतृत्व गुण दिसत होते. पहिल्या वर्षीच निवडणूक लढवून सीआर झाले. डी.एड. करायचं ठरवलं. पी.जी. पाटील, ए.ए. पाटील यांची चिठ्ठी घेऊन पुण्याला वाडियामध्ये टीचर्स डिप्लोमा केला. पुढे काय करायचं, तर रयतचं नाव आठवलं. हडपसरला आले. सुभेदार सर तिथे मुख्याध्यापक होते. राहणार कुठं, इथे राहायला जागा मिळाली. रा.सु. पाटलांनी सही केली, ७० रुपये पगाराची रयत शिक्षण संस्थेची अर्धवेळ नोकरी त्यांनी स्वीकारली. त्यांनी नुसती नोकरी स्वीकारली नव्हती, तर रयत शिक्षण संस्थेच्या सहा शाखा त्यांनी उभ्या केल्या, असं म्हटलं तरी चालेल. पिंपरी, मांजरी, गरोडे, वडगांव धायरी आणि मुंबईतील हायस्कूल.


त्यांनी एवढं प्रचंड काम केलं की, त्याच काळात पतंगरावांना रयतमध्ये 'आमदार' म्हटलं जायचं. एखाद्या आमदाराकडे जी एनर्जी असते, ती एनर्जी त्यांच्याकडे होती. ट्रकमधून प्रवास करून, हातावर भाकरी घेऊन त्यांनी या शाखा उभ्या केल्या. किंबहुना

**मला तर ४० वर्षे त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. ४० वर्षांमधल्या शेकडो आठवणी आहेत. सगळ्यात चांगलं आणि सगळ्यात मोठं म्हणजे आयुष्यात सुरुवातीच्या काळात त्यांना ज्यांनी मदत केली, जी अकरा माणसं ज्यांनी अकरा रुपये देऊन त्यांच्याबरोबर भारती विद्यापीठाची स्थापना केली, त्यातील सात रयतचे होते. रयतच्या या प्रत्येक माणसाला ते कधी विसरले नाहीत. कधी सातारला आले तर रा.सु. पाटलांना दिसत नाही, ते आजारी आहेत असं कळल्यावर लगेच घरी जाऊन त्यांना भेटायचे. सूर्यवंशींच्या घरी जाऊन विचारपूस करायचे. आप्पासाहेबांच्या घरी यायचे. सातारला आले आणि आमच्या घरी आले नाहीत, असं कधीच झालेलं नाही. रयतच्या या वाटचालीत जागतिकीकरणाची खरी ओळख कोणी करून दिली असेल, तर ती कदम साहेबांनी. शिक्षणाच्या जागतिक स्वरूपाचं दर्शन त्यांनी करून दिलं.**







दोन शाखांचे प्रभारी मुख्याध्यापकपदही त्यांनी सांभाळले होते. १९६४ ला भारती विद्यापीठ सुरू झाले, त्याचीही गोष्ट वेगळी आहे. त्यांनी सांगितलं मला की, 'अनिल, ६२-६३ च्या दरम्यान बाळासाहेब देसाईंचं एनडीएमध्ये भाषण होतं. त्या वेळी देसाई म्हणाले होते की, महाराष्ट्रात एनडीए आहे, पण एनडीएत महाराष्ट्र कुठे आहे?' मग त्यांनी विचार केला की, महाराष्ट्राची मुलं एनडीएत का येऊ शकत नाहीत, कारण गणित आणि इंग्रजीत ते मागं पडतात. त्या काळात हे दोन विषय सोडून अकरावी मॅट्रिक करायला परवानगी होती. म्हणून रयतमधून पहिली मदत पतंगरावांना कोणी केली असेल तर ती काळे साहेबांनी केली. नगर जिल्ह्यातल्या रयतच्या सगळ्या शाखा त्यांनी गणिताच्या या परीक्षेसाठी दिल्या. त्यांना दुसरी मदतही रयतनेच केली. सगळ्या शाळांमधून इंग्रजीच्या परीक्षा सुरू झाल्या. माझ्या वडिलांची आणि त्यांची अतिशय  घनिष्ठ दोस्ती, असं म्हटलं तरी चालेल. त्यांना ते थोरले भाऊ म्हणत असत. १९५८ ते २०१८ असा साठ वर्षांचा कदम साहेबांचा आणि रयतचा परिचय.



१९७८ साली ते मॅनेजिंग कौन्सिलमध्ये आले आणि मॅनेजिंग कौन्सिलला त्यांनी एक वेगळी दिशा दिली. ४० वर्षं रयत शिक्षण संस्थेबरोबर काम केलं. भारतीवर त्यांनी जेवढं प्रेम केलं, त्याच्यापेक्षा कैकपटींनी जास्त प्रेम त्यांनी रयतवर केलं. रयतच्या सहा कॉलेजेसचे सीडीसीचे ते चेअरमन होते. भारतीच्या एकाही कॉलेजमध्ये नव्हते, पण त्यांनी रयतच्या एकाही कॉलेजची मिटिंग कधी चुकवली नाही. कधी ईसीची मिटिंग चुकवली नाही. रयत शिक्षण संस्थेच्या खूप शाखांमध्ये त्यांचे योगदान होते. हडपसर, शिरवळचं कॉलेज, रामानंदनगरचे कॉलेज, कऱ्हाडचे कॉलेज, विटा कॉलेज या सगळ्यांना मदतीचा मोठा हात कोणाचा असेल, तर तो कदम साहेबांचा आहे. मला तर ४० वर्षे त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. ४० वर्षांमधल्या शेकडो आठवणी आहेत. सगळ्यात चांगलं आणि सगळ्यात मोठं म्हणजे आयुष्यात सुरुवातीच्या काळात त्यांना ज्यांनी मदत केली, जी अकरा माणसं ज्यांनी अकरा रुपये घेऊन त्यांच्याबरोबर भारती विद्यापीठाची स्थापना केली, त्यातील सात रयतचे होते. रयतच्या या प्रत्येक माणसाला ते कधी विसरले नाहीत. कधी सातारला आले तर रा.सु. पाटलांना दिसत नाही, ते आजारी आहेत असं कळल्यावर लगेच घरी जाऊन त्यांना भेटायचे. सूर्यवंशींच्या घरी



> अण्णांकडे येणाऱ्या सगळ्याच कार्यकर्त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला, पण ग्रामीण भागातील मुलांना व्यावसायिक शिक्षण देण्याचं पहिलं मोठं काम कोणी केलं असेल तर ते आमच्या कदम साहेबांनी केलं. आमच्या अनेक बैठका व्हायच्या, सभा व्हायच्या. त्याच्यात एकीकडे कदम साहेब फी माफीवर सह्या करायचे. अशी अनेक कामे ते एका वेळेला करायचे. असे हे आमचे कदम साहेब. काल २४ तारीख होती. आमच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीची बैठक होती. या वेळी पहिल्यांदाच सोफ्यावर माझ्या शेजारी बसणारे कदम साहेब मला दिसले नाहीत. ते आले की, बसायचे, पाठीवर थाप मारायचे आणि म्हणायचे, 'सुरू कर मिटिंग.' तो आवाज आम्हाला परत कधी ऐकायला मिळणार नाही. रयतचा बापमाणूस गेला. रयतचा एक भीष्माचार्य गेला. तुमची पोकळी ही अशीच जाणवणार आहे.

जाऊन विचारपूस करायचे. आप्पासाहेबांच्या घरी यायचे. सातारला आले आणि आमच्या घरी आले नाहीत, असं कधीच झालेलं नाही. रयतच्या या वाटचालीत जागतिकीकरणाची खरी ओळख कोणी करून दिली असेल, तर ती कदम साहेबांनी. शिक्षणाच्या जागतिक स्वरूपाचं दर्शन त्यांनी करून दिलं.

अण्णांकडे येणाऱ्या सगळ्याच कार्यकर्त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला, पण ग्रामीण भागातील मुलांना व्यावसायिक शिक्षण देण्याचं पहिलं मोठं काम कोणी केलं असेल तर ते आमच्या कदम साहेबांनी केलं. आमच्या अनेक बैठका व्हायच्या, सभा व्हायच्या. त्याच्यात एकीकडे कदम साहेब फी माफीवर सह्या करायचे. अशी अनेक कामे ते एका वेळेला करायचे. असे हे आमचे कदम साहेब. काल २४ तारीख होती. आमच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीची बैठक होती. या वेळी पहिल्यांदाच सोफ्यावर माझ्या शेजारी बसणारे कदम साहेब मला दिसले नाहीत. ते आले की, बसायचे, पाठीवर थाप मारायचे आणि म्हणायचे, 'सुरू कर मिटिंग.' तो आवाज आम्हाला परत कधी ऐकायला मिळणार नाही. रयतचा बापमाणूस गेला. रयतचा एक भीष्माचार्य गेला. तुमची पोकळी ही अशीच जाणवणार आहे. रयत शिक्षण संस्थेच्या वतीने, कर्मवीरांच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

●





# उदार अंतःकरणाचा नेता

**रमेश बागवे**
अध्यक्ष, पुणे शहर काँग्रेस

**पहिल्यांदा मंत्री होऊन अधिवेशनामध्ये मी जेव्हा उत्तर द्यायला उभा राहिलो, त्या वेळेला त्यांनी मला एक सूचना केली होती मोठ्या भावाप्रमाणे की, विरोधकांनी कितीही प्रश्न विचारले, ते कितीही मोठ्याने बोलले तरी त्यांच्याकडे न बघता डायसकडे बघायचं, अध्यक्षांकडे बघून उत्तर द्यायचं. अशा तऱ्हेनं अनेक बारीक-सारीक पण महत्त्वाच्या गोष्टी या सातत्याने ते आमच्यासारख्या नवीन आमदारांना ते सांगायचे.**

आदरणीय पतंगराव कदमांचा इतिहास, त्यांचं उत्तुंग कार्य, त्यांनी केलेला त्याग, पक्षासाठी, समाजासाठी दिलेले योगदान माझ्यासारख्या कार्यकर्त्याने सांगायचं म्हणजे सूर्याला एका लहान दिव्याने ओवाळल्यासारखं होणार आहे. इतकं मोठं उत्तुंग कार्य आदरणीय, वंदनीय डॉ. पतंगराव कदम साहेबांनी केलेलं आहे. १९८५ साली मी जेव्हा पहिल्यांदा नगरसेवक झालो, आमच्या समाजाचे नेते, उपमहापौर कै. शंकरराव म्हात्रे यांनी मला पतंगराव साहेबांकडे नेलं त्या वेळी मी पाहिलं की, माझ्यासमोर एक सदाहसतमुख असणारी व्यक्ती होती. सामान्य कार्यकर्ता असेल, गोरगरीब असेल, दीनदुबळा असेल, त्या प्रत्येकाला जवळ घेऊन आपुलकीने वागवणारा एक नेता मी पतंगराव कदम साहेबांच्या रूपाने पाहिलेला आहे. विधानसभेमध्ये दहा वर्षांच्या आमदारकीच्या काळात मला त्यांचा सहवास लाभला. मी गृहराज्यमंत्री असताना तर मोठ्या भावाप्रमाणे मला नेहमी त्यांनी मार्गदर्शन केलं, ही गोष्ट मी आयुष्यात कधीच विसरू शकणार नाही. पहिल्यांदा मंत्री होऊन अधिवेशनामध्ये मी जेव्हा उत्तर द्यायला उभा राहिलो, त्या वेळेला त्यांनी मला एक सूचना केली होती मोठ्या भावाप्रमाणे की, विरोधकांनी कितीही प्रश्न विचारले, ते कितीही मोठ्याने बोलले तरी त्यांच्याकडे न बघता डायसकडे बघायचं, अध्यक्षांकडे बघून उत्तर द्यायचं. अशा तऱ्हेनं अनेक बारीक-सारीक पण महत्त्वाच्या गोष्टी या सातत्याने ते आमच्यासारख्या नवीन आमदारांना ते सांगायचे. शैक्षणिक कामासाठी असेल, विद्यार्थ्यांची फी कमी करण्याचा प्रश्न असेल, ॲडमिशनचा असेल, त्या वेळी कधीही कोणतीही जात-धर्म न पाहता तो केवळ गरीब आहे, त्याची निकड आहे हे पाहून सातत्याने मदत करणारा नेता म्हणून मी पतंगरावांना पाहिलेलं आहे. राजकीय-सामाजिक जीवनात मी अनेक नेते पाहिले, परंतु उदार अंतःकरणाचा, कर्णासारखा, मोठा दिलदार ज्यांनी शिक्षणक्षेत्रामध्ये दीपस्तंभ म्हणून काम केलं, सामाजिक क्षेत्रातील महामेरू आणि राजकारणातील एक ऋषितुल्य नेतृत्व आज आमच्यात नाहीये. अशा या आदरणीय, लाडक्या नेत्यांना मी माझ्या कुटुंबीयांच्या वतीने, माझ्या पुणे शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहतो आणि याठिकाणी थांबतो. जयहिंद.







# सुख-दुःखात सामील होणारा नेता

**अंकुश काकडे**
प्रवक्ते, राष्ट्रवादी काँग्रेस

**मला आठवतंय की, माझ्या घरामध्ये जवळपास सात-आठ मंगल कार्ये झाली. एक शिरूर तालुक्यामध्ये देखील झालं. पण या सगळ्या मंगल कार्यांना वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी पतंगराव स्वतः हजर असायचे. कदाचित कदम कुटुंबीयांतील एखादं लग्न त्यांच्याकडून चुकलं असेल, पण माझ्या घरातल्या सगळ्या लग्नकार्यांमध्ये आम्हाला त्यांचा आशीर्वाद लाभला. त्याचप्रमाणे घरामध्ये ज्या काही दुःखद घटना घडल्या असतील, पतंगराव फोन करून बोलायचे, स्वतः भेटायला यायचे आणि आमचे सांत्वन करायचे, असा एक वडिलकीच्या नात्याचा माणूस आमच्यातून गेल्याचे दुःख व्यक्तिशः आम्हाला निश्चित आहे.**

डॉक्टर साहेबांचा आणि आम्हा काकडे कुटुंबीयांचा जवळपास ५० वर्षांचा घनिष्ठ संबंध. ज्या वेळेला डॉक्टरसाहेब पुण्यामध्ये आले, त्या वेळेला त्यांना काही मोजक्या लोकांची साथ मिळाली, त्याच्यामध्ये कै. नहार असतील, कै. दत्तू वारू असतील, पुलाच्या वाडीचे मारुतराव काळे, रामदेवराव बढे आणि त्याच्यामध्ये माझे वडील देखील कै. खंडेराव काकडे या मंडळींनी सांगली जिल्ह्यामधून आलेला एक तरुण कार्यकर्ता वेगळ्या क्षेत्रामध्ये काम करतो आहे, त्याला आपण मदत करायला हवी, अशाच प्रकारच्या भूमिकेतून त्यांना साथ दिली. सहकार क्षेत्र असेल, शिक्षणक्षेत्र असेल, इतर क्षेत्रांमध्ये देखील त्यांनी केलेलं काम हे केवळ उभ्या महाराष्ट्राला नव्हे तर संपूर्ण देशाला परिचित झालेलं आहे. आज अनेक जण सांगतात की, त्यांनी भारती सहकारी बँक सुरू केली. आपल्याला आठवत असेल तर आताचे जे भारती भवन आहे, त्याच्या समोर मातंग आळीमध्ये कै. शंकरराव म्हात्रे यांनी त्यांना छोटीशी जागा दिली आणि जवळपास दोनशे स्क्वेअर फूटच्या त्या जागेमध्ये भारती सहकारी बँकेचा संसार थाटला. आज पुण्यामध्येच नाही तर सांगलीमध्ये देखील त्या बँकेच्या मोठ्या शाखा आहेत.

पतंगरावांचा सर्व क्षेत्रांमध्ये वावर होता. सर्व क्षेत्रांना न्याय देण्याचा त्यांचा प्रयत्न








होता. अनेकांना कल्पना नसेल पण पतंगरावांना संगीताची देखील खूप आवड होती. भारती संगीत सभा नावाची छोटी संस्था त्यांनी स्थापन केली होती. दर महिन्यातील एक दिवस त्यावेळेला भरत नाट्य मंदिर किंवा बालगंधर्व याठिकाणी आपल्या मित्रमैत्रिणींना, संस्थेतील कर्मचाऱ्यांना बोलवून संगीताचा एक कार्यक्रम करायचा, असा जवळपास पाच-सहा वर्षे कार्यक्रम त्यांनी केला. सर्वसामान्य कार्यकर्त्यांवर किती प्रेम करावं, याचं मी एक मूर्तिमंत उदाहरण आहे. माझ्या घरामध्ये झालेल्या सर्व सुखदुःखांमध्ये पतंगराव नेहमी मला साथ द्यायला आले.

मला आठवतंय की, माझ्या घरामध्ये जवळपास सात-आठ मंगल कार्ये झाली. एक शिरूर तालुक्यामध्ये देखील झालं. पण या सगळ्या मंगल कार्यांना वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी पतंगराव स्वतः हजर असायचे. कदाचित कदम कुटुंबीयांतील एखादं लग्न त्यांच्याकडून चुकलं असेल, पण माझ्या घरातल्या सगळ्या लग्नकार्यांमध्ये आम्हाला त्यांचा आशीर्वाद लाभला. त्याचप्रमाणे घरामध्ये ज्या काही दुःखद घटना घडल्या असतील, पतंगराव फोन करून बोलायचे, स्वतः भेटायला यायचे आणि आमचे सांत्वन करायचे, असा एक वडिलकीच्या नात्याचा माणूस आमच्यातून गेल्याचे दुःख व्यक्तिशः आम्हाला निश्चित आहे. मध्यंतरी आम्ही सॅटर्डे क्लबचे जवळपास शंभर सदस्य नवी दिल्लीला गेलो होतो. पतंगरावांनी आग्रहाने सांगितलं की, दिल्लीमध्ये माझी भारती विद्यापीठ संस्था बघायला आपण आलं पाहिजे. पतंगरावांची त्या वेळेला तब्येत बरी नव्हती. पण आपण या सगळ्या मंडळींना आमंत्रित केलेलं आहे, आपण त्याठिकाणी गेलं पाहिजे, यासाठी नागपूरचं अधिवेशन करून ते नवी दिल्लीला त्याठिकाणी आले. त्यांच्या संस्थेमध्ये जाताना आम्ही जवळपास दीड तास ट्रॅफीकमध्ये अडकलो होतो. पण तरीही डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. पतंगराव कदम, विश्वजित कदम त्याठिकाणी आमची वाट पाहत थांबले होते.

आमचा तो विशेष कार्यक्रम होण्याच्या पाच-सहा तास आधी पाऊस झाला होता. त्या परिस्थितीत आपल्या पुणेकर पाहुण्यांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांनी त्याठिकाणी नवीन मंडप घातला आणि आमचं स्वागत केलं. इतकं प्रेमळ स्वागत करणारा, अडीअडचणीत मदत करणारा, प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये सहभागी होणारा एक जवळचा नेता गेल्याचं दुःख आज आहे. मी माझ्या काकडे परिवाराच्या वतीने आणि आमच्या सॅटर्डे क्लबच्या सर्व सदस्यांच्या वतीने डॉक्टर साहेबांना आदरांजली अर्पण करतो. परमेश्वर त्यांना सद्गती देवो, अशी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो. धन्यवाद. ●



# साहेबांमुळेच घडलो



**प्रवीण तरडे**
अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक

नमस्कार, मी साहेबांचा विद्यार्थी. साहेब मला नेहमी प्रेमाने म्हणायचे की, 'प्रवीण तरडे इज ओरिजिनल प्रॉडक्ट ऑफ भारती विद्यापीठ.' त्याचं कारण असं की मॉन्टेसरीपासून म्हणजे ज्युनिअर केजीपासून ते माझं एमबीए पूर्ण करेपर्यंत अशी १९ वर्षे मी भारती विद्यापीठाचा विद्यार्थी होतो. माझी जी काही जडण-घडण झाली ती त्याच्या आवारात झाली. साहेबांच्या बोलण्यात नेहमी हे विषय असायचे की, गतिमान शिक्षणातून सामाजिक परिवर्तन, त्यांच्या त्या वाक्याचं खरंखुरं प्रॉडक्ट म्हणजे मी आहे. १९८५ साली त्यांच्याच वाढदिवसाला मी माझं पहिलं नाटक सादर केलं होतं. त्या वेळेला मी पाचवीत होतो. साहेब समोर बसले होते. आमच्यासाठी साहेबांचं येणं, म्हणजे त्या लहान वयातसुद्धा मोठं आकर्षण होतं. पाचवीतली मुलं आम्ही, नाटक झालं आणि गेलो. खरंतर साहेबांसाठी सोपा विषय होता तो की, त्यांच्या शाळेतल्या मुलांनी नाटक केलं. पण तरीही ते गॅदरींग झाल्यानंतर त्या नाटकातील नोकराचं काम करणारा पोरगा कोण होता रे, त्याला पाठवा जरा इकडे, म्हणून मला निरोप आला. माझे शिक्षक मला धरून तिथे घेऊन गेले. मला अजून आठवतंय की, मी पाचवीत असताना साहेबांनी माझ्या पाठीवर हात ठेवला होता आणि म्हणाले होते की, 'बाळा, असंच काहीतरी चांगलं चांगलं करत राहा बरं का.' पुढची तीस वर्षे साहेबांचा तो हात माझ्या पाठीवर राहिला. त्याच्यानंतर मी पुरुषोत्तम करंडक जिंकला. माझी ती एकांकिका पाहायला साहेब भरत नाट्य मंदिरात आले होते. त्यानंतर मी पहिला सिनेमा केला, 'देऊळ बंद'. मला अजून आठवतंय की, साहेबांनी विश्वजित कदम साहेबांकडे निरोप पाठवला होता की, 'प्रवीण त्याचा पहिला सिनेमा करतोय. काही अडचण-बिडचण असेल तर त्याला म्हणावं सांगा.' आणि साहेबांनी मला त्या सिनेमालाही पूर्ण मदत केली. कदम परिवाराचं आणि साहेबांचं एक विलक्षण नातं होतं माणसांशी. माणसांचे दोन प्रकार असतात. माणसं येतात, माणसं जगतात आणि माणसं जातात. पण काही माणसं येतात, माणसं जगतात आणि माणसं राहतात.

साहेब त्या राहणाऱ्या माणसांपैकी आहेत. म्हणूनच मी स्वतःला पतंगराव कदम आहे, असं मानतो. भारती विद्यापीठातून जो जो विद्यार्थी पासआउट झाला आहे, साहेबांचा विद्यार्थी, तो स्वतः पतंगराव कदम साहेब आहे. त्यांच्या वागण्या-बोलण्यातला लहेजा आमच्यात आलेला आहे. आम्हीसुद्धा कित्येकदा व्यासपीठावरून

**मी स्वतःला पतंगराव कदम आहे, असं मानतो. भारती विद्यापीठातून जो जो विद्यार्थी पासआउट झाला आहे, साहेबांचा विद्यार्थी, तो स्वतः पतंगराव कदम साहेब आहे. त्यांच्या वागण्या-बोलण्यातला लहेजा आमच्यात आलेला आहे. आम्हीसुद्धा कित्येकदा व्यासपीठावरून बोलताना बेधडक बोलतो. ती त्यांची पद्धत होती. 'ए तरड्या, लेका इकडं ये. अरे काय चिमणी-पोपटाच्या गप्पा मारतो. चिमणी-पोपटाच्या गप्पा मारशील तर जमिनीवरचे दाणे वेचशील. फिनिक्ससारखी भरारी घे, आकाशातून जग बघशील.' असं साहेब त्यांच्या रांगड्या भाषेत जेव्हा बोलायचे ना, त्या वेळी जगातले मोठमोठे फिलॉसॉफर मागे पडतील इतकी साहेबांची फिलॉसॉफी मातीशी संलग्न होती. साहेबांच्या अंगाला मातीचा वास यायचा, असं मी नेहमी म्हणतो. कारण त्यांच्या अंगाला जो मातीचा वास यायचा तो ते इतरांना देण्याचा प्रयत्न करायचे. म्हणून साहेब 'साहेब' होते.**






बोलताना बेधडक बोलतो. ती त्यांची पद्धत होती. 'ए तरड्या, लेका इकडं ये. अरे काय चिमणी-पोपटाच्या गप्पा मारतो. चिमणी-पोपटाच्या गप्पा मारशील तर जमिनीवरचे दाणे वेचशील. फिनिक्ससारखी भरारी घे, आकाशातून जग बघशील.' असं साहेब त्यांच्या रांगड्या भाषेत जेव्हा बोलायचे ना, त्या वेळी जगातले मोठमोठे फिलॉसॉफर मागे पडतील इतकी साहेबांची फिलॉसॉफी मातीशी संलग्न होती. साहेबांच्या अंगाला मातीचा वास यायचा, असं मी नेहमी म्हणतो. कारण त्यांच्या अंगाला जो मातीचा वास यायचा तो ते इतरांना देण्याचा प्रयत्न करायचे. म्हणून साहेब 'साहेब' होते.

खरंतर ते एका मोठ्या राजकीय पक्षाचे मोठे नेते होते, तरीही त्यांनी भारती विद्यापीठाच्या आवारात कोणतीही राजकीय संघटना येऊ दिली नाही. अगदी स्वतःच्या पक्षाचीही. ते म्हणायचे की, 'पोरांनी पास होऊन बाहेर पडताना स्वतःची मतं मांडली पाहिजेत. स्वतःचे विचार मांडले पाहिजेत. आम्ही लादलेलं काहीतरी बोलता कामा नये' ते साहेब आम्हाला माहीत आहेत. दुबईला माझ्या चित्रपटाला, 'रेगे'ला पहिलं अवॉर्ड मिळालं. तर विश्वजित कदम हे स्वतः आपल्या महाविद्यालयाचा विद्यार्थी दुबईत अवॉर्ड घेतो आहे, हे पाहण्यासाठी सपत्नीक माझ्या त्या अवॉर्ड सोहळ्याला आले होते. हा जो मातीचा वास येतो ना माणसांच्या अंगाला, तो हा वास येतो. म्हणून ही माणसं मातीतली आणि आम्ही त्यांच्या जवळचे. भविष्यात कुठेही जाऊ, कितीही मोठी भरारी घेऊ, कितीही मोठी उडी मारू, पण या मातीचा वास येणाऱ्या माणसांजवळच राहू.

मला आठवतंय, पाचवी ते एमबीए, आमची परिस्थिती नव्हती. त्यामुळे मी कधीही फी भरली नाही. भारती विद्यापीठाने कधीही आमच्याकडून फी घेतली नाही. साहेबांचं तत्त्व होतं. ज्यांच्यासाठी, ज्या बहुजन समाजासाठी मी काहीतरी निर्माण केलंय, तिथले विद्यार्थी इथे येऊन शिकतील, तेव्हा खऱ्या अर्थाने प्रगती होईल. म्हणूनच आज आमच्या यशामध्ये त्या साहेबांचा वाटा कायम राहील. आणि तीस वर्षांपूर्वी माझ्या छोट्याशा पाठीवर हात ठेवून जी शाबासकी दिली, ती शाबासकी पुढे ऑस्कर जरी जिंकलं, तरी त्या व्यासपीठावर या साहेबांनी मला इथपर्यंत येण्याची धमक निर्माण केली, हे सांगत राहील. माझ्यासारखे हजारो विद्यार्थी त्या भारती विद्यापीठातून बाहेर पडले आहेत. उपेंद्र लिमयेला पहिलं नॅशनल अवॉर्ड मिळालं, तो भारती विद्यापीठाचा विद्यार्थी. सरकारने करायच्या आधीच त्याचा सत्कार साहेबांनी भारती विद्यापीठात केला. पहिल्यांदा वसंत बापट, विंदा करंदीकर हे कवी भारती विद्यापीठाच्या मोरे विद्यालयात साहेबांनी आणले. वयाच्या सातव्या वर्षी आम्हाला विंदा करंदीकर दाखवले ते साहेबांनी. हे त्यांचे कौतुक. अशा या साहेबांच्या चरणी आयुष्यभर आम्ही नतमस्तक राहू. त्यांना मनःपूर्वक आदरांजली वाहतो. धन्यवाद.

●

# भारती विद्यापीठ गीत

सहकार्याचे सत्कार्याचे प्रतीक येथे आहे,
या देशाचे विद्याभूषण ज्ञानपीठ आहे,
भारती विद्यापीठ आहे.

सुजलाम् सुफलाम् मळे बहरले कीर्ती सुगंधाचे
उजाड माळावरी उजळले दीप संपदांचे,
संगमरवरी उभे शिल्प हे स्वप्न आभाळाचे,
ज्ञानदान अन् पुण्याईचे पावन मंदिर आहे,
भारती विद्यापीठ आहे.

वादळातुनी झेप घेतली ध्येय पतंगाने,
तुफानाशी झुंज घेतली कुणी आनंदाने,
यशवंताचे यशोगीत हे मूर्तिमंत गाणे,
निर्धाराची निश्चल निष्ठा त्याग मागते आहे,
भारती विद्यापीठ आहे.

सह्यगिरीची पर्वतराजी सभोवती सुंदर,
दीन–दुबळ्यांची वाट वळावी असेच आपुले घर,
नंदनवन हे फुलामुलांचे सेवेला तत्पर,
मानवतेची निर्मळ गंगा इथे वाहते आहे,
भारती विद्यापीठ आहे.

छत्रपतींच्या, कर्मवीरांच्या कार्याची प्रेरणा,
आम्हास देई शक्ती फुल्यांच्या मनातली कल्पना,
सुमंगलाची, विज्ञानाची आम्ही करू प्रार्थना,
येणारा प्रत्येक क्षण हा अमुच्यासाठी आहे,
भारती विद्यापीठ आहे.

**- म. भा. चव्हाण**

# स्मृतींचा जागर, भावनांचा गहिवर








साहेबांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्व क्षेत्रांतील
दिग्गजांबरोबर नागरिकांनीही मोठी गर्दी केली होती.



“

पुण्यात जेव्हा मी आलो, तेव्हा माझी परिस्थिती बिकट होती. रिक्षाला द्यायला पैसे नसायचे; परंतु प्रबळ प्रेरणा होत्या. सांगली, सातारा जिल्ह्यांचा संस्कार होता. जबरदस्त इच्छाशक्ती होती. संस्था काढायची तर पुण्यातच काढायची, असे मनात होते. पुणे जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनानेही माझ्या संस्कारात नवी भर घातली.

हडपसरला साधना विद्यालयात सायन्सच्या प्रयोगशाळेत मी टेबलावर झोपत असे. जेवायला पैसे नसायचे. गाडीतळावर एक खानावळवाला होता, तो मला मास्तर म्हणायचा. त्याचं - माझं गणित जमलं. तो म्हणायचा, ''जेवणाचे पैसे आत्ता देऊ नका. नोकरी लागल्यावर द्या.'' आयुष्यात मी एक गोष्ट सांभाळली. ज्यानं मला चिमूटभर मदत केली, त्याला आपण भाराभर द्यायचं. या खानावळवाल्याचं नंतर मी कल्याण केलं.

”

**डॉ. पतंगराव कदम साहेब**

संस्थापक - भारती विद्यापीठ